सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर
सोमवार, दि. ६ जुलै २०२६ | वर्ष - ४ थे | अंक ८३ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## तिडके यांचे निधन

नागपूर : विदर्भातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि सहकार क्षेत्रातील ज्येष्ठ मार्गदर्शक तसेच काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाबूराव तिडके यांचे निधन झाले आहे. त्यांच्या निधनाने विदर्भाच्या सार्वजनिक जीवनावर शोककळा पसरली असून विविध स्तरांतून हळहळ व्यक्त केली जात आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बाबूरावजी तिडके यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त करत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. त्यांनी प्रसिद्ध केलेल्या शोकसंदेशात म्हटले आहे की,बाबूरावजी तिडके यांनी नागपूर जिल्ह्याच्या राजकारणाला दिशा देण्याबरोबरच शिक्षण, सहकार आणि समाजकारणाच्या क्षेत्रातही उल्लेखनीय योगदान दिले. त्यांच्या कार्यामुळे अनेक कार्यकर्त्यांची राजकीय जडणघडण झाली आणि त्यांच्या अनुभवसंपन्न नेतृत्वातून अनेकांना प्रेरणा मिळाली.

## तीजन बाई यांचे निधन

रायपूर : छत्तीसगडच्या लोकसंस्कृतीला जागतिक स्तरावर वेगळी ओळख मिळवून देणाऱ्या ज्येष्ठ पंडवानी गायिका आणि पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित तीजन बाई यांचे रविवारी (५ जुलै) पहाटे सुमारे ३.१५ वाजता रायपूर येथील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था रुग्णालयात निधन झाले. त्या दीर्घकाळापासून आजारी होत्या त्यांच्यावर उपचार सुरू होते.त्यांच्या निधनाच्या वृत्ताने केवळ छत्तीसगडच नव्हे, तर संपूर्ण देशातील कला आणि सांस्कृतिक क्षेत्रात शोककळा पसरली आहे. तीजन बाई यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण गायनशैली, प्रभावी अभिनय आणि भावपूर्ण सादरीकरणातून पंडवानी या लोककलेला आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर पोहोचवले.महाभारतातील कथा दमदार आवाज आणि प्रभावी सादरीकरणाच्या माध्यमातून जिवंत करणाऱ्या तीजन बाई यांनी देश-विदेशात हजारो कार्यक्रम सादर करत छत्तीसगडच्या समृद्ध लोकपरंपरेचा गौरव वाढवला.

## चंद्रिमा यांचा राजीनामा

कोलकाता : पक्षात उभी फूट पडल्यानंतरही तृणमूल काँग्रेसला अद्याप हादरे बसतच आहेत. केवळ महिनाभरापूर्वी या पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती झालेल्या चंद्रिमा भट्टाचार्य यांनी शनिवारी या पदाचा राजीनामा दिल्यानेममता बॅनर्जीयांना मोठा धक्का बसला. चंद्रिमा भट्टाचार्य यांनी ममता यांना पत्र पाठवून या निर्णयाची कल्पना दिली. प्रदेशाध्यक्षासोबत अन्य पदांचाही राजीनामा दिल्याचे त्यांनी म्हटले आहे. प. बंगालमध्ये झालेल्या सत्तांतरानंतर तृणमूलला मोठ्या प्रमाणात गळती लागली व अनेक आमदार-खासदारांनी तसेच, पक्ष संघटकांनी पक्षाला सोडचिठ्ठी दिली होती. यामध्ये प्रदेशाध्यक्ष सुब्रत बक्षी यांचाही समावेश होता.

## डिलिट डेटा मिळाला

पुणे : केतन अग्रवाल खून प्रकरणात संशयित मुख्य आरोपी असलेली त्याची नियोजित वधू सिया गोयल आणि तिचा प्रियकर चेतन चौधरी यांच्याकडून जप्त केलेल्या तिन्ही मोबाइलमधून 'डिलिट' करण्यात आलेला 'डेटा' पुणे ग्रामीण पोलिसांनी परत मिळवला केला आहे. चेतन चौधरीच्या एका मित्राला केतन अग्रवालच्या खुनाच्या कटाची पूर्वकल्पनाअसल्याचे तपासात निष्पन्न झाले असून, त्याचा जबाब पोलिसांनी नोंदविला आहे. या मित्राने चेतन आणि सियाला गुन्हा करण्यापासून रोखण्याचा प्रयत्न केल्याचे पोलिसांना सांगितले आहे. आता साक्षीदारांचे जबाब आणि डिजिटल पुरावे यांची सांगड घालून खुनाचा कट उलगडण्याचा प्रयत्न पोलिस करीत आहेत.

## लोहगडावर झुंबड !

मुंबई : यंदाच्या पावसाळ्यात साहसी पर्यटक केवळ 'सिया पॉइंट' पहायचे म्हणून येत आहेत. लोहगडाची अशा घटनेमुळे बदनामी होत असून 'सिया पॉइंट' हे नाव इंटरनेटवर लोकेशन म्हणूनही प्रसिद्धी मिळवत आहे.

# २० जुलैपासून संसदेचे पावसाळी अधिवेशन

वृत्तसंस्था



नवी दिल्ली : संसदेचे पावसाळी अधिवेशन २० जुलैपासून सुरू होईल. ते १३ ऑगस्टपर्यंत चालेल. केंद्रीय संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजूयांनी शनिवारी 'एक्स'वरून याची घोषणा केली. पाच राज्यांच्या निवडणूक निकालांनंतर तृणमूल काँग्रेस व शिवसेना (उबाठा) संसदीय पक्षांत पडलेली फूट; तसेच आम आदमी पक्षाच्या खासदारांनी केलेला भाजप प्रवेश यांसारख्या मुद्द्यांवरून जेमतेम तीन आठवड्यांच्या या अधिवेशनात जोरदार गदारोळ होण्याची स्पष्ट चिन्हे आहेत. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या संदेशात या मुद्द्यावरून विरोधकांवर प्रहार करतील, असे सांगितले जात आहे. संसदेच्या पावसाळी अधिवेशनात साधारणपणे २०-२२ बैठका असतात आणि ते तीन ते चार आठवडे चालते. तथापि यापूर्वी कमी कालावधीची पावसाळी अधिवेशनेही झाली आहेत. 'पावसाळी अधिवेशन राष्ट्रीय महत्त्वाच्या मुद्द्यांवर अर्थपूर्ण वादविवाद, चर्चा आणि निर्णय घेण्यासाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरेल. दोन्ही सभागृहांमध्ये सार्वजनिक आणि राष्ट्रीय हिताच्या मुद्द्यांवर व्यापक आणि रचनात्मक चर्चा होईल,' अशी आशा रिजीजू यांनी व्यक्त केली.पावसाळी अधिवेशनादरम्यान सरकार संसदेत अनेक महत्त्वाची विधेयके आणि धोरणात्मक प्रस्ताव सादर करण्याची शक्यता आहे. विरोधी पक्षही विरोधकांची फोडाफोडी वराम मंदिर दान अपहारप्रकरणासह महागाई, बेरोजगारी, कृषी, अंतर्गत सुरक्षा, परराष्ट्र धोरण आणि इतर समकालीन मुद्द्यांवर सरकारला कोंडीत पकडण्याची शक्यता आहे. सरकार आणि विरोधी पक्ष यांच्यात विविध विषयांवर तीव्र वादविवाद अपेक्षित आहेत. यापूर्वी, १६ ते १८ एप्रिल २०२६ या कालावधीत संसदेचे विशेष अधिवेशन झाले होते. त्या काळात महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचनेशी संबंधित १३१वे घटनादुरुस्ती विधेयक सादर करण्यात आले होते, परंतु एकटा भाजप सध्या अल्पमतात असल्याने लोकसभेत ते कोसळले होते. आता पावसाळी अधिवेशनात, सरकारच्या कायदेविषयक प्राधान्यक्रमांवर; तसेच विरोधी पक्षाच्या भूमिकेवर सर्वांचे लक्ष असेल. सरकार आगामी अधिवेशनात हेच १३१वे घटनादुरुस्ती विधेयक सादर करू शकते.या पावसाळी अधिवेशनात तृणमूल काँग्रेस, 'आप' व शिवसेना (उबाठा) संसदीय पक्षांतील बंडाचा परिणामही जाणवेल. तृणमूलचे २० आणि शिवसेना (उबाठा) पक्षातून बाहेर पडलेले सहा अशा २६ खासदारांना स्वतंत्र गट म्हणून मान्यता देण्याच्या मागणीवर लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या निर्णयाची कनिष्ठ सभागृहाला प्रतीक्षा आहे. तो निर्णय जाहीर झाल्यावर जोरदार गदारोळ होण्याची चिन्हे आहेत. शिवाय पश्रि्चम बंगाल, आसाम आणि केरळसह पाच राज्यांमधील विधानसभा निवडणुकांच्या निकालांचे पडसादही सभागृहात उमटण्याची शक्यता आहे.

## अमेरिकेच्या स्वातंत्र्यदिन सोहळ्यात भारतीय नौदलाची दमदार उपस्थिती

वृत्तसंस्था



वॉशिंग्टन डीसी : भारतीय नौदलाच्या आयएनएस सुदर्शिनी या जहाजाने अमेरिकेत भारताची शान उंचावली आहे. अमेरिका आपल्या २५० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करत असून, त्यानिमित्त न्यूयॉर्कमध्ये 'युनायटेड स्टेट्स इंटरनॅशनल नेव्हल रिव्ह्यू २५०' आणि 'सेल२५०' या भव्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.
हडसन नदीवर आयोजित करण्यात आलेल्या भव्य 'परेड ऑफ सेल' मध्ये भारतीय नौदलाच्या तीन मस्तूल असलेल्या आयएनएस सुदर्शिनीनेही दिमाखात सहभाग नोंदवला. जहाजावर अभिमानाने फडकणारा तिरंगा भारताच्या समृद्ध सागरी परंपरेचे जिवंत प्रतीक ठरला.अमेरिकेतील भारतीय दूतावासाने हा अभिमानाचा क्षण सोशल मीडियावर शेअर केला. दूतावासाने दिलेल्या माहितीनुसार, ४ जुलै रोजी आयएनएस सुदर्शिनी न्यूयॉर्क आणि न्यू जर्सी बंदरात दाखल झाले. जगभरातील नौदलाच्या जहाजांच्या उपस्थितीत झालेल्या 'परेड ऑफ सेल'मध्ये भारतीय जहाजाने विशेष लक्ष वेधून घेतले. या सहभागातून भारत-अमेरिका नौदल सहकार्य अधिक दृढ होत असल्याचा संदेशही देण्यात आला.आयएनएस सुदर्शिनी सध्या 'लोकायन २०२६' या विशेष मोहिमेवर असून, ही महासागर ओलांडणारी दीर्घ ट्रान्स-ओशनिक मोहीम आहे. या मोहिमेला कोची येथून सुरुवात झाली असून,गेल्या पाच महिन्यांत जहाजाने १३ हजारांहून अधिक नॉटिकल मैलांचा प्रवास पूर्ण केला आहे. या मोहिमेचा मुख्य उद्देश जगभरातील नौदलांमध्ये परस्पर विश्र्वास आणि सहकार्य वाढवणे हा आहे. 'वसुधैव कुटुंबकम' म्हणजेच संपूर्ण विश्र्व हे एक कुटुंब आहे या भारतीय तत्त्वज्ञानाचा संदेश ही मोहीम जगभर पोहोचवत आहे.

# टोल नाक्यावर गॅस टँकरची पाठीमागून ट्रकला धडक, जागीच आग लागल्याने दोघांचा होरपळून मृत्यू

तभा वृत्तसेवा




जळगाव : पारोळा-धुळे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहावरील सबगव्हाण टोलनाक्याजवळ एका गॅस टँकरनं दुसऱ्या ट्रकला जोरदार धडक दिल्याने या भीषण अपघातामध्ये दोन जणांचा आगीत होरपळून मृत्यू झाला आहे. तर या अपघातात मृतांचा आकडा वाढण्याची भीती वर्तवण्यात आली आहे.
ही घटना टोल नाक्यावर घडली असल्याने त्या ठिकाणी भीतीचं वातावरण निर्माण झालं होतं. जळगाव जिल्ह्यातील पारोळा तालुक्यातील राष्ट्रीय महामार्गावरसबगव्हाण टोल नाक्याजवळसंध्याकाळी ही घटना घडली. टोल नाक्यावर एका गॅस टँकरने पाठीमागून एका ट्रकला जोरदार धडक दिली. अपघातानंतर टँकरला आग लागली, या अपघातात दोन जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर सदर गॅस टँकरला आग लागल्यामुळे परिसरात भीतीचं वातावरण पसरलेलं असताना प्रशासनानं तत्काळ दखल घेत पारोळा अग्निशामक दलाचे कर्मचाऱ्यांना तसेच रुग्णवाहिका चालकांना तत्काळ घटनांसाठी दाखल केलं.दरम्यान, अपघात एवढा भीषण होता की, आग विझवण्यासाठी सुमारे दोन तासांच्या अथक परिश्रमानंतर आग विझवण्यात यश आलं. अपघातानंतर वाहनाला आग लागल्यानंतर आजूबाजूच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला होता. परंतु अशी कुठलीही दुर्घटना घडली नसल्यामुळे मोठी जीवितहानी टळली. मात्र, या टँकरमधील असलेल्या किती लोकांचा बळी गेला असेल याचा अंदाज अजून आलेला नसून सदर वाहनातून शव बाहेर काढल्यानंतरच समजणार असल्याचं सांगण्यात आलेलं आहे. टँकरला आगलागल्यानंतर पोलीस प्रशासन, महसूल प्रशासन, नगरपालिका प्रशासन, रुग्णवाहिका प्रशासन व अग्निशामक बंबाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले होते. यामध्ये पारोळा धुळे येथील अग्निशामक बंबांना याठिकाणी बोलवण्यात आलं होतं. अपघातामुळे आणि गॅस टँकरला लागलेल्या आगीमुळे सुमारे राष्ट्रीय महामार्गावरील दोन ते तीन तास वाहतूक ठप्प झाली होती.सदर घटना ही सबगव्हाण टोल नाक्याजवळ घडली असून, ही घटना कशी घडली?
याबाबत टोलनाक्याच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. याबाबत पोलीस सकाळी सदर घटना कशी घडली? हे निश्रि्चत करणार असून याबाबत कुठल्याही प्रकारची माहिती पोलिसांना मिळाली नसून, टँकरमधील ड्रायव्हर आणि क्लिनर या दोन जणांचा जागीच मृत्यू झाल्याचं निष्पन्न झालं आहे. याबाबत रात्री उशिरापर्यंत पारोळा पोलीस ठाण्यात कुठल्याही प्रकारची पुण्याची नोंद करण्यात आलेली नव्हती.

## पुणे पोलीस आणि FDA कडून भेसळखोरांचं मोठं रॅकेट उघड
## १ हजार लिटर दुधात ५०० लिटर शाम्पू-केमिकलचे दूध

तभा वृत्तसेवा



पुणे : अन्न व औषध प्रशासन विभागाच्या आयुक्तपदी तुकाराम मुंढे यांची वर्णी लागल्यापासून राज्यभरात भेसळखोरांवर धाडसत्र सुरू आहे. अशातच आज पुणे स्थानिक गुन्हे शाखने एकाच वेळी पाच जिल्ह्यांत कारवाई करत मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल आणि अन्न औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली अहिल्यानगर, सांगली, मंचर, सिल्लोड, अकलूज या परिसरात ही कारवाई करण्यात आली असून १३ जणांना अटक करण्यात आली आहे. तसंच तब्बल अडीच ते तीन कोटी रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
मिळालेल्या माहितीनुसार, दुधात भेसळ करणाऱ्या रॅकेटबाबत पुणे ग्रामीण पोलीस आणि अन्न औषध प्रशासनाला टीप मिळाली होती. त्यानुसार पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर यांच्यासह इतर अधिकारी असे ३० जणांचे पथक आणि अन्न व औषध प्रशासनाचे २० पेक्षा अधिक अधिकारी, कर्मचाऱ्यांनी पाच जिल्ह्यांमध्ये धाडी टाकल्या. या धाडीमध्ये दूध भेसळीचे पुण्यातील मंचर हे मुख्य केंद्र असल्याचे आढळून आले. एक हजार लिटर दुधात ही टोळी ५०० लिटर केमिकलच्या साहाय्याने तयार केलेले दूध मिसळत असल्याची धक्कादायक बाब उघड झाली आहे.
दरम्यान, भेसळ करणारे हे नराधम दुधात शाम्पू आणि दूध पावडरचा वापर करत असल्याचं आढळून आलं आहे. याद्वारे सर्वसामान्य नागरिकांच्या जीवाशी खेळ करण्यात येत असल्याने आरोपींवर कठोरातील कठोर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.
अन्नभेसळीविरोधात राज्यभर सुरू असलेल्या मोहिमेअंतर्गत अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) पथकाने शनिवारी सिन्नर तालुक्यातील शहा, कारवाडी, पुतळेवाडी आणि विघनवाडी परिसरात छापेमारी केली. दूध संकलन केंद्रे आणि खवानिर्मिती केंद्रांवर झालेल्या या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

# अयोध्येत पुन्हा मोठा मुद्दा

तभा वृत्तसेवा

मुंबई : अयोध्येतील श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टला माहिती अधिकार (ठव्ख) कायद्याच्या कक्षेत आणण्याची मागणी पुन्हा चर्चेत आली आहे. सीपीआय(एम)चे राज्यसभा खासदार जॉन ब्रिटास यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना पत्र लिहून याबाबत फेरविचार करण्याची विनंती केली आहे. ४ जुलै रोजी पाठवलेल्या पत्रात ब्रिटास यांनी म्हटले आहे की, राम मंदिर ट्रस्ट ठव्खच्या कक्षेत आल्यास त्याच्या कामकाजात अधिक पारदर्शकता येईल. तसेच भाविकांकडून मिळणाऱ्या देणग्यांचा वापर कसा होतो, याबाबत जनतेसमोर अधिक स्पष्ट माहिती येऊ शकेल.
ब्रिटास यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या २०१९ मधील अयोध्या निकालाचाही उल्लेख केला आहे. या निकालानंतर केंद्र सरकारने राजपत्र अधिसूचनेद्वारे श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टची स्थापना केली. मंदिरासाठी संपादित केलेली जमीन ट्रस्टकडे सोपवली. एवढेच नाही, तर ट्रस्टच्या १५ सदस्यांपैकी सुरुवातीच्या १२ सदस्यांची नियुक्तीही केंद्र सरकारनेच केली होती, असे त्यांनी पत्रात नमूद केले आहे.
६ जून २०२५ रोजी केंद्रीय माहिती आयोगाने राम मंदिर ट्रस्ट हा ठव्ख कायद्यांतर्गत सार्वजनिक प्राधिकरण नसल्याचा निर्णय दिला होता. हा निर्णय गृह मंत्रालयाच्या भूमिकेवर आधारित होता. त्यामुळे आता केंद्राने आपली भूमिका पुन्हा तपासावी, अशी मागणी ब्रिटास यांनी केली आहे. ट्रस्ट सरकारी अधिसूचनेतून स्थापन झालेला नाही, हा युक्तिवाद योग्य नाही, असेही त्यांनी म्हटले आहे. माहिती अधिकार कायद्यात सरकारने अधिसूचना स्वतः काढली किंवा न्यायालयाच्या आदेशानुसार काढली, असा कोणताही फरक केलेला नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.



# नदीच्या पुरात २२ पर्यटक अडकले; रेस्क्यू टीमची धाडसी मोहीम

तभा वृत्तसेवा



रायगड : रायगड जिल्ह्यासह रोहा तालुक्यात गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे कुंडलिका आणि महिसदरा नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली आहे. अनेक ठिकाणी पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्र्वभूमीवर रोहा तालुक्यातील बाहे-देवकान्हे हद्दीतील एस. पी. फार्म येथे सहलीसाठी आलेले २० पर्यटक आणि दोन केअरटेकर असे एकूण २२ जण पुराच्या पाण्यात अडकले होते. मात्र सागर डहिंबेकर यांच्या एसव्हीआरएएसएस (डतठडड) रेस्क्यू टीमने आणि बाहे गावातील तरुणांनी वेळेत धाव घेत सर्वांची सुखरूप सुटका केली. रविवारी सकाळपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे महिसदरा नदीला अचानक पूर आला. नदीच्या पाण्याची पातळी झपाट्याने वाढल्याने एस. पी. फार्मचा परिसर चारही बाजूंनी पाण्याने वेढला गेला. त्यामुळे तेथे पर्यटनासाठी आलेले पर्यटक बाहेर पडू शकले नाहीत. परिस्थिती गंभीर होत असल्याचे लक्षात येताच स्थानिकांनी तातडीने मदतीसाठी सागर डहिंबेकर यांच्या एसव्हीआरएएसएस रेस्क्यू टीमशी संपर्क साधला.माहिती मिळताच रेस्क्यू टीम घटनास्थळी दाखल झाली. बाहे गावातील स्थानिक तरुणांच्या सहकार्याने नियोजनबद्ध पद्धतीने बचाव मोहीम राबविण्यात आली. वेगवान पावसाचा आणि पुराच्या पाण्याचा सामना करत एकामागोमाग एक अशा सर्व २२ जणांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले. टीमच्या प्रसंगावधान, धाडस आणि कौशल्यामुळे कोणतीही जीवितहानी न होता बचावकार्य यशस्वी झाले. सुटका झाल्यानंतर पर्यटकांनी सुटकेचा निःश्र्वास सोडत एसव्हीआरएएसएस रेस्क्यू टीम आणि स्थानिक तरुणांचे मनापासून आभार मानले. ग्रामस्थांनीही टीमच्या तत्परतेचे आणि धाडसी कार्याचे कौतुक केले. दरम्यान,रोहातालुक्यात मुसळधार पावसाचा जोर कायम आहे. कुंडलिका, महिसदरा तसेच अन्य नद्या दुथडी भरून वाहत आहेत. प्रशासनाने नागरिक आणि पर्यटकांना नदीकाठ, धबधबे तसेच पूरग्रस्त भागांमध्ये जाणे टाळण्याचे आवाहन केले आहे. हवामानाचा इशारा लक्षात घेऊन सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. रायगडमध्येमुसळधार पावसामुळे अनेक भागांमध्ये पूरसदृश्य परिस्थिती झालेली असताना रायगडकरांचं आणखी टेन्शन वाढवणारी बातमी समोर आली आहे. हवामान विभागाने पुढच्या काही तासांसाठी रायगड जिल्ह्याला पावसाचा रेड अलर्ट जारी केला आहे. यामुळे रायगडमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार स्वरुपाचा पाऊस पडणार आहे. त्यामुळे प्रशासनाकडून नागरिकांना काळजी घेण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. रायगडसोबत पालघर आणि रत्नागिरी या जिल्ह्यांनादेखील पावसाचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# ३१८ वर्षांनी जालन्यात मुक्ताई पालखीचं ऐतिहासिक रिंगण!

# जे.ई.एस.कॉलेजच्या मैदानावर रंगला अभूतपूर्व सोहळा

## मनोज जरांगे पाटील यांच्यासह हजारो भाविकांनी उपस्थित राहून बळीराजासाठी घातले साकडं

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**





तब्बल ३१८ वर्षांनंतर जालना शहरात श्री संत मुक्ताई पालखीचा ऐतिहासिक रिंगण सोहळा भक्तिमय वातावरणात पार पडला. टाळ-मृदंगाचा गजर, हरिनामाचा अखंड जयघोष आणि हजारो वारकऱ्यांच्या उपस्थिती हा अभूतपूर्व भक्ती सो-हळा भक्तिरसानं भारावून गेला होता. जिल्हा प्रशासनाच्या वतीनं पहिल्यांदाच या रिंगण सोहळ्याचं आयोजन केलं होतं.

जालना शहरातील जे.ई.एस.महाविद्यालयाच्या मैदानावर हा रिंगण सोहळा आयोजित करण्यात आला होता. या रिंगण सोहळ्याला मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्यासह हजारो भाविकांनी हजेरी लावली. यावेळी हजारो भाविकांनी आदिशक्ती मुक्ताई पालखीचं दर्शन घेतलं. दरम्यान 'बळीराजाला सुखी समाधानी होऊ दे,' असं साकडं आदिशक्ती मुक्ताईंच्या रिंगण सोहळ्याच्या निमित्तानं घातल्याचं मनोज जरांगे पाटील यांनी सांगितलं. या रिंगण सोहळासाठी जालन्यातील समाजसेवक भक्त मंडळ व अनेक पालकांनी एकत्र येऊन हा पालखी सोहळा आयोजित केला होता. या पालखी सोहळ्यासाठी सर्व वारकरी बांधवांना जालना प्रशासन व महानगरपालिका यांच्याकडून राहण्याची व जेवणाची सोय करण्यात आली होती. शनिवारी (दि.४) जालना जिल्ह्यात संत मुक्ताई यांच्या पालखीचं आगमन झालं होतं. जालना जिल्ह्याच्या सीमेवरती म्हणजे वाघरूळ या गावी या पालखीचं जंगी स्वागत करण्यात आलं. यावेळी गोंदेगाव वाघरूळ आधी पंचक्रोशीतील बांधवांनी या पालखीचे स्वागत केलं. रविवारी (दि.५) सकाळपासूनच जालन्याच्या जेईएस महाविद्यालयात भाविक भक्तांनी पालखीचा रिंगण सोहळा पाहण्यासाठी मोठी गर्दी केली होती. जालन्याचे खासदार डॉ.कल्याण काळे, आमदार अर्जुनराव खोतकर, बदनापूरचे आमदार नारायण कुचे, प्रसिद्ध उद्योजक घनश्याम गोयल, माजी आमदार कैलास गोरंट्याल, पोलिस अधिक्षक तेजबीर सिंह सिंधू, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत यांच्यासह आदींची उपस्थिती यावेळी होती.

## संक्षिप्त



### पोलिसांनी ६३ लाखांचा मुद्देमाल जप्त केला; आता महसूल विभाग कृती करणार की मौन बाळगणार?

**तभा वृत्तसेवा**
**मंठा । प्रतिनिधी**

अवैध रेती उत्खनन आणि वाहतुकीविरोधात सातत्याने कठोर भूमिका घेत मंठा पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम देशमुख यांनी १२ जून रोजी मौजे खोरवड येथील पूर्णा नदीपात्र परिसरात धडक कारवाई करत तब्बल ६३ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईमुळे रेती माफियांचे धाबे दणाणले असतानाच आता मंठा तहसीलदार सुमन मोरे आणि महसूल विभाग नेमकी काय भूमिका घेणार, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. पोलिसांनी जीव धोक्यात घालून कारवाई करायची आणि त्यानंतरची कायदेशीर प्रक्रिया महसूल विभागाकडून संथ गतीने किंवा प्रभावीपणे न झाल्यास अशा कारवायांचा उद्देशच फोल ठरण्याची भीती व्यक्त केली जात आहे. अवैध गौण खनिज प्रकरणांमध्ये दंड आकारणे, वाहन जप्त ठेवणे, शासनाचा महसूल वसूल करणे आणि आवश्यक ती पुढील कायदेशीर कारवाई करणे ही जबाबदारी महसूल विभागाची आहे. तालुक्यात यापूर्वीही अनेक प्रकरणांमध्ये कारवाई झाल्यानंतर पुढील प्रक्रिया रखडल्याच्या चर्चा होत असतात. त्यामुळे यावेळीही जप्त वाहनांवर तातडीने दंडात्मक कारवाई होणार का, की प्रकरण पुन्हा कागदोपत्रीच अडकून राहणार, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम देशमुख यांनी अवैध रेती माफियांना स्पष्ट इशारा दिला आहे. आता महसूल विभागानेही त्याच कठोरतेने भूमिका घेतली नाही, तर अवैध रेती व्यवसाय करणाऱ्यांचे मनोबल वाढण्याची शक्यता नाकारता येणार नाही. आता सर्वांचे लक्ष एका प्रश्नाकडे लागले आहे-पोलीस प्रशासनाने उचललेले कठोर पाऊल महसूल विभाग निर्णायक शेवटापर्यंत नेणार, की ही धडक कारवाई केवळ जप्तीप-रतीच मर्यादित राहणार? याचे उत्तर तहसीलदार सुमन मोरे यांच्या पुढील निर्णयातूनच स्पष्ट होणार आहे.

### दिव्यांगांना कृत्रिम पायांचे वाटप; पुनर्वसन केंद्राचा टप्प्याटप्प्याने विस्तार होणार - जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील गांधी चमन येथील महिला रुग्णालयाच्या पाठीमागे असलेल्या जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्रात दिव्यांगांसाठी कृत्रिम पाय वितरण कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी प्रमुख उपस्थिती दर्शवून लाभार्थ्यांना कृत्रिम पायांचे वितरण केले. या उपक्रमामुळे अनेक दिव्यांगांना नव्याने चालण्याचा आधार मिळाल्याने लाभार्थ्यांनी समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमानंतर जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते पुनर्वसन केंद्राच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देतानाच त्यांनी केंद्राच्या परिसराची पाहणी करून दिव्यांगांसाठी उपलब्ध सुविधा अधिक सक्षम आणि सर्वसमावेशक करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येतील, अशी ग्वाही दिली. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचा टप्प्याटप्प्याने विस्तार करण्यात येणार असून, केंद्रासमोर दिव्यांगांसाठी सुसज्ज, सुरक्षित आणि आकर्षक उद्यान विकसित करण्याचा जिल्हा प्रशासनाचा मानस आहे. रेल्वे स्थानक आणि बसस्थानकाच्या मध्यवर्ती ठिकाणी हे केंद्र असल्यामुळे जिल्ह्याच्या विविध भागांतून येणाऱ्या दिव्यांग नागरिकांना येथे सहज पोहोचता येईल आणि विविध पुनर्वसन सेवांचा अधिक प्रभावी लाभ घेता येईल. त्यांनी पुढे सांगितले की, दिव्यांग नागरिकांना दर्जेदार, सुलभ आणि आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा प्रशासन पूर्णपणे कटिबद्ध असून, पुनर्वसन केंद्रात आवश्यक त्या सर्व सुविधा टप्प्याटप्प्याने वाढविण्यात येतील. दिव्यांगांच्या पुनर्वसनाबरोबरच त्यांना स्वावलंबी आणि आत्मनिर्भर बनविण्यासाठी विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमात कृत्रिम पाय मिळालेल्या लाभार्थ्यांनी आनंद व्यक्त करत प्रशासनाचे आभार मानले. पुनर्वसन केंद्राच्या विकासासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी व्यक्त केलेल्या सकारात्मक भूमिकेमुळे उपस्थित दिव्यांग, त्यांचे पालक तसेच नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले. दिव्यांगांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी अशा उपक्रमांची सातत्याने आवश्यकता असल्याची भावना यावेळी उप-स्थितांनी व्यक्त केली.

## शेतकरी पुत्रांची मोठ्या पडद्यावर झेप; डोंगरगावच्या आदीराज-युवराज घनघाव बंधूंचा थक्क करणारा प्रवास

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**



जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यातील डोंगरगाव या छोट्याशा गावातील एका सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील दोन मुलांनी आपल्या जिद्द, मेहनत आणि अभिनयाच्या जोरावर मराठी चित्रपटसृष्टीत दमदार प्रवेश करत संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेतले आहे.

आदीराज घनघाव आणि युवराज घनघाव यांचा अभिनय असलेला 'डेरिंग द बारामती फाईल्स' हा आदित्यराजे मराठे निर्मित दुसरा मराठी चित्रपट जालना शहरासह संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित झाला असून, ग्रामीण भागातून मोठ्या पडद्यापर्यंतचा त्यांचा हा प्रवास अनेक शेतकरी कुटुंबातील तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. सोशल मीडियावर स्वतःची वेगळी ओळख निर्माण करत आदीराज घनघाव यांनी थेट सिनेसृष्टीत झेप घेतली. लहानपणापासूनच भाषण, अभिनय, विनोद आणि सामाजिक विषयांवरील व्हिडिओंमुळे त्यांना प्रचंड लोकप्रियता मिळाली. आज त्यांच्या सोशल मीडिया खात्यांवर इन्स्टाग्रामवर सुमारे १३ लाख, यूट्यूबवर ६ लाख, फेसबुकवर ६ लाख आणि मौज पवर २३ लाख फॉलोअर्स आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांवरील त्यांची भाषणे संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाली आहेत.

'डेरिंग द बारामती फाईल्स' या चित्रपटात आदित्यराजे मराठे, ऐश्वर्या दौंड, सोमनाथ अवघडे, अनंत कारेकर, महेश देवकते, आदीराज घनघाव आणि युवराज घनघाव अशी दमदार कलाकारांची फौज असून, हा चित्रपट विशेषतः शेतकरी वर्गात चर्चेचा विषय ठरत आहे. विशेष म्हणजे, गेली ६५ वर्षे शेतकऱ्यांच्या सेवेत कार्यरत असलेल्या पॅडकॅप कंपनीचे आदीराज घनघाव हे ब्रँड ॲम्बेसेडर आहेत. तसेच सोशल मीडियातून मिळणाऱ्या उत्पन्नातून विधवा, अपंग, गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल शेतकरी कुटुंबांना मदत करण्यासाठी 'एक हात मदतीचा' हा सामाजिक उपक्रम आदीराज आणि युवराज यांनी सुरू केला असून, या कार्याचे राज्यभरातून कौतुक होत आहे. यावेळी आदीराज घनघाव म्हणाले, माझ्यासारख्या एका गरीब शेतकरी कुटुंबातील मुलाला मराठी चित्रपटात संधी देऊन मोठ्या पडद्यावर काम करण्याची संधी दिल्याबद्दल निर्माते आदित्यराजे मराठे सरांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. ही संधी माझ्यासाठी आयुष्यभराची प्रेरणा आहे. डोंगरगावच्या या शेतकरी पुत्रांनी सोशल मीडियापासून ते मराठी चित्रपटसृष्टीपर्यंत मारलेली ही झेप आज अनेक ग्रामीण भागातील तरुणांसाठी आशेचा किरण ठरत असून, त्यांच्या यशामुळे जालना जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.



## मनसे विद्यार्थी सेनेचे शहरप्रमुख महेश नागवे यांचा सहकार्यासह शिवसेनेत प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला मोठा धक्का बसला असून मनसे विद्यार्थी सेनेचे शहरप्रमुख महेश संपतराव नागवे यांनी आपल्या सहकाऱ्यांसह आज शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. शिवसेनेचे उपनेते तथा जालना विधानसभा मतदारसंघाचे आमदार अर्जुन खोतकर यांच्या उपस्थितीत भाग्यनगर येथील दर्शना बंगल्यावर छोटेखानी हा पक्षप्रवेश पार पडला.

यावेळी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी महेश नागवे व त्यांच्या सहकाऱ्यांचे शिवसेना पक्षात स्वागत करत त्यांचे अभिनंदन केले. शिवसेना पक्षप्रमुखांच्या विचारांवर विश्वास ठेवून पक्षात दाखल झालेल्या सर्व कार्यकर्त्यांचे त्यांनी स्वागत केले. तसेच आगामी काळात पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने कार्य करावे, असे आवाहन केले.या पक्षप्रवेशामुळे जालना शहरातील शिवसेनेच्या संघटनात्मक बळात निश्चितच वाढ होणार असून युवकांमध्ये पक्षाची ताकद आणखी वाढेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. या प्रसंगी युवा सेनेचे सचिव अभिमन्यू खोतकर यांची प्रमुख उपस्थिती होती. शिवसेनेत प्रवेश करणाऱ्यांमध्ये मनसे विद्यार्थी सेनेचे शहरप्रमुख महेश संपतराव नागवे यांच्यासह प्रदीप जाधव, अमोल चौधरी, अभिषेक माने, कृष्णा ढोबळे, कृष्णा खराद, सोनाजी पडोळे, राम लोहकरे, बालाजी चोरमारे, सौरभ नन्नवरे, यश वालेकर आणि किशोर लाबदे यांचा समावेश होता.यावेळी उपस्थित शिवसैनिकांनी देखील नव्याने प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांचे स्वागत करून त्यांना पुढील राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## जालना ते लंडन थारमधून ऐतिहासिक कार प्रवास; बजाज दाम्पत्याचा भास्कर दानवे यांनी केला सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**



जालना शहरातील हौशी कारचालक राजेश बजाज व सौ. सोनी बजाज यांनी आपल्या थार गाडीने जालना ते लंडन असा ऐतिहासिक व प्रेरणादायी कार प्रवास यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल भाजप महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी त्यांच्या निव-ासस्थानी भेट देऊन त्यांचा सत्कार केला. यावेळी बजाज दाम्पत्याशी संवाद साधताना त्यांनी या ७१ दिवसांच्या आंतरराष्ट्रीय प्रवासातील विविध अनुभव सांगितले. भारतासह १९ देशांमधून तब्बल १७,६८३ किलोमीटरचे अंतर त्यांनी स्वतः वाहन चालवत पूर्ण केले. या मोहिमेसाठी त्यांनी मागील तीन वर्षांपासून आवश्यक नियोजन, कागदपत्रांची पूर्तता, वाहनाची तयारी तसेच विविध देशांतील वाहतूक नियमांचा सखोल अभ्यास केला होता. एडव्हेंचर्स ओव्हरलँड, गुरुग्राम यांच्या वतीने आयोजित ही मोहीम १४ एप्रिल ते १९ जून २०२६ या कालावधीत पार पडली. जालन्यातील लोखंडी पुलावरून प्रवासाला प्रारंभ झाल्यानंतर गोरखपूर येथून अधिकृत मोहिमेला सुरुवात झाली. भारत, नेपाळ, चीन, किर्गिस्तान, उझबेकिस्तान, कझाकस्तान, रशिया, जॉर्जिया, तुर्किये, बल्गेरिया, सर्बिया, क्रोएशिया, हंगेरी, स्लोव्हाकिया, झेकिया, जर्मनी, नेदरलँड्स, बेल्जियम आणि फ्रान्स असा प्रवास करत त्यांनी १९ जून रोजी लंडन गाठले. या प्रव-ासादरम्यान विविध देशांतील भाषा, हवामान, सीमाशुल्क प्रक्रिया आणि वाहतूक नियमांचा त्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला. चीनमध्ये उजव्या बाजूने वाहन चालविण्याच्या पद्धतीमुळे काही आव्हाने निर्माण झाली होती. मात्र आत्मविश्वास आणि अनुभवाच्या बळावर त्यांनी ती यशस्-वीपणे पार केली. तसेच सौ. सोनी बजाज यांनी सुमारे २,००० किलोमीटर वाहन चालवत या मोहिमेत महत्त्वपूर्ण योगदान दिले. यावेळी भास्कर आबा दानवे यांनी बजाज दाम्पत्याचे अभिनंदन करत, जालना शहराचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर अभिमानाने पोहोचविणारे हे यश संपूर्ण जिल्ह्यासाठी गौरवाची बाब आहे. त्यांच्या जिद्द, नियोजन आणि चिकाटीमुळे अनेक युवकांना मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा मिळेल, असे सांगितले. याप्रसंगी भाजपा जिल्हाउ-पाध्यक्ष सिद्धिविनायक मुळे,नगरसेवक अर्जुन गेही,राजेश जोशी,नागेश अंभोरे व बजाज कुटुंबीय उपस्थित होते.



## सातोना येथे पोलिसांची कारवाई

### अवैध विदेशी दारूचा साठा केला जप्त, एकास अटक

**तभा वृत्तसेवा**
**परतूर । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात अवैध दारूविक्री व वाहतुकीविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेला यश मिळाले असून, परतूर पोलिसांनी सातोना परिसरात कारवाई करत ८६ हजार रुपयांचा विदेशी दारूसाठा आणि वाहतुकीसाठी वापरलेली मोटारसायकल जप्त केली आहे. या प्रकरणी एका आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक तेघबीरसिंह संधु, अप्पर पोलीस अधीक्षक विक्रम साळी, उपविभागीय पोलीस अधिकारी आणि पोलीस निरिक्षक सुदाम भागवत यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरिक्षक जंजाळ, पोहेकॉ अशोक गाढवे, पोकॉ हाडे,गायकवाड यांनी केली.

पोलीसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे सातोना बीटचे जमादार अशोक गाढवे व त्यांच्या पथकाने सातोना गावाजवळ दुपारी सुमारे २.३० वाजण्याच्या सुमारास सापळा लावत मोटारसायकलवरून संशयास्पदरीत्या येणाऱ्या व्यक्तीला अडवून तपासणी केली असता, त्याच्या ताब्यातील पांढऱ्या रंगाच्या प्लास्टिक पिशवीत 'देशी दारू भिंगरी संत्रा' या ब्रँडच्या ४८ बाटल्यांचे सहा बॉक्स आढळून आले. पोलिसांनी शुभम उद्धवराव कदम (वय २७, रा. देवळ-गाव, ता. सेलू, जि. परभणी) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून सुमारे २१ हजार रुपयांचा दारूसाठा तसेच ६५ हजार रुपये किमतीची होंडा एसपी शाईन (एमएच-२२-बीबी-०३२८) मोटारसायकल असा एकूण ८६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५(अ)(ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल अशोक गाढवे हे करीत आहेत.

## ग्रामपंचायत संगणक परिचालकांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावा

### आ.बबनराव लोणीकर यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे बैठक घेण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

राज्यातील ग्रामपंचायतींमध्ये मागील १४ वर्षांपासून कार्यरत असलेल्या सुमारे २० हजार संगणकपरिचालकांचा कर्मचारी दर्जा, किमान वेतन आणि नियमित मानधनाचा प्रश्न तातडीने सोडवावा, यासाठी माजी मंत्री तथा परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक आयोजित करून न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य संगणकपरिचालक संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, राज्यातील सुमारे २८ हजार ५०० ग्रामपंचायतींमध्ये कार्यरत संगणकपरिचालक ग्रामीण भागातील जवळपास ७ कोटी नागरिकांना विविध ऑनलाइन व ऑफलाइन शासकीय सेवा उपलब्ध करून देत आहेत. मात्र एवढी महत्त्वाची जबाबदारी पार पाडूनही त्यांना अत्यल्प मानधन मिळते आणि तेही अनेकदा सहा-सहा महिने रखडते. त्यामुळे आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कठीण झाले आहे.

संघटनेने यावलकर समितीने ३० मे २०१८ रोजी सादर केलेल्या अहवालाचा तसेच ११ जानेवारी २०२३ रोजी तत्कालीन ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतील निर्णयांचा उल्लेख करत संगणकपरिचालकांना ग्रामपंचायत कर्मचारी दर्जा व किमान वेतन देण्याची मागणी पुन्हा अधोरेखित केली आहे. निवेदनानुसार, २०२४ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी 'आपले सरकार सेवा केंद्र' प्रकल्पासाठी राज्याच्या निधीतून वार्षिक ३३६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार असल्याची घोषणा केली होती. तसेच १० ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत यासंदर्भात निर्णय झाल्याचेही सामाजिक माध्यमांतून प्रसारित करण्यात आले होते. मात्र, ११ ऑक्टोबर २०२४ रोजी ग्रामविकास विभागाने काढलेल्या शासन निर्णयात कर्मचारी दर्जा, किमान वेतन किंवा ३३६ कोटी रुपयांच्या निधीचा कोणताही उल्लेख करण्यात आला नाही. याबाबत संघटनेने त्याच दिवशी शुद्धीपत्रक काढण्याची मागणी केली होती. तथापि, त्यावर कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. उलट ५ ऑगस्ट २०२५ रोजी संबंधित शासन निर्णय रद्द करण्यात आल्याने संगणकपरिचालकांवर अन्याय झाल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.

संघटनेने शासनाला आणखी एक महत्त्वाची आठवण करून देताना म्हटले आहे की, १६ मार्च २०२४ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत ग्रामपंचायतींकडून मानधन न मिळाल्यास शासनाकडून ती रक्कम अदा करण्याची हमी देण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात आजही संगणकपरिचालकांना नियमित मानधन मिळत नसल्याने प्रत्येक वेळी निवेदने व आंदोलने करावी लागत आहेत.

राज्यातील संगणकपरिचालकांना ग्रामपंचायत कर्मचारी दर्जा, किमान वेतन तसेच किमान १० हजार रुपयांचे मानधन प्रत्येक महिन्याला निश्चित तारखेला देण्याबाबत तातडीने निर्णय घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करावी, अशी मागणी संघटनेने आमदार बबनराव लोणीकर यांच्यामार्फत राज्य शासनाकडे केली आहे. या प्रसंगी अशोक चव्हाण, विष्णू ढोबळे, प्रल्हाद गोरे, केशव लहाडे, मारोती घोरबंड, नारायण सोळंके, राम सुपेकर, भरत कव्हळे, रामेश्वर मुरकुटे, दिपक खवणे, मोहन राठोड, किरतेस वाडकर यांच्या सह शेकडो ग्रामपंचायत चे संगणक चालक उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...

### नांदेड-मुंबई आणि टनकपूर-नांदेड दोन नवीन एक्सप्रेस गाड्यांचा ६ जुलैला शुभारंभ : मुख्यमंत्री, रेल्वेमंत्री यांच्या हस्ते व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे हिरवा झेंडा; रेल्वे संपर्काला नवी गती

**परभणी,/प्रतिनिधी :** नांदेडच्या रेल्वे संपर्क सुविधेत भर घालत नांदेड-मुंबई आणि टनकपूर-नांदेड या दोन नवीन एक्सप्रेस गाड्यांचा शुभारंभ ६ जुलै २०२६ रोजी करण्यात येणार आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी आणि केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे या गाड्यांना हिरवा झेंडा दाखविण्यात येणार आहे.

या कार्यक्रमात केंद्रीय राज्यमंत्री रवनीत सिंह, जितिन प्रसाद आणि अजय टम्टा हेही ऑनलाइन सहभागी होणार आहेत. हजूर साहिब नांदेड रेल्वे स्थानकावर होणाऱ्या स्थानिक कार्यक्रमास मंत्री अतुल सावे, खासदार अशोक चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, खासदार रवींद्र चव्हाण, हेमंत पाटील, महापौर कविता मुळे तसेच विविध लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

नवीन गाड्यांपैकी नांदेड-मुंबई-नांदेड एक्सप्रेस आठवड्यातून दोन दिवस अकोला व मनमाड मार्गे धावणार असून त्यात आरक्षित आणि अनारक्षित दोन्ही प्रकारची प्रवास सुविधा उपलब्ध असेल. टनकपूर-नांदेड साप्ताहिक एक्सप्रेस नांदेडहून रविवारी तर टनकपूरहून मंगळवारी धावणार आहे.

या नवीन रेल्वे सेवांमुळे महाराष्ट्राला उत्तराखंडशी थेट रेल्वे संपर्क मिळणार असून पर्यटन, तीर्थयात्रा, व्यापार, शिक्षण व आरोग्य क्षेत्रातील प्रवास अधिक सुलभ होणार आहे. तसेच विद्यार्थ्यांना, व्यावसायिकांना, भाविकांना आणि पर्यटकांना सुरक्षित, आरामदायी व किफायतशीर प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार असल्याचे दक्षिण मध्य रेल्वेच्या जनसंपर्क विभागाने कळविले आहे.

### डॉ. ठोंबरे यांनी कृशि विद्यापीठाच्या संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि) पदाचा स्वीकारला पदभार

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठात संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि) पदाचा पदभार प्रा. डॉ. बाबासाहेब सुभद्राबाई माणिकराव ठोंबरे यांनी ३ जुलै रोजी स्वीकारला. त्यांच्या नियुक्तीमुळे कृषि शिक्षण, संशोधन आणि विस्तार कार्याला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील उंदरी येथील रहिवासी असलेले डॉ. ठोंबरे हे कृषि क्षेत्रातील अनुभवी शास्त्रज्ञ व प्रशासकीय अधिकारी म्हणून परिचित आहेत. गेल्या सुमारे ३० वर्षांपासून त्यांनी अध्यापन, संशोधन आणि विस्तार कार्याशी संबंधित विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळल्या आहेत. अंबाजोगाई कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य तसेच लातूर कृषी महाविद्यालय आणि विलासराव देशमुख कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे अधिष्ठाता म्हणून कार्यरत असताना त्यांनी शैक्षणिक सुविधा, परिसर विकास आणि पर्यावरण संवर्धनासाठी उल्लेखनीय कार्य केले. ङ्गऑक्सिजन हबफ, ङ्गअटल घनवनफ, योगा पार्क तसेच सुमारे तीन लाख वृक्षांच्या लागवड व संवर्धनाचे उपक्रम राबवून त्यांनी विशेष ठसा उमटविला.

डॉ. ठोंबरे यांनी देशी गोवंश, म्हैसवर्ग तसेच शेळी-मेंढी पालन या विषयांवर संशोधन केले आहे. शेतकरी प्रशिक्षण, चर्चासत्रे, दूरदर्शन, आकाशवाणी आणि विविध प्रकाशनांच्या माध्यमातून त्यांनी कृषि व पशुसंवर्धनविषयक माहिती ग्रामीण भागातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ११ पीएच.डी. आणि ५२ पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी संशोधन पूर्ण केले आहे. त्यांच्या ११५ संशोधनपर लेखांचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये प्रकाशन झाले असून त्यांनी ११ पुस्तकेही प्रकाशित केली आहेत.

सामाजिक क्षेत्रातही त्यांनी ङ्गकर्मयोगी डॉ. बालासाहेब ठोंबरे पाटील स्मृती प्रतिष्ठानफच्या माध्यमातून शेतकरी सन्मान, वृक्षारोपण, आरोग्य शिबिरे, शैक्षणिक उपक्रम आणि विविध क्षेत्रांतील गुणवंतांचा गौरव यांसारखे उपक्रम राबविले आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना 'मातोश्री संजीवनी श्रीराम कदम स्मृती तुकया बंधू कुटुंबभूषण पुरस्कार', महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी राष्ट्रीय सेवा योजना पुरस्कार, भारतीय कृषी संशोधन परिषदेचा सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कार, जीवनगौरव पुरस्कार, सुंदरलाल बहुगुणा पुरस्कार, उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार, 'कृषि माऊली' आणि 'मराठवाडा आयकॉन' यांसह अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. ठोंबरे यांच्या नियुक्तीबद्दल वनामकृवि चे कुलगुरू प्रा. डॉ. इंद्र मणी, संचालक संशोधन डॉ. भगवान आसेवार, माजी संचालक संशोधन डॉ. खिजर बेग, संचालक विस्तार डॉ. राकेश आहिरे, कुलसचिव पुरभा, आंबा साखर कारखान्याचे अध्यक्ष रमेशराव आडसकर, नगराध्यक्ष नंदकिशोर मुंडडा, माजी आमदार पृथ्वीराज साठे तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### १९ वर्षांनंतर आंदोलनकर्त्यांची निर्दोष मुक्तता : २००७ मधील वसमत रोडवरील आंदोलन प्रकरण; ११ कार्यकर्त्यांना न्यायालयाचा दिलासा

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणीतील वसमत रोड येथे २००७ साली झालेल्या आंदोलनादरम्यान दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याप्रकरणी तब्बल १९ वर्षांनंतर न्यायालयाने ११ आंदोलनकर्त्यांची निर्दोष मुक्तता केली आहे. या निर्णयामुळे दीर्घकाळ न्यायालयीन लढा देणाऱ्या कार्यकर्त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

या प्रकरणाबाबत आंदोलनकर्त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, २००७ मध्ये विविध मागण्यांसाठी वसमत रोड येथे आंदोलन करण्यात आले होते. आंदोलनकर्त्यांचा आरोप आहे की, त्यांच्या मागण्यांवर चर्चा करण्याऐवजी पोलिसांनी आंदोलनस्थळी लाठीचार्ज केला. या कारवाईत अनेक कार्यकर्ते जखमी झाले होते. तसेच काही पोलिस कर्मचारी जखमी झाल्याचा आरोप करत आंदोलनकर्त्यांविरोधात गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले होते. सदर प्रकरणात आंदोलनकर्त्यांकडून गोफण जप्त केल्याचे दाखवून विविध कलमांखाली गुन्हे नोंदविण्यात आले. त्यानंतर संबंधित कार्यकर्त्यांना रात्री न्यायालयात हजर करण्यात आले होते. पोलिसांकडून कोठडीची मागणी करण्यात आली होती. मात्र न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला होता. त्यानंतर किर्तीकुमार बुरांडे विरुद्ध राज्य सरकार या नावाने न्यायालयीन प्रक्रिया सुरू राहिली. जवळपास १९ वर्षे या प्रकरणाची सुनावणी सुरू होती. या कालावधीत काही आरोपींचे निधन झाले, काही जण वयोमानामुळे अशक्त झाले, तर काही जण रोजगारासाठी परभणीबाहेर स्थायिक झाले. मात्र प्रमुख ११ कार्यकर्त्यांनी नियमितपणे न्यायालयीन लढा सुरू ठेवला.

# रस्ता हा गावाला विकासाशी जोडणारा दुवा असतो - आ.डॉ.रत्नाकर गुट्टे

## मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतंर्गत विविध रस्त्यांचे भूमिपूजन

**मोहन धारासूरकर**

**परभणी ,/प्रतिनिधी:-** ग्रामीण भागातील अनेक नागरिकांनी वर्षानुवर्षे खराब रस्त्यांचा त्रास सहन केला आहे. विशेषत: पावसाळ्यात वाहतुकीची होणारी अडचण, विद्यार्थ्यांचे शिक्षण, शेतकऱ्यांच्या मालाची बाजारपेठेत ने-आण, रुग्णांना वेळेत उपचारासाठी पोहोचविण्याची धडपड आणि दैनंदिन जीवनातील अनेक अडचणी आपण अनुभवलेल्या आहेत. आज त्या अडचणी दूर करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल टाकले जात आहे. कारण शिक्षण, आरोग्य, शेती, व्यापार, उद्योग, रोजगार आणि सामाजिक प्रगती या सर्वांचा पाया सक्षम रस्ते व्यवस्थेवर उभा असतो. त्यामुळे रस्ता हा केवळ माती, दगड आणि डांबराचा पट्टा नसतो, तर तो गावाला विकासाशी जोडणारा दुवा असतो, असे प्रतिपादन स्थानिक आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे यांनी केले.



तालुक्यातील विविध गावांमध्ये मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतंर्गत प्रमुख मार्गावरील प्रस्तावित रस्त्यांच्या कामांचे भूमिपूजन आ.डॉ.गुट्टे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. त्यामध्ये मौजे.उंडेगाव येथील राज्यमार्ग २३४ ते उंडेगाव, मौजे. कुंडगीरवाडी येथील राज्य मार्ग २५१ ते कुंडगीरवाडी ते रेवतांडा, मौजे.धारासूर येथील राज्य मार्ग २४८ ते धारासूर, मैजे.देगाव, (ता: पूर्णा) येथील राज्यमार्ग २४१ देगाव ते जिल्हा सरहद्द रस्त्याची सुधारणा करणे आदी कामांचा समावेश आहे. यावेळी आपल्या गंगाखेड विधानसभा मतदारसंघात दर्जेदार पध्दतीने पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

पुढे बोलताना आ.डॉ. गुट्टे म्हणाले की, मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत विविध रस्ते दुरुस्ती कामांच्या भूमिपूजनासाठी आपण एकत्र आलो आहोत. हा केवळ भूमिपूजनाचा कार्यक्रम नाही, तर ग्रामीण विकासाच्या नव्या पर्वाची सुरुवात आहे. कारण एखाद्या प्रदेशाच्या विकासाचा पाया हा त्या भागातील रस्त्यांवर उभा असतो. रस्ता हा फक्त एका गावाला दुसऱ्या गावाशी जोडत नाही, तर तो माणसांच्या आशा, स्वप्ने, अर्थकारण आणि विकासाला जोडणारा महत्त्वाचा दुवा असतो. त्यामुळे नियोजित असलेली ही सर्व कामे राज्य शासनाच्या विकासाभिमुख धोरणांची साक्ष आहेत. मात्र कोणतेही विकासकाम टिकाऊ होण्यासाठी त्याची गुणवत्ता, पारदर्शकता आणि वेळेत पूर्तता तितकीच महत्त्वाची आहे. त्यामुळे ही कामे दर्जेदार होतील, याकडे विशेष लक्ष देणे ही लोकप्रतिनिधी, अधिकारी, कंत्राटदार आणि नागरिक या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.

मुख्यमंत्री ग्रामसडक योजना ही ग्रामीण भागाला सक्षम पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचा दूरदृष्टीचा विचार आहे. शहर आणि गाव यांच्यातील विकासाची दरी कमी करण्यासाठी अशा योजना अत्यंत महत्त्वाच्या ठरतात. विकासाचा अधिकार हा प्रत्येक नागरिकाचा आहे आणि तो प्रत्येक गावापर्यंत पोहोचला पाहिजे, हीच या योजनेमागील व्यापक भावना आहे. तसेच सर्वांगीण विकासाचा मार्ग नेहमीच सहकार्य, एकोप्याची भावना आणि सकारात्मक विचारातून तयार होत असतो. मतभेद असू शकतात, पण गावाच्या विकासाच्या प्रश्नावर आपण सर्वांनी एकत्र उभे राहणे, हीच खरी लोकशाहीची ताकद आहे, असेही आ.डॉ.गुट्टे यांनी नमूद केले.

### ...तर ही सर्वांची नैतिक आणि सामाजिक जबाबदारी!

**कोणत्याही कामामध्ये पारदर्शकता, गुणवत्ता आणि वेळेचे महत्त्व अत्यंत मोठे आहे. त्यामुळे नियोजित सर्व रस्ते हे उच्च दर्जाचे, टिकाऊ आणि निर्धारित कालावधीत पूर्ण व्हावेत, ही प्रत्येक नागरिकाची अपेक्षा आहे. शिवाय सार्वजनिक निधी हा जनतेचा विश्वास असतो. त्यामुळे प्रत्येक रुपयाचा योग्य वापर होणे ही सर्व संबंधितांची नैतिक आणि सामाजिक जबाबदारी आहे. कारण रस्ते गावांना जोडतात, पण विकास मनांना जोडतो. त्यामुळे प्रस्तावित सर्व रस्ते हे सर्वांगीण विकासाचा, सामाजिक प्रगतीचा आणि आर्थिक समृद्धीचा नवा अध्याय ठरतील, असाही विश्वास आ.डॉ.गुट्टे यांनी आवर्जून व्यक्त केला.**

कोणत्याही गावाचा विकास केवळ शासनाच्या निधीवर होत नाही, तर लोकसहभाग, लोकप्रतिनिधींचे प्रयत्न, प्रशासनाची कार्यक्षमता आणि ग्रामस्थांची सकारात्मक भूमिका यांच्याही एकत्रित योगदानातून होत असतो. विकास ही सामूहिक जबाबदारी आहे. त्यामुळे हा रस्ता पूर्ण झाल्यानंतर त्याचे जतन आणि संवर्धन करण्याची जबाबदारीही आपलीच आहे, असेही आ.डॉ. गुट्टे यांनी आवर्जून स्पष्ट केले. यावेळी समाज कल्याण सभापती लक्ष्मण मुंडे, पंचायत समिती विजय मुंडे, रामभाऊ देवकते यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच गुट्टे काका मित्र मंडळाचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## संत गजानन महाराज पालखीचे परभणी जिल्ह्यात भक्तिभावाने स्वागत

**परभणी ,/प्रतिनिधी-:** श्रीक्षेत्र शेगाव येथून पंढरपूरच्या आषाढी वारीसाठी निघालेल्या संत गजानन महाराजांच्या पालखीचे शनिवारी (दि. ४) परभणी जिल्ह्यात विविध ठिकाणी भक्तिमय वातावरणात उत्साहाने स्वागत करण्यात आले. पालखीच्या आगमनाने संपूर्ण परिसर 'गण गण गणात बोते'च्या जयघोषाने दुमदुमून गेला.

पालखी मार्गावरील विविध गावांमध्ये ग्रामस्थ व भाविकांनी फुलांची उधळण करून पालखीचे स्वागत केले. वारकऱ्यांसाठी महाप्रसाद, पिण्याच्या पाण्याची तसेच वैद्यकीय सेवेची व्यवस्था करण्यात आली होती. पालखीच्या दर्शनासाठी मार्गावर हजारो भाविकांनी गर्दी केली होती. पालखीसोबत मोठ्या संख्येने वारकरी, टाळकरी, मृदंगवादक आणि पताकाधारी सहभागी झाले होते. अखंड हरिनाम, भजन-कीर्तन आणि अभंग गायनामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिकांनीही मोठ्या उत्साहाने वारीत सहभाग नोंदविला.

परभणी जिल्ह्यातील विविध सामाजिक संस्था, ग्रामस्थ आणि स्वयंसेवकांनी वारकऱ्यांच्या सेवेसाठी पुढाकार घेत अन्नदान, निवास व आरोग्य सुविधांची व्यवस्था केली. प्रशासन आणि पोलिस विभागाकडून वाहतूक व सुरक्षा व्यवस्थेचेही नियोजन करण्यात आले होते. संत गजानन महाराजांची पालखी दरवर्षी आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरकडे प्रस्थान करते. यंदाही शेकडो वारकऱ्यांच्या सहभागातून पालखी भक्तिभावाने मार्गक्रमण करीत असून परभणी जिल्ह्यातील आगमनामुळे भाविकांमध्ये विशेष उत्साह आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे...

## पोलिस ठाण्यात धडक, कारवाईची मागणी

## मानधनीत अवैध दारु विरोधात महिलांचा संतप्त मोर्चा

**परभणी,/प्रतिनिधी-:** जिंतूर तालुक्यातील मानधानी गावात सुरू असलेल्या कथित अवैध दारूविक्रीमुळे गावातील सामाजिक वातावरण बिघडत असून महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचा आरोप करत संतप्त महिलांनी शुक्रवारी ३ जुन संध्याकाळी ०६ च्या सुमारास जिंतूर पोलीस ठाण्यात धडक दिली. पोलीस निरीक्षक नामदेव रेड्डी यांची भेट घेऊन गावातील अवैध दारूविक्री तातडीने बंद करण्याची मागणी करण्यात आली.

महिलांनी दिलेल्या निवेदनानुसार, जिंतूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मानधानी गावात भोगाव येथील एक युवक कथितपणे अवैधरीत्या दारू आणून विक्री करत आहे. त्यामुळे गावातील काही अल्पवयीन युवक तसेच अनेक नागरिक दारूच्या आहारी जात असून नशेमुळे महिलांना मानसिक व शारीरिक त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचा आरोप महिलांनी केला. गावातील शांतता व सामाजिक वातावरण बिघडत असल्याने अनेक महिला एकत्र येत जिंतूर पोलीस ठाण्यात पोहोचल्या. पोलीस निरीक्षक नामदेव रेड्डी यांच्या दालनात त्यांनी आपली व्यथा मांडत अवैध दारूविक्री तातडीने बंद करण्याची मागणी केली. संबंधितांवर कठोर कारवाई करून गाव दारूमुक्त करण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

यावेळी महिलांनी स्पष्ट इशारा देत सांगितले की, अवैध दारूविक्री त्वरित बंद झाली नाही तर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. त्यामुळे गावात कायदा व सुव्यवस्था बिघडण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी करण्यात आली.

महिलांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर पोलीस निरीक्षक नामदेव रेड्डी यांनी प्रकरणाची गंभीर दखल घेत संबंधितांवर तातडीने कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिल्याची माहिती मिळाली. त्यानंतर महिलांनी समाधान व्यक्त करत आपल्या गावाकडे प्रस्थान केले.



# कृषि विद्यापीठाला दुसऱ्या अधिकृत ड्रोन प्रशिक्षण केंद्राची मान्यता

## नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडून २०३६ पर्यंत मान्यत

**परभणी,/प्रतिनिधी-:** येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाने कृषि क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञानाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकत आणखी एक यश संपादन केले आहे. भारत सरकारच्या नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने विद्यापीठातील नाहेप-डीएफएसआरडीए सेंटर ऑफ एक्सलन्स अंतर्गत सुरू होणाऱ्या दुसऱ्या रिमोट पायलट ट्रेनिंग ऑर्गनायझेशन ड्रोन प्रशिक्षण केंद्रास सन २०३६ पर्यंत अधिकृत मान्यता प्रदान केली आहे.

विद्यापीठातील हे दुसरे अधिकृत ड्रोन प्रशिक्षण केंद्र असून यापूर्वीचे केंद्र कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयात कार्यरत आहे. त्यामुळे आता विद्यापीठात अधिकृत ड्रोन पायलट प्रशिक्षण अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. ड्रोन नियम-२०२१ मधील नियम ३९ अंतर्गत जारी करण्यात आलेल्या प्रमाणपत्रानुसार या केंद्रास रोटरक्राफ्ट-आरपीएएस प्रकारातील स्मॉल व मीडियम वर्गाच्या ड्रोनसाठी व्हीएलएएस अंतर्गत दिवस आणि रात्र प्रशिक्षण देण्यास मान्यता मिळाली आहे. ही मान्यता नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाचे सहसंचालक मनीष कुमार यांच्या स्वाक्षरीने निर्गमित करण्यात आली आहे.

सध्या कृषिक्षेत्रात ड्रोनचा वापर पीक संरक्षण फवारणी, खत व्यवस्थापन, सर्वेक्षण, पीक निरीक्षण, नकाशांकन तसेच अचूक शेतीसाठी मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाला प्राप्त झालेली ही मान्यता मराठवाडा तसेच राज्यातील कृषि शिक्षण, संशोधन आणि कौशल्य विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मानले जात आहे.

या यशाबद्दल विद्यापीठाचे शिक्षण संचालक, संशोधन संचालक, विस्तार शिक्षण संचालक, कुलसचिव, विद्यापीठ नियंत्रक, विद्यापीठ अभियंता, विविध महाविद्यालयांचे अधिष्ठाता, प्राध्यापक आणि कर्मचारी यांनी सेंटर ऑफ एक्सलन्सचे प्रमुख डॉ. गोपाळ शिंदे व त्यांच्या संपूर्ण टीमचे अभिनंदन केले आहे. डिजिटल एक्स्टेंशन तज्ज्ञ डॉ. प्रवीण कापसे आणि डॉ. शंकर पुरी यांनीही शुभेच्छा दिल्या.

**सेंटर ऑफ एक्सलन्सच्या कार्याची राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल....**

डॉ. गोपाळ शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकल्पांतर्गत आतापर्यंत १५ हजारांहून अधिक शेतकरी, विद्यार्थी, संशोधक आणि शिक्षकांना प्रशिक्षण, संशोधन व लघु प्रकल्पांसाठी सहाय्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. या उपक्रमामुळे विद्यापीठाच्या तांत्रिक गुणवत्तेत लक्षणीय वाढ झाली आहे. सेंटर ऑफ एक्सलन्सने एग्रीबॉट, एग्रीड्रोन, एग्री-एजीव्ही, सेन्सर प्रणाली, इंटरनेट ऑफ थिंग्स, कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, डीप लर्निंग आणि डेटा सायन्स या क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केले आहे. राज्य, देश आणि विदेशातील ५५ हून अधिक संशोधक विद्यार्थ्यांनी येथे एक ते तीन महिन्यांच्या कालावधीत प्रशिक्षण व संशोधन पूर्ण केले असून त्यांच्या माध्यमातून १५० हून अधिक संशोधन प्रबंध आणि पुस्तके प्रकाशित झाली आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध पुरस्कार, संशोधन परिषद, कार्यशाळा आणि तज्ज्ञ समित्यांमधील नेतृत्वाच्या माध्यमातून या केंद्राने विद्यापीठाच्या नावाला नवी उंची प्राप्त करून दिली असल्याचेही डॉ. शिंदे यांनी नमूद केले.

रोखठोक

# भरकटणाऱ्या भविष्याचे भय

दिनेश गुणे

बेभरवशी आणि अनिश्चित आयुष्य वाट्याला येण्याची जी काही कारणे आजकालच्या युवा पिढीसमोर आव्हान होऊन उभी राहिली आहेत, त्यामध्ये बेरोजगारी, गरिबी आणि अंधारमय भविष्याचे भय या कारणांचा महत्त्वाचा वाटा आहे. कोणाही युवकाच्या उमेदीच्या वयात त्याच्या नजरेसमोर एका सुखी, समाधानी भविष्याचे स्वप्न तरळत असते. ते स्वप्न साकार व्हावे यासाठी त्याचे सदैव प्रयत्न सुरू असतात. त्या ध्येयाने पछाडलेला प्रत्येक युवक त्यासाठी स्वतःची पात्रता सिद्ध करण्यासाठी धडपडत असतो आणि अशी पात्रता प्राप्त झाल्याचा विश्वास मनात रुजला, की भविष्याचे स्वप्न मुठीत पकडण्याचा प्रयत्न सुरू करतो. हा त्याच्या आशावादाचा काळ असतो. या काळात नशीब सोबत असेल, तर त्याचे भविष्य उजळते आणि एखाद्या बेसावध क्षणाची शिकार होऊन नशिबाचे फासे उलटे पडलेच, तर मात्र त्याला अनिश्चित आणि बेभरवशी आयुष्याच्या खडतर वाटचालीशी सामना करावा लागतो. आपल्या आसपास अशा हजारो तरुणांच्या फौजा भविष्य घडविण्याची साधने हाती मिळविण्यासाठी धडपडत असताना आणि त्यासाठी कोणत्याही आव्हानास सामोरे जाण्याची मानसिक व शैक्षणिक तयारी करत असताना, त्यांना गळाला लावून त्यांची पिळवणूक करण्याचा एक अमानवी धंदा गेल्या काही दशकांपासून देशात आणि बहुधा जगातील अनेक देशांत सुरू आहे. मानवी तस्करी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या अमानवी धंद्याची शिकार होणाऱ्यांमध्ये केवळ तरुणच नव्हेत, तर बालके, महिलांचीदेखील अमानुष पिळवणूक होत असून भविष्य तर पुसले जातेच, पण वर्तमानाविषयीच्या अपेक्षांचाही चक्काचूर होऊन त्यांची आयुष्ये केवळ भकास होतात. अशी अनेक प्रकरणे देशाच्या कानाकोपऱ्यात उघडकीस येऊ लागली असून त्यांचे बळी ठरलेल्यांना न्याय मिळावा यासाठी अधूनमधून उमटणारे आवाजदेखील दुबळे ठरावेत अशा ताकदीने हा अमानवी व्यवहार अखंडपणे सुरू आहे. गेल्या काही दशकांत हजारो माणसे या तस्करीला बळी पडून उद्ध्वस्त झाली. त्यांचे भविष्य तर संपलेच, पण मानवी समूहाशी असलेल्या त्यांच्या नात्यांचे धागेदेखील तोडून मानवी जगाच्या या अनैतिक व्यवहारांनी त्यांचा अक्षरशः मानसिक बळी घेतला आहे.

राष्ट्रीय महिला आयोगाच्या वेबसाईटवर एक विशेष पान पाहावयास मिळते. या पानांवरील मजकूर धक्कादायक आहेच, पण ही समस्या गेल्या अनेक वर्षांपासून दिवसागणिक अधिक गंभीर होत चालली आहे याचीही या मजकुरावरून जाणीव होते. अनिवासी भारतीय व्यक्तींसोबतच्या विवाहातून उद्भवलेल्या या समस्येत गेल्या काही वर्षांत ४० हजारांहून अधिक महिलांच्या आयुष्याची अक्षरशः धूळधाण झाली असून त्यांचे भविष्य अंधारमय झाले आहे. यापैकी अनेक महिला न्यायासाठी झगडत आहेत, तर अनेकींनी न्यायाची अपेक्षादेखील सोडून दिली आहे. मोदी सरकार केंद्रात सत्तेवर आल्यानंतर या समस्येची सोडवणूक करण्यासाठी प्रत्यक्षात गांभीर्याने काही हालचाली झाल्यात. दिवंगत सुषमा स्वराज या परराष्ट्र व्यवहार मंत्री असताना काही समस्याग्रस्त महिलांची कैफियत त्यांच्यासमोर मांडली गेली आणि अशा प्रकरणांना आळा घालण्यासाठी राष्ट्रीय महिला आयोगाने हा विशेष अनिवासी भारतीय कक्ष सुरू केला. देशाच्या अनेक भागांतील महिलांचे भविष्य या प्रकारात अस्थिर झालेच, पण विशेषतः पंजाबमधील ३५ हजारांहून अधिक महिलांची परदेशात नोकरी, व्यवसाय करणाऱ्या मुलांसोबत संसार थाटण्याची व सुखी जीवनाची स्वप्ने उद्ध्वस्त झाली आहेत. या महिलांना त्यांच्या अनिवासी पतीने बेकायदेशीरपणे किंवा फसवणूक करून वाऱ्यावर सोडले आहे. परदेशातील कायद्यांचा अपुरा आधार, कायद्याविषयीचे अज्ञान, सामाजिक प्रतिष्ठेपोटी वाच्यता न करण्याची मानसिकता यामुळे या महिला कुढत राहिल्या आहेत. आपल्या मुलीला परदेशातील संपन्न आयुष्य जगणारा पती मिळावा आणि तिचे भविष्य उजळावे या आशेने अनेकदा आईवडील घाईघाईने मुलीचा विवाह एखाद्या अनिवासी मुलाशी लावून देतात आणि लग्नानंतर काही दिवसांतच परदेशी परतलेला पती आपल्या पत्नीशी संपर्कच तोडून टाकतात. अशा प्रकरणांत लग्नातून मिळालेला हुंडा व भरमसाट संपत्ती लुटण्याचा स्वार्थी हेतू असतो, हे उघड आहे. एकदा संपत्ती आणि पैसा हाती आला, की अनिवासी पती परदेशात पळून जातो, वधू माहेरी अडकून पडते आणि पतीने सोडून दिलेली महिला असा सामाजिक कलंक माथी घेऊन या महिला आपले आयुष्य ढकलत राहतात. परदेशातील कायदे वेगळे असल्यामुळे घटस्फोट घेणे, पोटगी मागणे किंवा न्याय मिळविणेदेखील अवघड होते. त्यामुळे, फसवणूक झालेल्या महिलांनी भारतात तक्रार नोंदवली तरी आरोपी पतीचा शोध घेऊन त्याला भारतात परत आणणे, त्याच्यावर कायदेशीर कारवाई करणे या प्रक्रिया क्लिष्ट होतात आणि बनावट विवाहाद्वारे संपत्तीची लूट करून आयुष्ये उद्ध्वस्त करण्याचा खेळ सोपा होतो काही तरुण विवाहानंतर पत्नीस परदेशात घेऊन जातात आणि तेथे वेठबिगारीची कामे करण्यास भाग पाडतात असेही काही प्रकरणांत उघडकीस आले आहे. पंजाबमध्ये गेल्या काही वर्षांत सुमारे ३२ हजार महिलांना अनिवासी पतींनी सोडून दिल्याची धक्कादायक माहिती गेल्याच महिन्यात राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी पंजाबमधील एका कार्यक्रमात बोलताना उघड केली. एकट्या पंजाबमध्ये मोठ्या प्रमाणावर होणारा हा अनिवासी विवाह घोटाळा आटोक्यात आणणे हे सरकारसमोरील मोठे आव्हान बनले आहे.



पंजाबमधील अकालगढ येथील ही घटना अशा घोटाळ्याचे अस्तित्व अधोरेखित करणारी ठरते. अकालगढमधील एका कुटुंबाने आपल्या मुलीचा विवाह जर्मनीतील हॅम्बर्ग येथे राहणाऱ्या एका अनिवासी तरुणाशी ठरविला. विवाहानंतर आपल्या मुलीला जर्मनीत चांगले जीवन जगता येईल या आशेने हुंड्यासाठी सुमारे आडेआठ हजार डॉलर्सची रक्कम कर्ज घेऊन उभी केली आणि सोने, कपडे, महागडे फर्निचर भेट देऊन थाटामाटात विवाह सोहळा साजरा केला. लग्नानंतर लवकरच कागदपत्रांची आणि आवश्यक प्रक्रियांची पूर्तता करून पत्नीला घेऊन जाण्याचे आश्वासन देऊन पती जर्मनीस निघून गेला आणि माहेरी राहिलेली पत्नी पतीच्या प्रतीक्षेत जीवन जगू लागली. आपल्याशी विवाह केलेल्या तरुणाचे जर्मनीत लग्न झाले आहे आणि त्याला पत्नी व मुलेही आहेत, ही बाब लग्नानंतर आठ वर्षांनी तिला समजली, तेव्हा मानसिक धक्क्याने ती कोलमडून गेली होती. आता त्यांनी आपल्याला फसविणाऱ्या त्या अनिवासी व्यक्तीविरुद्ध पंजाबमधील एका न्यायालयात खटला दाखल केला आहे आणि न्यायाच्या प्रतीक्षेत त्या कोर्टाच्या पायऱ्या झिजवत प्रत्येक दिवस ढकलत आहेत.

एका बाजूला माणसांसोबत असे अमानवी वर्तन करून आर्थिक फसवणुकीचा धंदा करणाऱ्या अनिवासी व्यक्तींचे गुन्हे आव्हान म्हणून उभे असताना, संघटितपणे सुरू असलेली मानवी तस्करी हा मानवतेला लागलेला शाप पुसण्याचे आव्हानही अधिक खडतर होत आहे. यामागे मोठ्या आर्थिक उलाढालीत गुंतलेल्या आंतरराष्ट्रीय टोळ्यांचे हितसंबंध गुंतलेले असल्याने त्यांचा संपूर्ण बीमोड करणे अद्याप तरी शक्य झालेले नाही. त्यामुळे या धंद्याच्या जाळ्यात अडकलेल्यांचे भविष्य अक्षरशः वाऱ्यावर भरकटते आणि एखाद्या नशीबवानासच पुन्हा आपल्या आयुष्याची भरकटलेली दिशा पूर्वपदावर आणण्याची संधी मिळते. मानवी तस्करीमागे अनेक उद्देश असतात आणि त्यांच्या आंतरराष्ट्रीय व्यवहारात तस्करीच्या जाळ्यात अडकलेल्या माणसांची वस्तूच्या मोलाने खरेदी-विक्री होऊन त्यांचा वापर पुढे अनैतिक व बेकायदा आर्थिक गुन्हेगारीकरिता केला जातो हे आता गुपित राहिलेले नाही. आता या गुन्हेगारीला आणखी एक नवा मार्ग सापडला आहे. बेरोजगारीच्या आणि कौटुंबिक समस्यांच्या त्रासाने स्वास्थ्य हरवलेल्या तरुणांच्या फौजा जेव्हा भविष्याच्या शोधात भरकटत असतात, तेव्हा त्यांच्यावर आमिषांचे जाळे टाकून त्यांना भविष्याची सुंदर स्वप्ने दाखविणे आणि पुढे गळाला लागलेल्या प्रत्येकाची पिळवणूक करून त्यांच्या अस्तित्वाच्या खुणादेखील अनोळखी करून टाकणे हा या नव्या धंद्याचा राक्षसी मार्ग आहे आणि भविष्याच्या स्वप्नपूर्तीच्या आशेने किंवा अन्य कोणत्याही कारणाने एखाद्या बेसावध क्षणी त्यावर भरकटलेल्या असंख्य महिला, मुले, तरुणांची आयुष्ये उद्ध्वस्त झाली आहेत.

विकासाच्या स्पर्धेत देशाचे नेतृत्व करणारे राज्य म्हणून महाराष्ट्राकडे पाहिले जाते. तरीही या राज्यालादेखील मानवी तस्करीच्या भीषण समस्येचा मोठा डाग लागला आहे. सुमारे तीन वर्षांपूर्वी, मार्च २०२३ मध्ये देशाच्या लोकसभेतील कामकाजादरम्यानच्या चर्चेतून समोर आलेले एक वास्तव या चिंतेला पुष्टी देणारे आहे. त्याआधीच्या तीन वर्षांतील महाराष्ट्रातील मानवी तस्करीच्या उघडकीस आलेल्या प्रकरणांची एक गंभीर आकडेवारीच त्या दिवशी लोकसभेत केंद्रीय गृहराज्यमंत्र्यांनी सभागहासमोर मांडली. राष्ट्रीय गुन्हे नोंद शाखेचा अहवाल हा या आकडेवारीचा अधिकृत स्रोत असल्याने, या वास्तवाचे गांभीर्य अधिकच वाढले आहे. २०२१ च्या अहवालानुसार त्याआधीच्या तीन वर्षांत महाराष्ट्रात मानवी तस्करीच्या सुमारे ७८५ प्रकरणांची नोंद झाली होती. २०१९ ते २०२१ या तीन वर्षांत, देशभरातील १८ वर्षांखालील दोन लाख १० हजार मुले मानवी तस्करीच्या जाळ्यात सापडली, तर १८ वर्षांवरील सुमारे पाच लाख ८० हजार महिलांना या अमानवी धंद्याची शिकार व्हावे लागले. लैंगिक शोषण हा या अमानुष धंद्यामागचा भीषण हेतू आहे हे स्पष्ट आहेच, पण गरीब, बेरोजगारांना लक्ष्य करून त्यांचा गुन्हेगारी धंद्यांसाठी वापर करण्याचे प्रकारही वाढले आहेत. परदेशात नोकरी मिळविण्याच्या आशेने व भविष्याच्या स्वप्नांच्या प्रभावाने हुरळलेले तरुण अशा आमिषांना बळी पडतात, परदेशी जाण्यासाठी हाती असलेली पुंजी खर्च करतात आणि या टोळ्यांच्या माध्यमातून परदेशात दाखल झाल्यानंतर पैसा, पासपोर्ट, पत्ता असे स्वतःची ओळख असलेले सारे काही गमावून बसतात. अशा आमिषाने जाळ्यात पकडलेल्या भारतीय तरुणांना परदेशांतील अज्ञात ठिकाणी ओलिस ठेवून त्यांना सायबर गुन्हेगारी भाग पाडल्याची असंख्य उदाहरणे यापूर्वी उघडकीस आली होती. कंबोडियामध्ये पाच हजारांहून अधिक भारतीय तरुणांना या गुन्हेगारीसाठी ओलिस ठेवून राबविले गेल्याची एक बातमी दोन वर्षांपूर्वी देशात चिंतेची लाट पसरवून गेली होती, तर रशियामध्ये हेल्पर म्हणून नोकरी देण्याचे आमिष दाखवून तस्करी मार्गाने रशियास पाठविलेल्या तरुणांच्या हाती शस्त्रे देऊन त्यांना सक्तीने युक्रेन युद्धात पाठविले गेल्याचेही उघड झाले होते. दोन वर्षांपूर्वी, जुलै २०२४ मध्ये परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री कीर्तिवर्धन सिंह यांनी लोकसभेतच ही माहिती दिली होती. अनैतिक लैंगिक धंद्याकरिता महिलांची तस्करी, भीक मागण्यासाठी किंवा अमली पदार्थांची ने-आण करण्यासाठी बालकांची तस्करी होत असल्याचे प्रकार तर सतत कानावर येतच असतात. म्हणूनच, मानवी तस्करीच्या या भयावह धंद्याचे आंतरराष्ट्रीय जाळे भेदून सामान्य जनतेस सुरक्षित आणि भयमुक्त जगण्याची हमी देण्याचे आव्हान आता सोपे राहिलेले नाही.

कंबोडिया, म्यानमार आदी देशांत सायबर गुन्हेगारीकरिता भारतीय तरुणांची मोठ्या प्रमाणावर तस्करी झाल्याची कबुली गेल्या फेब्रुवारीत लोकसभेत सरकारने दिली आणि या आव्हानाच्या मर्यादाही उघड झाल्या. आमिषांना बळी पडून अशा नोकऱ्यांच्या आकर्षक फसव्या जाहिरातींकडे आकर्षित होणारे तरुण स्वतःहूनच दलालांच्या जाळ्यात ओढले जातात आणि आपले भविष्य पणाला लावतात, त्यामुळेच हे आव्हान सोपे नाही, याची सरकारला जाणीव आहे. २०२२ मध्ये सुमारे साडेचारशे, २०२३ मध्ये सुमारे साडेपाचशे आणि २०२५ मध्ये सुमारे चार हजार ३०० भारतीय तरुणांची या दमनचक्रातून मुक्तता करण्यात आली असली, तरी नव्याने पुन्हा या जाळ्यात अडकून आपले भविष्य अंधारात ढकलणाऱ्या तरुणांचे आव्हान कायम आहे. म्यानमार हे अशा तस्करीचे मोठे केंद्र असावे असे या आकडेवारीवरून दिसते. मात्र, या गुन्ह्याचे जाळे तेवढ्यापुरते मर्यादित नाही, हे थायलंड-म्यानमार सीमेवरील एका अज्ञात छावणीत डांबल्या गेलेल्या सुमारे ८०० भारतीय तरुणांच्या नव्याने समोर आलेल्या करुण कहाणीवरून पुन्हा स्पष्ट झाले आहे. थायलंडमध्ये मोठ्या पगाराची नोकरी देण्याचे आमिष दाखवून फसविल्या गेलेल्या या ८०० तरुणांमध्ये महाराष्ट्राच्या बीड जिल्ह्यातील सुमारे २५ तरुणांचा समावेश असल्याने, महाराष्ट्राच्या तरुणांसमोरील समस्यांचे एक गंभीर चित्र या नव्या प्रकरणातून समोर आले आहे. बीड जिल्ह्याच्या केज या गावातील एका तरुणास बँकॉकमधील लठ्ठ पगाराच्या नोकरीचे आमिष खुणावू लागले आणि तो या जाळ्यात अडकला. बँकॉकमध्ये पोहोचल्यावर त्याला म्यानमारमधील एका जंगलातील अज्ञात स्थळी असलेल्या सायबर गुन्हेगारी केंद्रात ऑनलाईन फसवणुकीच्या कामाला जुंपण्यात आले. एक संधी साधून या तरुणाने आपल्या कुटुंबासोबत संपर्क साधल्याने या नरकयातनांचा आणि आंतरराष्ट्राय तस्करीचा उलगडा झाला आहे. आता त्यांच्या सुटकेसाठी केंद्र आणि राज्य सरकार प्रयत्न करतील आणि या अमानवी धंद्याचे दलाल नवे जाळे घेऊन गरजवंतांच्या स्वप्नांना त्यामध्ये गुरफटविण्यासाठी तयारी करतच राहतील. तरुणांना आणि सुखी भविष्याच्या स्वप्नात दंग राहून आंधळेपणाने कोणाच्याही गळ्यात माळ घालत स्वतःची फसवणूक करून घेणाऱ्या विविहेच्छुक तरुणींच्या कुटुंबांना केवळ सावध करणे एवढाच अशा अमानवी धंद्याला आळा घालण्याचा उपाय पुरेसा नाही. तरुणांना आणि भविष्याचे स्वप्न रंगविणाऱ्या तरुणींना त्यांच्या क्षमता सिद्ध करता येतील अशा रोजगाराच्या संधी स्थानिक स्तरावर उपलब्ध करून देणे हा त्यावरचा एकमेव उपाय आहे. ते शक्य होईल, तेव्हा मानवी तस्करीच्या आणि फसवणुकीद्वारे संपत्ती जमवून परदेशात सुखाने राहत अनेक महिलांची आयुष्ये उद्ध्वस्त करणाऱ्या अमानवी धंद्याचे आव्हान पेलणेही सोपे होईल. ■

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### टप्प्याटप्प्याने पंढरीची वारी

पंढरपूर येथे जाणाऱ्या संतांच्या पालख्या आणि त्यामागून पायी जाणारे वारकरी अशी ही वारी, हे आपल्या महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव आहे. एकूण १४टप्पे आणि काही ठिकाणी मुक्काम मिळून साधारण १७ दिवसांची ही वारी. संत ज्ञानेश्वरांची पालखी आळंदीहून तसेच संत तुकारामांची



पालखी देहू येथून निघते. अशा अनेक संतांच्या पालख्या वेगवेगळ्या ठिकाणांहून निघतात. पालखी आणि वारकरी यांचे एकच ध्येय असते. ते म्हणजे आषाढी एकादशीच्या दिवशी पंढरपूरच्या विठुरायाचे दर्शन. अशीही आगळीवेगळी वैशिष्ट्य पूर्ण वारी. संत ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत हे पंढरीचे वारकरी. ज्ञानेश्वर महाराजांना पंढरीच्या वारीची दीक्षा त्यांचे गुरू व वडील बंधू निवृत्तिनाथ यांनी दिली. पंढरीचा सोज्वळ मार्ग माझ्या गुरूंनी दाखवून मला कृतार्थ केले असे संत ज्ञानदेव म्हणतात.

साधु संत मायबाप तिही केले कृपा दान
पंढरीचे यात्रे नेले घडले चंद्रभागे स्नान
श्री गुरु निवृत्तीराये मार्ग दाविला सोज्वळ
बाप रखुमा देवीवरू विठ्ठल दीनांचा दयाळ

हैबतराव बाबांनी ही पंढरीची वारी सुरू केली. हा सोहळा आज कित्येक वर्षे अव्याहतपणे सुरू आहे. सगळे संत पूर्वी पंढरपूर येथे एकत्र येत आणि समाजाच्या सुधारणेसाठी विचार करून समाजाच्या प्रगतीसाठी कसे कार्य करायचे ते ठरवत. अशी या वारीची माहिती शाळेतील विद्यार्थ्यांना मी दरवर्षी देत असे. एकदा एका विद्यार्थ्याने, 'बाई तुम्ही कधी वारीला गेला आहात का?' असा प्रश्न विचारला. त्यावर एवढे दिवस रजा मिळत नाही म्हणून मी वारीला गेले नाही असे सांगितले. पण त्याच्या प्रश्नाने मी अंतर्मुख झाले. आमच्या शिक्षिका खोलीत मधल्या सुट्टीत ज्या गप्पा होत त्यातून एकेक टप्पा करून वारीला जाता येते हे कळले. मग दर वर्षी एकेक टप्पा अशी आनंदमयी वारी सुरू झाली. माझ्याबरोबर माझे पती सप्रे हेही वारीला येत होते.

शुक्रवार ४ जलै २०२५ ला आमचा वारीचा शेवटचा टप्पा आम्ही ( भेंडी शेगाव ते वाखरी आणि पुढे पंढरपूर ) पूर्ण केला. पंढरपूरच्या देवळाच्या कळसाला मनोभावे नमस्कार करून वेगळे समाधान मिळवून घरी परतलो. एका विद्यार्थ्याने विचारलेला प्रश्न माझ्या वारीसाठी प्रेरणादायी ठरला. तसेच माझ्या शिक्षिका भगिनींनी दिलेली माहिती उपयुक्त ठरली.

**सविता सप्रे**/पुणे. ९२२६०९६७७७

■■■

### आधाराच्या शोधात हरवणारी तरुणाई

तरुणपण हा जीवनातील अत्यंत महत्त्वाचा आणि संवेदनशील टप्पा असतो. आजची तरुणाई अभूतपूर्व संधी आणि आव्हानांच्या काळात जगत आहे. शिक्षण, करीअर, स्पर्धा, सामाजिक अपेक्षा आणि बदलत्या जीवनशैलीमुळे तरुणांच्या मानसिकतेवर मोठा ताण निर्माण होत आहे. या वयात व्यक्ती अनेक स्वप्ने पाहत असतो, नवीन नातेसंबंध निर्माण करत असतो आणि स्वतःची ओळख घडवत असतो. मात्र याच काळात मानसिक ताण, अपयश, एकटेपणा आणि असुरक्षिततेच्या भावना देखील अनुभवाव्या लागतात. अशा परिस्थितीत अनेक तरुण भावनिक आधार शोधतात. आधाराची गरज नैसर्गिक असली तरी योग्य मार्गदर्शनाऐवजी चुकीच्या व्यक्ती, नातेसंबंध किंवा आभासी जगावर अवलंबून राहिल्यास किंवा त्याचा अतिरेक झाल्यास त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात.

कुटुंब हे व्यक्तीच्या भावनिक विकासाचे पहिले केंद्र असते. परंतु आज अनेक कुटुंबांमध्ये संवादाचा अभाव जाणवतो. पालक आणि मुलांमध्ये मोकळेपणाने विचारांची देवाणघेवाण होत नाही. तरुणांच्या भावना, समस्या आणि अपेक्षा समजून घेण्यासाठी पुरेसा वेळ दिला जात नाही. परिणामी, अनेक तरुण आपल्या मनातील गोष्टी कुटुंबाऐवजी बाहेरील व्यक्तींशी शेअर करण्यास प्राधान्य देतात.

कौटुंबिक पारदर्शकतेचा अभाव ही देखील एक गंभीर समस्या आहे. घरातील निर्णय, नातेसंबंध किंवा आर्थिक परिस्थिती याबाबत स्पष्टता नसल्याने तरुणांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होते. त्याचबरोबर वाढते मतभेद, विरोधकांची संख्या आणि सतत होणारी टीका यामुळे आत्मविश्वास कमी होतो. अशा परिस्थितीत सहानुभूती दाखवणारी कोणतीही व्यक्ती त्यांना जवळची वाटू लागते. भावनिक आधार घेताना अनेक तरुण विवेक गमावतात. समोरची व्यक्ती आपली काळजी घेते, आपल्याला समजून घेते या भावनेतून ते तिच्यावर पूर्ण विश्वास ठेवतात. काही वेळा अशा विश्वासाचा गैरफायदा घेतला जातो. भावनिक शोषण, फसवणूक, आर्थिक नुकसान किंवा मानसिक छळ यांसारख्या समस्या उद्भवू शकतात.

काही तरुण एखाद्या व्यक्तीवर इतके अवलंबून होतात की स्वतःचे निर्णय घेण्याची क्षमता कमी होते. त्या व्यक्तीशिवाय जगणे अशक्य वाटू लागते. जेव्हा नातेसंबंध तुटतात किंवा अपेक्षा पूर्ण होत नाहीत, तेव्हा नैराश्य, चिंता, आत्मविश्वासाचा अभाव आणि काही वेळा आत्मघातकी विचारदेखील निर्माण होऊ शकतात. सोशल मीडियाने ही समस्या आणखी गुंतागुंतीची केली आहे. अनेकदा आभासी जगातील नातेसंबंध वास्तवापेक्षा अधिक महत्त्वाचे वाटू लागतात. लाईक्स, कमेंट्स आणि फॉलोअर्स यांच्या माध्यमातून मिळणारा तात्पुरता भावनिक आधार अनेकांना आकर्षित करतो. मात्र ही नाती नेहमीच विश्वासापात्र असतील असे नाही. त्यामुळे फसवणूक आणि भावनिक दुखापत होण्याची शक्यता वाढते.

भावनिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी प्रत्येक तरुणाने स्वतःवर विश्वास ठेवणे आवश्यक आहे. समस्या आल्यास त्यांचा सामना करण्याची तयारी, सकारात्मक विचारसरणी, कुटुंबाशी मोकळा संवाद आणि योग्य मार्गदर्शन यामुळे भावनिक स्थैर्य प्राप्त होते. आधाराची गरज असली तरी स्वतःची ओळख आणि स्वाभिमान जपणे अधिक महत्त्वाचे आहे. प्रत्येक तरुणाने आत्मविश्वास, स्वावलंबन आणि भावनिक परिपक्वता विकसित करणे आवश्यक आहे. कुटुंबातील संवाद वाढवणे, विश्वासाचे वातावरण निर्माण करणे आणि मानसिक आरोग्याविषयी जागरूकता वाढवणे ही काळाची गरज आहे. भावनिक आधाराचा शोध घेताना विवेक, आत्मभान आणि योग्य मार्गदर्शन यांचे महत्त्व ओळखणे आवश्यक आहे. भावनांवर नियंत्रण आणि स्वतःवरील विश्वास हेच यशस्वी व संतुलित जीवनाचे खरे आधारस्तंभ आहेत.

**उर्वशी मनीष संघवी**/अकोला

■■■

### दिवाण लेआऊटच्या समस्यांवर हव्या उपाययोजना

प्रभाग ३४ मधील दिवाण लेआऊटमध्ये अनेक समस्या आहे. त्याचा पाठपुरावा अनेक वर्षापासून सुरू आहे, पण त्याकडे नेहमीच दुर्लक्ष झाले आहे. या प्रभागात चार नगरसेवक आहेत. सुमारे एक कोटीचा निधी विकासासाठी मिळाला आहे. योग्य नियोजन केले तर या प्रभागाचा विकास निश्चित होईल. दिवाण लेआऊटमध्ये गडर लाईन्सची अवस्था दयनीय असून त्यात सुधार करण्याची गरज आहे. अंतर्गत रस्ते खाली-वर झाल्यामुळे अनेक ठिकाणी रस्त्यावर पाणी साचते. अंतर्गत रस्ते चहुबाजूंनी फुटले आहेत. रस्त्याचे सिमेंटीकरण होणार असेल तर रस्ता वर आणि घरं खाली अशी स्थिती होऊ नये. दिवाण लेआऊटमधून मोठा नाला वाहतो. त्याची दोन्ही बाजूच्या भिंतीची उंची अतिशय लहान आहे. पावसाळ्यात नाल्याचे पाणी नागरिकांच्या घरात शिरो. दोन वर्षापूर्वी घरात पाणी शिरल्यामुळे हजारो रुपयांचे नुकसान झाले. परिणामी नाल्याच्या भिंतीची उंची वाढविणे अनिवार्य आहे. पावसाला सुरुवात झाली असून हे काम युद्ध पातळीवर व्हावे, ही अपेक्षा. या लेआऊटमध्ये एक छोटेखानी मैदान आहे. त्या ठिकाणी सकाळी प्रभात शाखा आणि सायंकाळी संघाची सायं शाखा लागते. रोज सकाळी ६ ते ७ पर्यंत महिला योग साधना करतात. पण या मैदानात अस्वच्छता, अपुरा प्रकाश आहे. येथे विहीर आहे, पण त्याचा अनेक वर्षापासून उपयोग झाला नाही; त्यामुळे विहिरीतील पाणी दूषित झाले असावे. ज्येष्ठ नागरिकांना बसायला बेंचेस ठेवले होते, पण ते काढून नेले. मुलांना व्यायाम करायला साहित्य लावले होते; तेही तोडफोड करण्यात आले. याबद्दल अनेक तक्रारी यापूर्वी करण्यात आल्यात, पण उपयोग शून्य. याच ठिकाणी आमदार मोहन मते यांच्या निधीतून व्यासपीठ बांधण्यात आले आहे. पण ते चारही बाजूने खुले असल्यामुळे उन्हाळ्यात आणि पावसाळ्यात त्याचा फारसा उपयोग होत नाही.

संबंधित नगरसेवकांनी लक्ष घालून या समस्यांचे निवारण करावे, ही अपेक्षा.

**वसंत पिंपळापुरे**/नागपूर

■■■

### हॉस्पिटलचा वेटिंग एरिया

हॉस्पिटलच्या वेटिंग एरियात एक वेगळीच शांतता असते. ती पूर्ण शांत नसते; मशीनचा मंद बीप, नर्सच्या घाईघाईने पडणाऱ्या पावलांचा आवाज, स्ट्रेचरची हलकी हालचालः पण त्या सगळ्या आवाजांपेक्षा जास्त बोलकी असते तिथे बसलेल्या माणसांची निःशब्द प्रतीक्षा. हातात रिपोर्ट्स, डोळ्यांत प्रश्न आणि मनात प्रार्थना घेऊन प्रत्येक जण कोणाच्या तरी 'ठीक आहे' या एका वाक्याची वाट पाहत असतो. तिथे वेळ घड्याळाच्या काट्यांनी पुढे सरकत नाही. तो रिपोर्ट येईपर्यंत थांबतो, डॉक्टर बाहेर येईपर्यंत अडकून राहतो आणि आश्वासक स्मित दिसेपर्यंत श्वास रोखून धरतो. त्या काही खुर्च्यांवर बसलेली माणसं आयुष्याचे अनेक रंग दाखवतात. एक मुलगा रात्रभर आईच्या आयसीयूच्या दाराकडे डोळे लावून बसलेला असतो. दुसरीकडे एक वृद्ध गृहस्थ पत्नीच्या रिपोर्टची वाट पाहत हातातल्या पाण्याच्या बाटलीचं झाकण पुनःपुन्हा उघडतात आणि बंद करतात. काळजी माणसाला किती निःशब्द बनवते, हे तिथे जाणवतं. कधी एखादं कुटुंब डिस्चार्ज पेपर हातात घेऊन बाहेर पडतं. चेहऱ्यावरचा थकवा तसाच असतो, पण डोळ्यांत समाधानाचं हास्य उमललेलं असतं तर कधी डॉक्टरांचं एक वाक्य कुणाचं संपूर्ण जग बदलून टाकतं. आशा आणि भीती यांच्या सीमेवर उभं असलेलं हे जग रोज नव्याने जगायला शिकवतं. हॉस्पिटलमध्ये प्रेमाचा आवाज मोठा नसतो; तो कुजबुजतो... 'काही खाल्लंस का?', 'तू थोडा वेळ झोप.', 'मी आहे ना...' ही साधी वाक्यं; त्या क्षणी औषधांपेक्षाही जास्त दिलासा देतात. हॉस्पिटल माणसाला नकळत बदलतं. पुढे ढकललेले फोन, 'नंतर बोलू' म्हणून राहून गेलेल्या भेटी, आईची काळजी, वडिलांचा मूक आधार या सगळ्यांची किंमत तिथे नव्याने समजते. कारण आयुष्याची अनिश्चितता तिथे रोज डोळ्यांसमोर उभी असते. माणूस कितीही खंबीर असला, तरी आपल्या माणसांसाठी तो आतून कायम हळवा असतो. म्हणूनच मला नेहमी वाटतं, हॉस्पिटलच्या वेटिंग एरियात फक्त रुग्णांची तपासणी होत नाही; तिथे नात्यांची धडधड, प्रेमाची खोली आणि आशेची ताकदही मोजली जात असते आणि मनात नकळत एकच प्रार्थना उमटते... 'जरा थांब ना; श्वासांना अजून तुझी सवय आहे.'

**गीता राहुल कित्तूर**/कर्वेनगर, पुणे. ८३८००८११२०

■■■

### शिक्षण व्यवस्था पोषक हवी

कुठल्याही व्यवस्थेत भोंगळपणा वाढला की भ्रष्टाचार वाढला म्हणून समजावे. खरं तर शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात हा प्रकार अत्यंत गलिच्छ आहे. शिक्षण क्षेत्रात सर्रास पेपरफुटी वाढली आहे. पूर्वी अशा परीक्षा नव्हत्या तर काय चांगले डॉक्टर, इंजिनीअर, शिक्षक निर्माण झाले नाहीत काय? केवळ लोकसंख्या वाढीची कारणे आणि योग्य विद्यार्थ्यांची निवड व्हावी ही कारणे दाखविली तरी त्यामागे पैसा कमाविणे हा एकच उद्देश आहे, हे लक्षात आल्यानंतर या घोडदौडीत कोण मागे राहणार? शिक्षणाची स्वायत्तता आर्थिक वर्गाकडे झुकल्यामुळे अशा व्यक्तींनी आपल्या खाजगी शाळा व महाविद्यालये भरपूर प्रमाणात काढल्या. त्यामध्ये शिक्षण देण्याचा उद्देश कमी आणि पैसा कमाविणे जास्त असावा, हे अभ्यासाअंती म्हणता येते. (अर्थात अपवाद वगळल्यास) कारण नियमाप्रमाणे शिक्षकांची भरती येथेही केली जाते, परंतु शिक्षकांचे आर्थिक शोषण मात्र वाढतेच आहे. केवळ स्वार्थीपणा हा शिक्षणाचा पाया जेथे असतो तेथे इमारत कशी उभी राहणार? हिंदू राष्ट्र अथवा विश्वगुरू होण्यासाठी नवीन पिढी अतिशय संस्कारक्षम असलीच पाहिजे. राष्ट्रप्रेम, देशभक्ती या भावनांची या शिक्षणामध्ये पेरणी केली गेली पाहिजे. त्याचप्रमाणे सध्या कुचकामी असलेल्या डिग्र्या बंद कराव्यात (चीन देशामध्ये या धोरणाचा विचार कधीच केलेला आहे) सध्या उपयुक्त आणि पोटापाण्याला लावणारे शिक्षणच उपयोगी ठरणार आहे. तेथे धर्म-जात याचा कोणताही विचार नको. राष्ट्र निर्माण करायचे आहे आणि संपूर्ण जगताला अभिमान वाटावा अशी जनता निर्माण करणे हेच प्राथमिक स्वप्न असल्यास समाजाची सर्व अंगे निरोगी, निरामय बनतील आणि मेंदूही सडणार नसल्याने केवळ आपल्यासाठी नाही तर समाजासाठी आणि देशासाठी आपल्याला जगायचे आहे, हा एकच संदेश शिक्षणामधून जावा. राष्ट्र निर्मितीसाठी कोणतीही गोष्ट करणे असंभव नाही. फक्त योग्य कृती आणि सकारात्मक परिणाम एवढेच हवे आहेत.

**डॉ. अचला तांबोळी**/९८९०६१७५३९

■■■

### देशी वृक्षांची लागवड करा



वृक्षारोपण मोहिमेत परदेशी वृक्ष मोठ्या प्रमाणावर लावण्यात येतात. परदेशी वृक्षांमुळे जैवविविधता मोठ्या प्रमाणावर नष्ट होऊ लागली आहे. त्याचप्रमाणे वाढते तापमान, वातावरणातील बदल दूर करण्यातही परदेशी वृक्ष अपयशी ठरत आहे. देशी वृक्षांमुळे पावसाचे पाणी भूगर्भात टिकून राहते. विदेशी वृक्षांमुळे जमिनीची पाणी टिकवून ठेवण्याची क्षमता नाहीशी होते. दुष्काळामागे हेही एक महत्वाचे कारण आहे. विदेशी झाडांच्या आम्लयुक्त पानांमुळे जमिनी नापीक होत आहे. विदेशी झाडांच्या फुलात परागकण नसतात. त्यामुळे त्यावर फुलपाखरे किंवा भुंगे यासारखे कीटक येत नाहीत. विदेशी झाडांच्या पानांनी आणि सावलीने जमीन निकृष्ट होत आहे. या वृक्षांच्या फांद्यांचा आणि बुंद्याचा काहीही उपयोग होत नाही. विदेशी वृक्षांमुळे रातकिडे, वटवाघूळ, घारी, गिधाडे, चिमण्या कावळे, घुबड, कबुतरे, पोपट यासारखे दिसणारे पक्षी दिसेनासे झाले आहेत. एकंदरीत अशा विदेशी वृक्षांमुळे होणाऱ्या परागकण प्रक्रियेला आणि पक्ष्यांद्वारे होणाऱ्या बीजप्रसाराच्या कामाला खीळ बसत असून कीटक, किडे, पक्षी जोडणारी निसर्गाची अन्न साखळी कुमकुवत होत आहे. देशी वृक्ष आपल्या जंगलात किंवा परिसरात पर्यावरणाचा समतोल साधत असतात. त्यांच्या अस्तित्वाशी जुळवून घेतलेली, त्यावर जोपासली जाणारी सजीव व्यवस्था असते. या सजीव अवस्थेत मनुष्य, पशुपक्षी, कीटक सामावले असतात. देशी वृक्षांमुळे पक्षांना कीटकांना, किड्यांनाही निवारा मिळतो. विघटन झालेल्या पालापाचोळ्याच्या खतातून निर्माण होणारी पोषकद्रव्ये पुन्हा वृक्षाकडे पाठवण्याचे काम वृक्षांची दूरवर पसरलेली मुळे करत असतानाच जमिनीत खोलवर जाऊन ती जमिनीवरच्या मातीला धरून ठेवतात. विविध कीटकांना, किड्यांना आणि सरपटणाऱ्या जीवांना अशी जमीन उपयुक्त ठरते आणि एक परिपूर्ण पर्यावरण निर्माण होते. देशी वृक्ष जितका ऑक्सिजन देतात तितका ऑक्सिजन विदेशी वृक्ष देत नाही. वातावरणातील ऑक्सिजन कमी होऊ द्यायचा नसेल तर देशी वृक्षांचीच लागवड करावी. वड, पिंपळ, कडुनिंब, आवळा, चिंच, फणस, आंबा, बेल, कदंब, पळस या वृक्षांची जास्तीत जास्त लागवड करण्यात यावी. देशी वृक्ष औषधी असतात शिवाय हे वृक्ष मोठे झाल्यास त्याची दाट व थंडगार सावलीही मिळते त्यामुळे जास्तीत जास्त देशी वृक्षांची लागवड करायला हवी.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

■■■

### ब्रेक्स...

माझं शालेय शिक्षण सी.पी. ॲण्ड बेरार हायस्कूल नागपूर येथे झाले. एकदा फिजिक्सच्या पावडे सरांनी आम्हा विद्यार्थ्यांना प्रश्न विचारला, 'तुम्ही सायकल चालवता का?' सर्वांनी एकसुरात 'हो' म्हटले. मग त्यांनी आम्हाला आणखी एक प्रश्न विचारला. 'सायकलला ब्रेक्स का लावलेले असतात?' त्यावर विद्यार्थ्यांकडून निरनिराळी उत्तरे आली, थांबण्यासाठी... वेग कमी करण्यासाठी... अपघात टाळण्यासाठी! सर्वात चांगले उत्तर सरांचे होते. ते म्हणाले, 'जास्त वेगाने जाता येण्यासाठी..!' सर पुढे म्हणाले, गोंधळले असाल ना अशा उत्तराने. मग असे कसे? जरा विचार करा, जर तुमच्या सायकलला ब्रेकच नसते तर तुम्ही जास्तीत जास्त किती वेगाने सायकल चालवाल? सायकलला ब्रेक आहेत म्हणूनच तुम्ही वेगाने सायकल चालवण्याचे धाडस करू शकता व तुमच्या इच्छित स्थळी कमी वेळात सुखरूपपणे पोहोचू शकता. असे असले, तरी ब्रेक्सचे महत्त्व केवळ वाहनापुरते मर्यादित नाही. आपल्या आयुष्यालाही ब्रेक्सची गरज असते. जीवनाच्या धावपळीत, महत्त्वाकांक्षांच्या शर्यतीत आणि यशाच्या मागे धावताना कधी कधी थांबून स्वतःकडे पाहणे आवश्यक असते. विचारांना, भावनांना आणि निर्णयांना योग्य वेळी 'ब्रेक' लावला तर अनेक चुका टाळता येतात. राग आला की शब्दांना ब्रेक हवा, अहंकार वाढला की वर्तनाला ब्रेक हवा आणि यश मिळालं की गर्वाला ब्रेक हवा. कारण नियंत्रण नसलेला वेग जसा अपघात घडवतो, तसंच नियंत्रण नसलेलं जीवनही संकट निर्माण करू शकतं. एक सुंदर तत्त्वज्ञान असं सांगतं की, गाडीला ब्रेक्स असतात म्हणून ती वेगाने धावू शकते. जर ब्रेक्स नसते, तर चालक कधीच आत्मविश्वासाने वेग वाढवू शकला नसता. त्याचप्रमाणे जीवनातही मूल्ये, संस्कार, संयम आणि विवेक हे आपल्या मनाचे ब्रेक्स आहेत. हेच आपल्याला योग्य मार्गावर ठेवतात आणि पुढे जाण्याचं धैर्य देतात. म्हणूनच गाडीतील ब्रेक्स आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देतात. 'थांबण्याची क्षमता असेल, तरच पुढे जाण्याचा वेग सुरक्षित आणि यशस्वी ठरतो.' जीवनातही वेग हवा, प्रगती हवी, स्वप्नांची उंच भरारी हवी; त्याचबरोबर योग्य वेळी थांबण्याचं शहाणपणही हवं. कारण वेग यश देतो, पण ब्रेक्स सुरक्षितता देतात; आणि सुरक्षितता असेल तरच प्रवास आनंददायी होतो. जीवनात वेळोवेळी आलेल्या अशा ब्रेक्समुळेच तुम्ही आज आहे ते स्थान मिळवू शकला आहात. असे ब्रेक्स नसते तर तुम्ही कुठंतरी भरकटला असता. म्हणूनच जीवनात येणाऱ्या अशा ब्रेक्सची जाण ठेवा.

**संजय करगुटकर**/९८९०७५९००५ ■

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस **tbedit2016@gmail.com** तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादकः प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# योगाच्या माध्यमातून महाराष्ट्राला मजबूत बनवूया - माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे

## लोखंडी सावरगाव नजीक ओमकार योग शिक्षण संस्थेची सुरूवात

**अंबाजोगाई :** तालुक्यात योगाचे परिपूर्ण शिक्षण देण्यासाठी ज्ञानदिप अकॅडमी लोखंडी सावरगाव अंतर्गत ओमकार योग शिक्षण संस्थेची सुरूवात बीड जिल्ह्याच्या माजी खासदार डॉ.प्रितमताई गोपीनाथराव मुंडे यांच्या हस्ते करण्यात आली.

लातूर फाटा, लोखंडी सावरगाव येथे शुक्रवार, दिनांक ३ जुलै २०२६ रोजी बीड जिल्ह्याच्या माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांच्या हस्ते ज्ञानदिप अकॅडमी लोखंडी सावरगाव संचलित ओमकार योग शिक्षण संस्थेचे उद्घाटन करून स्थापना करण्यात आली. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून ब्रह्मकुमारी सुनीता दीदी (केंद्र संचालिका, ओम शांती सेंटर अंबाजोगाई), अक्षय मुंदडा (चेअरमन, पन्नगेश्वर शुगर फॅक्टरी, पानगाव), चेतना तिडके (अपर पोलीस अधिक्षक), कॅ.पांडुरंगराव शेप (अध्यक्ष, जय जवान आजी-माजी सैनिक संस्था, अंबाजोगाई), सौ.अंजली लोहिया (मुख्याध्यापिका, जीवन शिक्षण प्राथमिक विद्यालय, अंबाजोगाई), संजय गंभीरे (नगरसेवक, न.प.अंबाजोगाई), परमेश्वर गित्ते (संपादक, दैनिक वार्ता समूह) हे मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी संस्थेच्या सहसचिव सौ.स्वप्नाली नितेश शिराळे (अध्यक्ष, आशा फाऊंडेशन, महाराष्ट्र राज्य), श्रवण ऑर्केस्ट्राचे संचालक व प्रसिद्ध गायक ज्ञानेश्वर नागरगोजे, संस्थेच्या कोषाध्यक्ष योग शिक्षिका सौ.मनीषा इंगळे, माजी सैनिक परमेश्वर साठे, सौ.अंजली पाटील, योग शिक्षिका सौ.सरला उपाध्याय, योगगुरू भानुदास देशमुख, ६ आंतरराष्ट्रीय सुवर्णपदक विजेते योगगुरू सोमेंद्र शास्त्री, योगगुरू अमित वर्मा, फार्मासिस्ट व योगशिक्षक गौरव गित्ते, डॉ.मोहन मुंडे, योगगुरू सचिन थोरात, योगगुरु परमेश्वर भिसे (माजी अभियंता) आदी मान्यवर ओमकार योग शिक्षण संस्थेच्या स्थापना प्रसंगी उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांनी उपस्थित सर्वांना योगाचे महत्व समजावून सांगितले. योगाच्या माध्यमातून आपण सर्वांनी एकत्र येऊन महाराष्ट्राला मजबूत बनवूया, प्रगतीपथावर घेऊन जाऊया असे आवाहन करून योग आपल्याला शारीरिक, मानसिक व अध्यात्मिक रूपाने मजबूत बनवतो. त्यासाठी सर्वांनी योग करणे आवश्यक आहे असे आवाहन माजी खासदार डॉ.मुंडे यांनी केले. तर यावेळी बोलताना संस्थेचे सचिव योगगुरू धनंजय इंगळे यांनी सांगितले की,





माजी सैनिक दत्ता लांब हे भारतीय सैन्यात फिजिकल शिक्षक होते. त्यामुळे ज्ञानदिप अकादमीतील विद्यार्थ्यांना त्यांचे अनमोल मार्गदर्शन मिळत आहे. असे सांगून दत्ता लांब हे भारतीय सैन्यात असताना त्यावेळी त्यांनी आपली अर्धी पगार गोरगरिबांच्या कल्याणासाठी वापरलेली आहे व सेवानिवृत्त झाल्यानंतर देखील ते समाजसेवा म्हणून आपली अर्धी पेन्शन सुद्धा अशा समाजसेवेच्या कार्यासाठी वापरतात ही कौतुकास्पद बाब आहे. २१ वर्षे देशाच्या सीमांची सुरक्षा करून सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनी २५० हून अधिक निःशुल्क योग शिबिरे आयोजित केली. ज्यामध्ये १ महिना, ३ दिवस, ७ दिवस आणि १५ दिवसांचे मोफत योग शिबीरांचा समावेश आहे. या शिबिरांच्या माध्यमातून त्यांनी बीड जिल्ह्यातील तब्बल ८० हजार व्यक्तींना योगाचे मार्गदर्शन व मोफत प्रशिक्षण दिले हे खूपच प्रेरणादायी आहे असे संस्थेचे सचिव इंगळे म्हणाले. तर प्रारंभी प्रास्ताविक करताना माजी सैनिक दत्ता लांब यांनी सांगितले की, ओमकार योग शिक्षण संस्थेमध्ये महिलांसाठी ज्युडो, कराटे, कुंफू योगा, अष्टांग योग, व्यक्तिमत्व विकास व आत्मरक्षण शिबिर तसेच ३०० योग शिक्षिकांना प्रशिक्षण मोफत देण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक गावात २-२ योगशिक्षक तयार करण्यात येणार आहेत. प्रत्येक शाळेतील १-१ शिक्षकांना योग प्रशिक्षण देण्यात येणार आहे. गरीब विद्यार्थ्यांसाठी मोफत पोलिस व मिलिटरी भरतीपूर्व प्रशिक्षण योग पद्धतीने देण्यात येणार आहे. घरोघरी योग पोहोचावा व सर्वांचे शरीर, मन व आत्मा मजबूत बनावे म्हणून सर्वांच्या कल्याणाकरिता निःस्वार्थ भावनाने ही संस्था कार्य करणार आहे. महाराष्ट्राचे दिवंगत नेते गोपीनाथरावजी मुंडे यांचे सर्व जनतेला एकच सांगणे होते की, आपण सर्वांनी एकत्र यायचे आहे. व सर्वांनी महाराष्ट्राला शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक रूपाने मजबूत बनवायचे आहे, गरीब जनतेचा विकास झाला तर महाराष्ट्राचा विकास नक्कीच होईल अशी त्यांची धारणा होती. आता साहेबांची ती इच्छा योगाच्या माध्यमातून पूर्ण होणार आहे. कारण, योगाचा कोणताही एक वेगळा धर्म नाही. तर योग हा सर्व धर्मांतील व्यक्तींसाठी आहे. म्हणून सर्वांनी एकत्र येऊन योग करावयाचा आहे व साहेबांचे स्वप्न पूर्ण करावयाचे आहे असे मनोगत माजी सैनिक लांब यांनी आपल्या प्रास्ताविकातून व्यक्त केले. अकादमीचे अध्यक्ष व योग शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष दत्ता दराडे यांनी सांगितले की, ज्ञानदीप अकॅडमी ही महाराष्ट्रातील नामांकित अकादमी आहे. कारण, की दरवेळेस या अकॅडमीचे सर्वांत जास्त विद्यार्थी हे मिलिटरी व पोलीस भरती मध्ये निवडले जातात. या अकॅडमीला योग प्रशिक्षक लांब यांच्यासारखे योगगुरू लाभले आहेत. ज्ञानदीप अकादमीतील सर्व विद्यार्थ्यांना योगाच्या पद्धतीने मिलिटरी व पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण देण्यात येत आहे. त्यामुळे गोरगरीब, गरजू कुटुंबातील विद्यार्थ्यांना या अकादमीचा फायदा होत आहे असे मनोगत अकादमीचे अध्यक्ष व संस्थेचे उपाध्यक्ष दराडे यांनी व्यक्त केले आहे. कार्यक्रमाची सुरूवात दीपप्रज्ज्वलन आणि दिवंगत केंद्रीय ग्रामविकास मंत्री गोपीनाथरावजी मुंडे यांच्या प्रतिमेस अभिवादन करून करण्यात आली. सर्व कार्यक्रमाचे अतिशय चांगले नियोजन ज्ञानदीप अकॅडमीचे संस्थापक व ओमकार योग शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष दत्ता दराडे यांनी केले होते. संस्थेचे संस्थापक माजी सैनिक दत्ता लांब व संस्थेचे सचिव योगगुरू धनंजय इंगळे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योग शिक्षिका सुनिता नागरगोजे यांनी केले. तर उपस्थित सर्वांचे आभार योग शिक्षिका प्रिया शिंदे यांनी मानले.

## शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन वेळेत हजर राहून ओळखपत्र चा वापर करणे सक्तीचे करावे : अनिल बोर्डे

### पारदर्शकता व जबाबदारीसाठी ग्राहक पंचायत ची मागणी



**गेवराई( प्रतिनिधी) :** शासकीय व निम्म शासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन वेळेचे काटेकोर पालन करावे आणि दररोज ओळखपात्राचा वापर करावा अशी मागणी ग्राहक पंचायत महाराष्ट्र , बीड शाखेने या प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

ग्राहक पंचायत चे जिल्हा उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकार द्वारे म्हटले आहे की, सध्या अनेक शासकीय कार्यालया मध्ये शासकीय कर्मचारी वेळेवर येत नाहीत. तसेच ओळखपत्र न लावल्याने नागरिकांना कोण अधिकारी आणि कोण कर्मचारी हे समजत नाही. अशी असे निदर्शनास येत आहे त्यामुळे नागरिकांची गैरसाई वाढत आहे.

सर्व जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांनी वेळेवर कार्यालयात हजर राहण्याबाबत सक्ती करावी. उशिरा येणे, लवकर जाणे मध्येच गैरहजर राहण्यावर तातडीने कारवाई करावी. प्रत्येक कर्मचाऱ्याने गळ्यातील ओळखपत्र स्पष्टपणे दिसेल अशा पद्धतीने वापरावे. त्यावर व पद व विभाग नमुद करावे. वरिष्ठ कार्यालयाने कार्यालयाची औचक तपासणी करून वेळ व ओळखपत्राचा आढावा घ्यावा. नसता संबंधित कर्मचाऱ्यावर शासकीय निर्णयाप्रमाणे कारवाई करावी. अशी मागणी बीड जिल्हा ग्राहक पंचायत जिल्हा उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी या प्रसिद्धीपत्रकाद्वारे केली आहे.

## धोक्याच्या छायेतून सुरक्षित भविष्याकडे; कपिलधारवाडी पुनर्वसनासाठी 18 कोटींचा दिलासा"

**बीड | प्रतिनिधी :** अतिवृष्टी आणि भूस्खलनाच्या सततच्या धोक्यामुळे अनेक वर्षांपासून असुरक्षित जीवन जगणाऱ्या कपिलधारवाडी येथील ग्रामस्थांना अखेर मोठा दिलासा मिळाला आहे. गावाच्या कायमस्वरूपी पुनर्वसनासाठी तब्बल १८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, या निर्णयामागे आमदार विजयसिंह राजे पंडित यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

कपिलधारवाडी परिसरात अतिवृष्टीमुळे दरवर्षी भूस्खलनाचा धोका निर्माण होत असल्याने ग्रामस्थांच्या जीवित आणि मालमत्तेचा प्रश्न ऐरणीवर आला होता. अनेक वर्षांपासून या गावाच्या पुनर्वसनाचा विषय शासनदरबारी प्रलंबित होता. गावकऱ्यांनी वेळोवेळी केलेल्या मागण्यांची दखल घेत आमदार विजयसिंह राजे पंडित यांनी हा प्रश्न सातत्याने शासनाच्या निदर्शनास आणून दिला. विविध स्तरांवर पाठपुरावा करत पुनर्वसनाची गरज अधोरेखित केली.

या सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश मिळत पुनर्वसन विभागाकडून गावाच्या कायमस्वरूपी पुनर्वसनासाठी १८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्याचे निर्देश देण्यात आले. या निर्णयामुळे गावातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, सुरक्षित आणि सन्मानाने जगण्याच्या नव्या आशा निर्माण झाल्या आहेत. निर्णयाबद्दल कपिलधारवाडी ग्रामस्थांनी आमदार विजयसिंह राजे पंडित यांचे मनःपूर्वक आभार मानले.

## प्रभाकर राव कुलकर्णी नवगणं राजुरीकर यांचे निधन

**बीड(प्रतिनिधी) :** बीड येथील धानोरा रोड वरील संत नामदेव नगर (प) येथील श्री प्रभाकर राव कुलकर्णी नवगण राजुरीकर यांचे दिनांक 4जुलै रोजी शनिवारी दुःखद निधन झाले.मृत्युसमयी त्यांचे 92वर्षे वय होते.एक उत्तम आदर्श प्राथमिक शिक्षक म्हणून त्यांची ख्याती होती. धार्मिक ,आध्यात्मिक क्षेत्रात ,तसेच दानधर्म करण्यात त्यांचा उत्तम नाव लौकिक होता दरवर्षी पंढरपूर वारी करून घरी सर्वांना बोलावून प्रसाद वाटप करीत असत.श्रीमद् भागवत कथेचे आयोजन करून त्यात त्यांचा सक्रिय सहभाग असे. परवाच दिनांक 22जून ते 28जून या काळात त्यांच्या आग्रहावरून प्रा. कृष्णा महाराज नंदकुमार महाराज रामदासी यांचे भागवत कथेचे आयोजन करण्यात आले होते. संत नामदेव नगर येथील श्री रुक्मिणीकांत कृपा सांप्रदायिक वारकरी भजनी मंडळ याचे ते संस्थापक अध्यक्ष होते. कुंबेफळ,राजुरी, बेलूरा, रोळदगाव,बीडच्या बार्शी नाक्यावरील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत त्यांनी उत्तम प्रकारे अध्यापनाचे कार्य केले.होते.

त्यांच्यामागे पत्नी शालिनी ताई ,एक मुलगा कमलाकर,सुन सौ.उषा, एक मुलगी बेबीताई, ,तसेच नात, नात जावई, नातू, नात सून,पणतू असा मोठा परिवार आहे.* त्यांच्या या दुःखद निधनाने सर्व संत नामदेव नगर परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## सचिन भोकरे यांना मातृशोक



**अंबाजोगाई :** येथील सेवानिवृत केंद्रीय मुख्याध्यापिका सौ. अनुराधा कृष्णराव भोकरे यांचे (ता.४) शनिवारी रात्री ८वाजता निधन झाले. त्यांच्यावर (ता.५) रविवारी दुपारी २ वाजता बोरुळ तलाव येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पती दोन मुली एक मुलगा असा परिवार आहे. योगेश्वरी विद्यालयाचे सेवानिवृत्त ग्रंथपाल कृष्णाजी भोकरे यांच्या पत्नी होत,केअर हेल्थ इन्शुरन्सचे ब्रँच मॅनेजर सचिन भोकरे यांच्या मातोश्री होत.

## 'बूथ' मजबूत करा आणि स्व. अजितदादांच्या विचारांचा जनसेवा सप्ताह यशस्वी करा: आमदार प्रकाशदादा सोळंके

### माजलगावच्या ऐतिहासिक मेळाव्यात हजारो कार्यकर्त्यांची उपस्थिती; मतदार यादी पुनर्निरीक्षण (SIR) आणि जनसेवेच्या माध्यमातून आगामी निवडणुका जिंकण्याचा निर्धार

**किल्ले धारूर ( प्रतिनिधी ) :** "राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची खरी ताकद हे पक्षाचे प्रामाणिक आणि निष्ठेचे कार्यकर्ते आहेत. आगामी काळातील प्रत्येक निवडणुकीचा पाया हा मतदान केंद्रनिहाय म्हणजेच 'बूथ' पातळीवरील मतदार यादीवर अवलंबून असतो. त्यामुळे निवडणूक आयोगाच्या मतदार याद्या पुनर्निरीक्षण (SIR) कार्यक्रमात कार्यकर्त्यांनी डोळ्यात तेल घालून काम करावे. आपल्या विचारांच्या लोकांची नावे यादीत समाविष्ट राहतील आणि विरोधकांची दुबार किंवा चुकीची नावे नियमानुसार वगळली जातील याकडे कार्यकर्त्यांनी लक्ष दिले पाहिजे. मतदार यादी हाच निवडणुकीचा पाया असल्याने भविष्यातील विजयासाठी हे काम चोख करणे गरजेचे आहे," असे प्रतिपादन माजलगाव मतदारसंघाचे भाग्यविधाते आमदार प्रकाशदादा सोळंके यांनी केले. माजलगाव येथे आयोजित भव्य 'कार्यकर्ता संवाद बैठक' आणि नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते. यावेळी मतदारसंघातील हजारो कार्यकर्ते, नवनियुक्त पदाधिकारी, विविध गावांतील सरपंच, नगरसेवक आणि बाजार समितीचे संचालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला आमदार सोळंके यांनी सर्व उपस्थितांचे व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे मनापासून स्वागत व अभिनंदन केले.



आपल्या भाषणात आमदार प्रकाशदादा सोळंके यांनी निवडणूक आयोगाच्या मतदार यादी सुधारणा कार्यक्रमावर विशेष भर दिला. बीड जिल्ह्यातील अनेक नागरिक पुणे, मुंबई, ठाणे, नाशिक आणि अहमदनगर या इतर ठिकाणी कामानिमित्त स्थलांतरित झाले असून बऱ्याच लोकांची नावे दोन ठिकाणी आहेत, ती नियमांनुसार आता यादीतून वगळली जाणार आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले. निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणि कार्यक्षमता आणण्यासाठी 'बूथ लेव्हल असिस्टंट' म्हणजेच B.L.A. 2 यांनी आपली भूमिका व जबाबदारी चोख पार पाडावी, जेणेकरून भविष्यातील प्रत्येक निवडणुकीत पक्षाचा विजय निश्चित होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पक्षाचे संस्थापक नेते स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या दुर्दैवी निधनानंतर पक्षाच्या अस्तित्वावर शंका घेणाऱ्यांना उत्तर देताना दादा म्हणाले की, सर्व आमदारांनी एकजुटीने निर्णय घेऊन महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्रीपद आणि पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्षपद सुमित्रा वहिनी यांच्याकडे सोपवले आहे. सुमित्रा वहिनी देखील दादांच्याच पावलावर पाऊल ठेवून सर्वसामान्य कार्यकर्त्यांना आणि जनतेला खंबीर आधार देण्याचे काम करत आहेत.

स्वर्गीय अजितदादांना स्वच्छता, वृक्षारोपण आणि गोरगरिबांना मदत करणे अत्यंत आवडायचे, याची आठवण करून देत आमदारांनी केवळ एक दिवस जयंती न साजरी करता ७ दिवसांचा 'जयंती सप्ताह' जनसेवेच्या माध्यमातून साजरा करण्याचे आदेश दिले. या अंतर्गत माजलगाव आणि किल्ले धारूर या नगरपालिका क्षेत्रांमध्ये १० दिवस विशेष स्वच्छता मोहीम राबवून शहरे सुंदर केली जातील. तसेच प्रत्येक गावाने स्वच्छता करणे, वृक्षलागवड करणे आणि गरिबांचे रेशन कार्ड, पंचायत समितीमधील कामे, शासकीय योजनांचे लाभ मिळवून देणे यांसारखे उपक्रम राबवून दादांना अभिवादन करावे, असे त्यांनी सांगितले. कार्यकर्त्यांनी लोकांचे प्रश्न स्थानिक पातळीवर सोडवावेत आणि न सुटलेले प्रश्न आपल्यापर्यंत घेऊन यावेत, असे आश्वासन त्यांनी दिले.

"गेली ३५ वर्षे मी या मतदारसंघात राजकारण आणि समाजकारणात अविरत कार्यरत आहे. गेल्या निवडणुकीत सर्व जाती-धर्माच्या कार्यकर्त्यांनी आणि जनतेने दिलेल्या आशीर्वादामुळेच मी पाचव्यांदा आमदार म्हणून निवडून आलो असून हा विजय माझा नसून माझ्या प्रामाणिक कार्यकर्त्यांचा आहे," अशा शब्दांत प्रकाशदादांनी कृतज्ञता व्यक्त केली. मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या शेतीसाठी पाणी, वीज, रस्ते, आरोग्य सुविधा आणि शासकीय इमारतींचे बांधकाम करण्यासाठी आपली विकासकामे अविरत सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. माजलगाव शहराची पाणीपुरवठा योजना, रस्त्यांची कामे, भुयारी गटार योजनेचे प्रस्ताव आणि सर्व समाजासाठी तालुक्याच्या ठिकाणी चांगली समाज मंदिरे उभारण्याची जबाबदारी नगरपालिकेने घेतली असून सर्वांना न्याय देण्याचा प्रयत्न सुरू आहे, अशी ग्वाही त्यांनी दिली. शेती आणि दळणवळण बळकट करण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे सांगत त्यांनी कार्यकर्त्यांना मतदार याद्यांचे अचूक पुनर्निरीक्षण करणे आणि स्वर्गीय अजितदादा पवार यांचा जयंती सप्ताह यशस्वी करणे या दोन प्रमुख जबाबदाऱ्यांची आठवण करून देऊन

या महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक कार्यकर्ता संवाद बैठकीला आमदार प्रकाशदादा सोळंके यांच्यासह धारूर नगरीचे नगराध्यक्ष बालाभाऊ जाधव, माजलगावचे नगराध्यक्ष सहालभैय्या चाऊस, वडवणीचे नगराध्यक्ष शेषराव जगताप यांच्यासह तिन्ही तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख पदाधिकारी, सरपंच, नगरसेवक आणि हजारो स्वाभिमानी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पालवनधाम दिंडीचे भक्तिमय प्रस्थान; विठ्ठलनामाच्या गजरात शेकडो वारकरी देहूकडे रवाना

**केज (प्रतिनिधी) :** औरंगपूर (ता. केज, जि. बीड) : आषाढी वारी २०२६ निमित्त श्री जगद्गुरू तुकोबाराय पावनधाम, औरंगपूर येथून पालवनधाम दिंडीचे रविवारी (दि. ५) भक्तिमय वातावरणात उत्साहात प्रस्थान झाले. विठ्ठलनामाच्या अखंड गजरात आणि टाळ-मृदंगाच्या निनादात शेकडो वारकरी श्रीक्षेत्र देहूकडे मार्गस्थ झाले.

दिंडी प्रस्थानापूर्वी संत तुकाराम महाराज यांच्या मूर्तीचा दुग्धाभिषेक ह.भ.प. महंत श्री महादेव महाराज बोराडे (शास्त्री) यांच्या हस्ते करण्यात आला. त्यानंतर हरिनाम भजन, कीर्तन व सामूहिक नामस्मरणाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. "ज्ञानोबा-तुकोबा" आणि "पुंडलिक वरदा हरी विठ्ठल" या जयघोषाने पावनधाम परिसर दुमदुमून गेला.

या दिंडीत औरंगपूरसह बनसारोळा, आवसगाव, कौडगाव, जवळबन, दाभा, कळंबआंबा, लाडेगाव, जयपूर, दिपेवडगाव, सोनवळा, कुंभेफळ, बोरीसावरगाव, होळ, सोमनाथ बोरगाव, चनई, सुरडी, सोनेसांगवी, आवाड, शिरपूरा, अंकोली, सौंदना (आंबा), सौंदना (केज), सावळेश्वर, मोटेगाव, गोटेगाव, इस्थळ, वाकडी, सुकळी, गांजी, चंदनसावरगाव, भावठाणा, बुधोडा, पिंपरीआंबा, गाधवड, वांजरखेडा, फावडेवाडी, पैठण (सा.), तांदळवाडी, गगनबीड, वळगा, वाघोली, लोखंडी सावरगाव, माळेगाव आदी गावांतील वारकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

वारकऱ्यांसाठी वाहन व्यवस्था, भोजन, पिण्याचे स्वच्छ पाणी, वैद्यकीय सेवा तसेच इतर आवश्यक सुविधांची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. संपूर्ण सोहळा शिस्तबद्ध आणि भक्तिमय वातावरणात पार पडला.

ह.भ.प. महंत श्री महादेव महाराज बोराडे (शास्त्री) यांच्या मार्गदर्शनाखाली निघालेली ही दिंडी श्रीक्षेत्र देहू येथे संतश्रेष्ठ तुकोबारायांच्या पालखी सोहळ्यात सहभागी होणार असून, त्यानंतर श्रीक्षेत्र

## उधारी नाकारताच दुकानदारास दगडाने मारहाण करून कत्तीने केला प्राणघातक हल्ला



**बीड :** उधारीवर सामान न दिल्याच्या क्षुल्लक कारणावरून एका किराणा दुकानदारावर दारुड्यांनी जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना बीड तालुक्यातील नागझरी येथे शुक्रवारी सायंकाळी घडली . मद्यधुंद अवस्थेत आलेल्या गुंडांनी वजन करण्याचे माप फेकून दिले. तसेच कत्तीने वार करून व दगडाने मारुन दुकानदाराला गंभीर जखमी केले.

नानासाहेब लक्ष्मण शिंदे (रा. नागझरी, ता. बीड) असे या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या किराणा दुकानदाराचे नाव आहे. नानासाहेब शिंदे यांचे नागझरी गावात किराणा दुकान आहे. शुक्रवारी सायंकाळी ते नेहमीप्रमाणे आपल्या दुकानात असताना गावातीलच दोन तरुण दारूच्या नशेत तर्र होऊन दुकानात आले. त्यांनी नानासाहेब यांच्याकडे उधारीवर सामानाची मागणी केली. मात्र, त्यांना उधारी देण्यास नानासाहेब यांनी नकार दिला.उधारी नाकारल्याचा या मद्यपींना प्रचंड राग आला. त्यांनी दुकानातच हुज्जत घालत नानासाहेब यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. रागाच्या भरात त्यांनी दुकानातील वजन करण्याचे माप फेकून दिले आणि नानासाहेब यांची गचांडी धरून त्यांना बेदम मारहाण केली. वाद एवढ्यावरच थांबला नाही, तर या मद्यपींनी आपल्या आणखी एकास घटनास्थळी बोलावून घेतले. त्यानंतर या तिघांनी मिळून नानासाहेब यांच्यावर दगड आणि कत्तीने (धारदार शस्त्र) सपासप वार केले. या अचानक झालेल्या हल्ल्यात नानासाहेब शिंदे गंभीर जखमी झाले.

## गट निदेशक तथा प्रशासकीय अधिकारी एम. जी. पुजारी यांचा सेवापूर्ती सोहळा संपन्न

**अंबाजोगाई :** लोकनेते गोपीनाथराव मुंडे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था या ठिकाणी ३० जून रोजी झालेल्या या समारंभात विद्यार्थ्यांनी आपल्या लाडक्या गुरुजींची वाजत-गाजत भव्य मिरवणूक काढली. या निवृत्ती सोहळ्याप्रसंगी अनेक आजी-माझी विद्यार्थ्यांचे डोळे पाणावले, ज्यामुळे संपूर्ण सभागृह कमालीचे भावुक झाले होते.

सेवापूर्ती कार्यक्रमाच्या सुरुवातीला आजी-माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येत एम.जी. पुजारी सरांचे अत्यंत जल्लोषात स्वागत केले. सरांना वाहनात बसवून त्यांची परळी आयटीआय च्या प्रांगणात भव्य मिरवणूक काढण्यात आली. आपल्या प्रिय शिक्षकाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विद्यार्थ्यांनी लावलेली हजेरी आणि घोषणांमुळे



परिसरातील वातावरण आनंदमय झाले होते.

मिरवणुकीनंतर मुख्य कार्यक्रम हॉलमध्ये पार पडला. पुजारी सरांच्या लोकप्रियतेमुळे संपूर्ण हॉल विद्यार्थी, मित्र आणि सहकाऱ्यांनी गच्च भरून गेला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परळी आयटीआयचे प्राचार्य संतोष लोखंडे होते प्रमुख पाहुणे म्हणून गंगाखेड आयटीआयचे प्राचार्य फारुकी सर, आणि नांदेड जिल्ह्यातील हादगाव आयटीआयचे प्राचार्य एन. बी. कुलकर्णी सर प्रामुख्याने उपस्थित होते.

मनोगत व्यक्त करतांना; विद्यार्थी व सहकाऱ्यांचे डोळे पाणावले

कार्यक्रमादरम्यान सरांसोबत काम करणाऱ्या सहकाऱ्यांनी आणि शिकलेल्या माजी विद्यार्थ्यांनी आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. पुजारी सरांनी प्रशासकीय अधिकारी आणि मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिलेली शिस्त आणि आकार याबद्दल बोलताना अनेक माजी विद्यार्थ्यांचा कंठ दाटून आला आणि त्यांचे डोळे पाणावले. विद्यार्थ्यांचे हे अपार प्रेम पाहून स्वतःआदरणीय महादेव पुजारी सरही भावुक झाले. त्यांनी आपले अश्रू पुसत, हात जोडून सभागृहातील उपस्थित सर्व आजी-माजी विद्यार्थ्यांना भावी आयुष्यासाठी भरभरून आशीर्वाद दिले. अत्यंत शिस्तबद्ध आणि भावपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन नऊसुपे यांनी केले. तर कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व मान्यवर, सहकारी, पत्रकार आणि आजी-माझी विद्यार्थ्यांचे आभार आर. एस. खेडकर यांनी मानले. या सोहळ्याच्या निमित्ताने एका गुरु-शिष्याच्या नात्याची अनोखी वीण परळीकरांना अनुभवायास मिळाली.

## जिल्हा परिषद ते नगरपालिका रस्त्याची शहर बचाव मंचने केली पाहणी

**बीड (प्रतिनिधी) :** अनेक वर्षापासून जिल्हा परिषद ते नगरपरिषद रस्त्यालगतच्या नाल्या व रस्ता हेतूपुरस्सर पणे दुर्लक्षित ठेवण्यात आलेला होता. हा रस्ता मुद्दामच का दुर्लक्षित ठेवण्यात आला त्यालाही अनेक कारणे आहेत. गेल्या दोन वर्षापासून सतत बीड शहर बचाव मंचाच्या शिष्टमंडळाने नगरपालिकेमध्ये आजवर घेतलेल्या सर्वच बैठकांमधून निवेदने देऊन सातत्याने या रस्त्या साठी पाठपुरावा केलेला आहे. वारंवार या रस्त्याच्या दुरुस्तीची व रस्ता करण्याची मागणी लावून धरलेली आहे. नुकतेच बदलून गेलेले मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी मी हा रस्ता प्राध्यान्यक्रमाने मार्गी लावेल असे वारंवार आश्वासित केले होते. तरी या रस्त्याची व्यथा राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे दिवंगत पालकमंत्री अजित दादा पवार यांच्यासमोरही मांडण्यात आली होती. बीड शहर बचाव मंचाने सातत्याने केलेल्या पाठपुराव्यानंतर व मुख्याधिकारी शैलेश खडसे यांनी केलेल्या सर्व कार्यवाहीनंतर या रस्त्यासाठी शासनाकडून निधी मिळवण्यात आला. बीड शहराला कोणतीही गोष्ट सहजासहजी मिळत नाही. शहराला एखादी गोष्ट मिळाली तरी ती शहरातील नागरिकांच्या व सामाजिक कार्यकर्त्यांच्या अथक प्रयत्नांनी व मोठ्या संघर्षाने मिळत असते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# शिक्षण, आरोग्य आणि गाव तेथे स्मशान भूमीला प्राधान्य द्या- पालकमंत्री

## जिल्हा वार्षिक योजनेच्या ऑनलाईन बैठकीमध्ये घेतला आढावा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ जुलै**

जिल्ह्यातील विकासकामांचे नियोजन करताना शिक्षण, आरोग्य सुविधा आणि 'गाव तेथे स्मशानभूमी' आदी पायाभूत सुविधांच्या बाबींना सर्वोच्च प्राधान्य देऊन जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत निधीचे प्रस्ताव सादर करावेत, असे निर्देश राज्याचे अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री तथा हिंगोलीचे पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी जिल्हा कार्यान्वयीन यंत्रणेच्या प्रमुखांना दिले.

जिल्हा वार्षिक योजनेची आढावा बैठक पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्य प्रणालीद्वारे पार पडली. बैठकीस खासदार डॉ. अजित गोपछडे, खासदार रामराव वडकुते, खासदार नागेश पाटील आष्टीकर, आमदार विक्रम काळे, सईद खान, तानाजी मुटकुळे, संतोष बांगर, राजू ऊर्फ चंद्रकांत नवघरे, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, पोलीस अधीक्षक डॉ. श्रेणीक लोढा, जिल्हा नियोजन अधिकारी अनिता लव्हारे, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी ग. गो. चितळे यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत पालकमंत्री झिरवाळ यांनी आरोग्य विभागातील एमपीडब्ल्यू व परिचारिका भरती प्रक्रियेत झालेल्या दिरंगाईबाबत नाराजी व्यक्त करत संबंधित दोषींवर कारवाई करण्याचे निर्देश दिले. अकोला रोडवरील रेल्वे पुलाच्या भूसंपादनाची प्रक्रिया गतिमान करावी, वनतळ्यांच्या विकासासाठी प्रस्ताव तयार करावेत, महावितरणला आवश्यकतेनुसार जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून देण्यासाठी लोकप्रतिनिधींशी चर्चा करून मंजुरी द्यावी, तसेच सर्व लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या विकासकामांचा प्रस्तावात समावेश करावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

जिल्ह्याच्या लोकप्रतिनिधींनी मांडलेल्या सर्व सूचनांचा विचार करून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्राधान्यक्रमानुसार प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी संबंधित विभागांना दिले. यावेळी मागील बैठकीच्या इतिवृत्तास व अनुपालन अहवालास मान्यता देण्यात आली. तसेच सन २०२५-२६ च्या जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सर्वसाधारण योजना, अनुसूचित जाती उपयोजना आणि आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी उपयोजनेच्या मार्च २०२६ अखेरच्या खर्चास मान्यता देण्यात आली.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी सादरीकरणाद्वारे जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेचा आढावा घेताना चालू वर्षासाठी ३३८ कोटी रुपयांचे मंजूर अनुदान असून, त्याअंतर्गत विविध विकासकामांवरील खर्चाची माहिती दिली. हिंगोली जिल्ह्यात हळदीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असल्याने गोदाम उभारणीची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. आरोग्य विभागासाठी औषध खरेदीसाठी अतिरिक्त निधी, लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या कामांना प्रशासकीय मान्यता, शेतरस्त्यांच्या मोजणीसाठी ३० सर्वेअरची नियुक्ती, रोव्हर मशीन खरेदी, स्मशानभूमी विकासाचे प्रस्ताव, प्रमुख शहरांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा आणि क्रीडांगण विकासासाठी विविध कामे प्रस्तावित असल्याची माहितीही त्यांनी दिली.

अनुसूचित जाती उपयोजनेसाठी ५३ कोटी रुपयांचा निधी मंजूर असून त्याअंतर्गत होणाऱ्या कामांचा आढावा समाज कल्याण विभागाच्या सहायक आयुक्त गीता गुठ्ठे यांनी सादर केला. तर आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी उपयोजनेसाठी चालू वर्षात मंजूर झालेल्या २६ कोटी ५१ लाख रुपयांच्या निधीचा व खर्चाचा आढावा प्रकल्प अधिकारी सुनिल बारसे यांनी मांडला.

यावेळी उपस्थित लोकप्रतिनिधींनी जिल्हा परिषद शाळांची दुरुस्ती, नवीन वर्गखोल्या, स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याची सुविधा, आरोग्य सेवा बळकटीकरण, रस्ते व पुलांची कामे, महावितरणसाठी वाढीव निधी, आदिवासी उपयोजना, भूकंपग्रस्तांना मदत, ग्रामीण रस्ते, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर, आयसीयू, प्राथमिक आरोग्य केंद्रांची दुरुस्ती आणि अपघातप्रवण ठिकाणी उपाययोजना करण्यासंबंधी विविध सूचना मांडल्या.

# जिल्हा सामान्य रूग्णालयाच्या छतावर बिअरच्या बाटल्यांचा खच



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ जुलै**

येथील जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या छतावर मोठ्या प्रमाणात बिअरच्या रिकाम्या बाटल्या आढळून आल्याने रुग्णालय प्रशासनाच्या कारभारावर संशय व्यक्त केला जात आहे. काही सामाजिक कार्यकर्त्यांनी शनिवारी रुग्णालयाच्या छतावर जाऊन पाहणी केली असता तीन पोत्यांमध्ये भरलेल्या तसेच काही रिकाम्या बॉक्समध्ये ठेवलेल्या बिअरच्या बाटल्या दिसून आल्याचा दावा केला आहे. संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी होत आहे.

सामाजिक कार्यकर्त्यांनी केलेल्या पाहणीत पोत्यांमध्ये भरलेल्या तसेच काही रिकाम्या बॉक्समध्ये ठेवलेल्या बिअरच्या बाटल्या आढळल्याचा दावा करण्यात आला आहे. रुग्णालयात सलाईनच्या रिकाम्या बाटल्या असणे अपेक्षित असताना बिअरच्या बाटल्या आढळल्यामुळे हा प्रकार संशयास्पद असल्याचे बोलले जात आहे. रुग्णालयातील काही गैरप्रकार लपविण्याचा प्रयत्न होत असल्याचाही आरोप करण्यात येत असून या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे.

दरम्यान, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. चक्रधर मुंगल यांनी हा प्रकार खोडसाळपणाचा असण्याची शक्यता व्यक्त केली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, छतावरील साहित्याची तपासणी करण्यासाठी समितीने शुक्रवारी पाहणी केली होती. त्यावेळी अशा प्रकारच्या बाटल्या आढळल्या नव्हत्या. त्यामुळे प्रशासनाला अडचणीत आणण्यासाठी हा प्रकार घडवून आणला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. संपूर्ण घटनेची सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चौकशी करण्यात येणार असून दोषींवर योग्य ती कारवाई केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

सामाजिक कार्यकर्ते निनाजी कोंडलकर यांनी रुग्णालय प्रशासनाने सीसीटीव्ही फुटेजची तातडीने तपासणी करून रुग्णालयाच्या छतावर कोण येत होते, बाटल्या कोणी ठेवल्या आणि त्यामागे नेमका कोणाचा हात आहे, याचा शोध घ्यावा, अशी मागणी केली आहे. जिल्हा सामान्य रूग्णालय मागील अनेक दिवसांपासून कोणत्या ना कोणत्या कारणास्तव चर्चेचा विषय बनले आहे.

# हिंगोलीत काँग्रेसच्यावतीने छात्रों की गुंज कार्यक्रमाचे आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ जुलै**

हिंगोली जिल्हा काँग्रेस कमिटी कार्यालय येथे आज जिल्हा काँग्रेस कमिटी, युवक काँग्रेस व विद्यार्थी काँग्रेस (छडणख) यांच्या संयुक्त विद्यमाने 'छात्रों की गूंज' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात शहरासह ग्रामीण भागातील मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन शिक्षण व स्पर्धा परीक्षांशी संबंधित विविध समस्या मांडल्या.

यावेळी विद्यार्थ्यांनी पेपरफुटीच्या वाढत्या घटना, परीक्षा शुल्कामधील भरमसाठ वाढ, एमपीएससी व इतर स्पर्धा परीक्षा वेळेत होत नसल्याने वाढत्या वयोमर्यादेमुळे अनेक विद्यार्थ्यांना परीक्षेला मुकावे लागत असल्याची खंत व्यक्त केली. तसेच, ऑनलाइन परीक्षांमध्ये पेपरफुटीचा धोका अधिक असल्याने एमपीएससी परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घेण्यात याव्यात, अशी मागणीही विद्यार्थ्यांनी केली.

विद्यार्थ्यांनी मांडलेल्या सर्व समस्या व मागण्यांना योग्य स्वरूप देऊन शासन व संबंधित यंत्रणेकडे प्रभावीपणे पाठपुरावा करण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी संघर्ष करण्यासाठी काँग्रेस पक्ष सदैव तत्पर राहील, असे आश्वासन हिंगोली जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष सतीश पाचपुते यांनी दिले. या कार्यक्रमास शेतकरी नेते रमेश शिंदे, बंटी नागरे, भास्कर पोले,जुबेर मामू, विठ्ठल जाधव, शेख, संजय गुहाडे, किसन जुमडे, दत्तराव जाधव, शशिकांत कांबळे, अनुप नायक, पीयूष सोनी, दिपक सोनुळे, अमन शेख, वाजिद बेग, अतुल नायक, सतिश चिभडे, वैभव इंगळे, रिया पिंपरे, प्राची नागरे, दशरथ फोले यांच्यासह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, युवक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**हिंगोली- येथील जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्री नरहरि झिरवाळ यांनी दुरदृश्य प्रणालीद्वारे जिल्हा वार्षिक योजनेची आढावा बैठक घेतली. यावेळी खा रामराव वडकुते, आ. तान्हाजीराव मुटकुळे, आ. राजू नवघरे, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, पोलिस अधीक्षक श्रेणीक लोढा आदींची उपस्थिती होती. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### जि प बांधकाम विभागाचा अजब कारभार



हिंगोली- जिल्हा परिषदेतील बांधकाम विभागाच्या वतीने जिल्हा परिषद येथील विविध भागात नूतनीकरणाचे काम सध्या चालू आहे. परंतु छतांचे प्लास्टर निखळून पडत असतानाही त्या ठिकाणी पीओपी बसवण्याची प्रयत्न गुत्तेदार करीत असल्यामुळे जिल्हा परिषद बांधकाम विभागाचा अजब कारभार पहायला मिळत आहे. दिसत आहे. छताचे प्लास्टर वारंवार गळत असतानाही पीओपी बसविण्यात येत असून होणारा खर्चही व्यर्थ जाणार का असा प्रश्न उपस्थित होत आहेत. तर पायऱ्यांचे कामही निकृष्ट दर्जाचे होत आहे. याकडे जिल्हा परिषद च्या बांधकाम विभागाचे मात्र दुर्लक्ष होताना दिसत आहे. जिल्हा परिषदेतच निकृष्ट कामाकडे दुर्लक्ष करणाऱ्या बांधकाम विभागाचे जिल्ह्यात इतर ठिकाणी काय नियंत्रण असेल असा प्रश्नही आता उपस्थित होऊ लागला आहे. संबंधित गुत्तेदारावर बांधकाम विभागातील अधिकारी काय कारवाई करणार असा सवाल उपस्थित होत आहे.

### हिंगोलीतून अल्पवयीन मुलगी बेपत्ता

हिंगोली-शहरानजीक असलेल्या सुराणा नगर भागातून एक अल्पवयीन मुलगी बेपत्ता झाली असून याप्रकरणी ग्रामीण पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्तीने फुस लावून पळवून नेल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे. कारवाडी येथील एका शाळेत शिक्षण घेणारी अल्पवयीन मुलगी इयत्ता दहावीत शिक्षण घेत आहे. दि २ जुलै रोजी सकाळी १०.३० वाजता मुलीने आईला मैत्रिणीकडे अभ्यासासाठी जात आहे असे सांगून घरातून बाहेर पडली. त्यानंतर ती घरी परतली नाही. कुटुंबियांनी तिचा सर्वत्र शोध घेतला परंतु कुठेच आढळून न आल्याने अखेर कुटुंबियांनी येथील ग्रामीण पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून तक्रारीत अज्ञात व्यक्तीने फुस लावून पळविल्याचा संशय कुटुंबियांना व्यक्त केला आहे. मुलीचा शोध घेण्यासाठी ग्रामीण पोलिसांची विविध पथके रवाना झाली असून अज्ञाताविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### रिसाला बाजार ते रेल्वे स्थानक रस्त्याची दुर्दशा

हिंगोली- शहरातील रिसाला बाजार चौक ते रेल्वे स्थानक रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले आहेत. सध्या पावसाळा सुरू असल्यामुळे या खड्ड्यात पाणी साचत असून अपघाताची शक्यता आहे. रिसाला बाजारकडून रेल्वे स्थानक, जिजामाता नगर तसेच इतर नगराकडे जाणारा हा रस्ता आहे. परंतु या रस्त्याकडे नगर पालिकेचे कायमच दुर्लक्ष झाले आहे. शहरातील गल्लीबोळात नगर पालिकेने कोट्यावधी रूपये खर्च करून सिमेंटचे रस्ते बांधले आहेत परंतु हा वर्दळीचा रस्ता असूनही या रस्त्याचे काम न झाल्यामुळे आश्चर्य व्यक्त होत आहे.

# महाडिबीटी अंतर्गत थकीत रकमेसाठी आज आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ जुलै**

महाडिबीटी अंतर्गत थकीत रक्कम तत्काळ वितरीत करावी यासह इतर मागण्यांसाठी दि ६ जुलै रोजी माजी जिल्हा परिषद सदस्य माधव कोरडे यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येणार असून त्यानंतर जिल्हाधिकारी यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात येणार आहे. शासनाने सन २०२३ मध्ये स्वस्त धान्याऐवजी महाडीबीटीद्वारे पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यात प्रति व्यक्ती प्रति महिना १७० रूपये थेट जमा करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, हिंगोली तालुक्यातील सुमारे ५० टक्के पात्र लाभार्थ्यांना आजपर्यंत या योजनेचा लाभ मिळालेला नाही. तसेच, ज्या लाभार्थ्यांना लाभ मिळाला आहे, त्यांनाही केवळ सन २०२४ पर्यंतच रक्कम मिळाली असून त्यानंतरचे अनुदान अद्याप प्रलंबित आहे.

याबाबत संबंधित विभागाकडे विचारणा केली असता, पुढील कालावधीसाठी निधी उपलब्ध नसल्याचे सांगण्यात येत आहे. गरीब व गरजू कुटुंबांसाठी ही परिस्थिती अत्यंत गंभीर असून, शासनाने जाहीर केलेल्या योजनेचा लाभ वेळेवर न मिळाल्यामुळे त्यांच्यावर आर्थिक ताण वाढत आहे.

या पार्श्वभूमीवर महाडीबीटी अंतर्गत प्रलंबित अनुदान तात्काळ वितरित करावे, तसेच आवश्यक निधी उपलब्ध करून सर्व पात्र लाभार्थ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

# भाजपचे संघटनात्मक बांधणी आणि मतदार यादी पूर्नरिक्षण मोहीमेवर भर




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ जुलै**

भारतीय जनता पार्टीची रविवारी हिंगोली शहरातील हॉटेल राम कृष्ण येथे कार्यकर्ता संमेलन आणि जिल्हा आढावा बैठक संपन्न झाली बैठकीत सुरुवातीला महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

या बैठकीचे मुख्य मार्गदर्शक म्हणून भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष तथा हिंगोली जिल्हा प्रभारी संजयभाऊ कौडगे उपस्थित होते. कार्यकर्त्यांना संबोधित करताना त्यांनी आगामी काळातील राजकीय रणनीती, पक्षाची ध्येयधोरणे आणि संघटनात्मक बळकटीकरणाबाबत अत्यंत मोलाचे व दिशादर्शक मार्गदर्शन केले. तसेच आगामी काळातील मतदार यादी पुनर्निरीक्षण मोहीम जिल्ह्यात अत्यंत प्रभावीपणे राबवण्याचे आवाहन त्यांनी केले. या बैठकीत हिंगोली जिल्ह्यातील भाजपच्या सद्यस्थितीचा आणि सुरू असलेल्या संघटनात्मक कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

या संमेलनाला राज्यसभा खासदार डॉ.रामराव वडकुते,आमदार तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, जिल्हा सरचिटणीस उमेश नागरे, अतिश दांडेगावकर, महीला मोर्चाचे उज्वलाताई तांभाळे, युवा जिल्हाअध्यक्ष शिवाजी मुटकुळे, शशिकांत वडकुते, जिल्हा प्रवक्ता विलास गोरे यांच्यासह डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या १२५ व्या जयंती संमेलनाचे संयोजक सुरजीत सिंह ठाकुर, समिती सदस्य शंकर बोरुडे, सुभाष लदनीया यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी मान्यवरांनी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या जीवनकार्याला उजाळा देत त्यांच्या विचारांवर चालण्याचा संकल्प व्यक्त केला.

या बैठकीसाठी रजनिश पुरोहीत, माणिक लोडे, कांतराव कोटकर, विष्णु बोचकरी विठ्ठल भोयर, औंकार नावडे, सुधाकर लोमटे, पवन उपाध्याय, श्रीरग राठोड, पद्माकर नायक, हनुमान कराळे, गुड्डु देवकते, संदीप वाकडे तसेच भाजपचे सर्व नगरसेवक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हिंदू-मुस्लीम एकतेचे प्रतीक, हिंगोलीत गिलोरीच्या दिंडीचे स्वागत



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ जुलै**

श्री क्षेत्र गिलोरी (जिल्हा अमरावती) येथून निघालेल्या श्री परम हंस महमंद खान महाराज दिंडीचे हिंगोली शहरात आगमन झाले. या दिंडीचे मारवाडी गल्लीतील रहिवासी नारायण ओझा व समस्त मारवाडी गल्लीतील नागरिकांच्या वतीने अत्यंत उत्साहात आणि भावपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले.

विशिष्ट परंपरा आणि वैशिष्ट्य लाभलेली ही दिंडी म्हणजे हिंदू-मुस्लिम एकतेचे एक अनोखे आणि जिवंत प्रतीक मानली जाते. समाजात सलोखा आणि बंधुभाव वाढीस लावणाऱ्या या दिंडीचे स्वागत करण्याची परंपरा मारवाडी गल्लीतील भाविकांनी अखंडपणे जपली आहे. मागील आठ वर्षांपासून नारायण आझा आणि गल्लीतील सर्व मंडळी दरवर्षी या दिंडीचे अत्यंत श्रद्धेने स्वागत करत आहेत.

यावेळी दिंडीतील वारकऱ्यांचे स्वागत करून त्यांना अल्पोपहार व फळांचे वाटप करण्यात आले. या स्वागतामुळे मारवाडी गल्लीत भक्तीचे वातावरण निर्माण झाले होते. याप्रसंगी परिसरातील नागरिक, महिला व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वाहतुक पोलिसांवर मुख्य रस्त्यावरील जनावरांना बाजुला करण्याची वेळ



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ जुलै**

हिंगोली शहरातील मुख्य बाजारपेठेसह विविध प्रमुख चौकांमध्ये मोकाट जनावरांनी मांडलेला ठिय्या आता स्थानिक नागरिक, व्यापारी आणि वाहनधारकांसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहे. या जनावरांमुळे शहरात अपघातांचे प्रमाण कमालीचे वाढले असून, नगर परिषद प्रशासन या गंभीर समस्येकडे साफ दुर्लक्ष करत असल्याचा संतप्त आरोप नागरिकांमधून केला जात आहे. अशातच, आज शहरातील अग्रसेन महाराज चौक परिसरातील मुख्य रस्त्यावर जनावरांनी ठिय्या मांडल्यामुळे वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. अखेर पालिका प्रशासनाची वाट न पाहता, कर्तव्यावर असलेल्या वाहतूक शाखेच्या पोलीस कर्मचाऱ्यांनी स्वतः रस्त्यावर उतरून ही जनावरे बाजूला करण्याची धडक मोहीम हाती घेतली. पोलिसांच्या या तत्परतेमुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

प्रमुख रस्ते बनले जनावरांचे आखाडे

शहरातील अत्यंत गजबजलेला जव्हार रोड, गांधी चौक, इंदिरा गांधी चौक आणि रिसाला चौक या प्रमुख भागांमध्ये सध्या मोठ्या जनावरांचा सुळसुळाट झाला आहे. भर रस्त्यात आणि चौकाचौकात ही मोठी जनावरे ठाण मांडून बसत असल्याने वाहन चालवताना वाहनधारकांना मोठी कसरत करावी लागते. अनेकदा ही जनावरे अचानक रस्त्यावरून धावल्याने किंवा आपापसात भिडल्याने गंभीर अपघात घडले आहेत. या समस्येवर नगर परिषदेने कोंडवाडा सुरू करून जनावरांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी वारंवार होत आहे. मात्र, पालिकेच्या उदासीनतेमुळे नागरिकांना रोजच मनस्ताप सहन करावा लागत आहे.

# तीन वेळा नगरसेवक राहिलेले फिरोज भाई शेकडो समर्थकांसह भाजपमध्ये

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ५ जुलै -**

नांदेड शहराच्या राजकारणात रविवारी मोठा राजकीय धक्का बसला. प्रभाग क्रमांक ८ मधील प्रभावी नेतृत्व, तिनवेळा नगरसेवक राहिलेले फिरोज खान (फिरोज भाई) यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश करत शहरातील राजकीय समीकरणांनाच नवे वळण दिले. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

फिरोज भाई हे नांदेडच्या राजकारणातील वजनदार नाव मानले जाते. काँग्रेस, एमआयएम आणि अपक्ष उमेदवार म्हणून जनतेचा कौल मिळवत त्यांनी तीन वेळा नगरसेवकपद भूषविले आहे. प्रभाग क्रमांक ८ मध्ये त्यांचा मजबूत जनाधार, सर्वधर्मीय समाजातील प्रभावी संपर्क आणि कार्यकर्त्यांचे विस्तृत जाळे लक्षात घेता, त्यांचा भाजप प्रवेश हा आगामी महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अत्यंत महत्त्वाचा राजकीय घटनाक्रम मानला जात आहे.




आमदार अमरनाथ राजुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली नई आबादी, लेबर कॉलनी, लालवाडी, तेहरा नगर, श्रावस्ती नगर, आंबेडकर नगर आणि गोकुळ नगर परिसरातील शेकडो कार्यकर्त्यांनी फिरोज भाई यांच्या नेतृत्वाखाली भाजपमध्ये प्रवेश केला. या प्रवेशामुळे संबंधित भागात भाजपची संघटनात्मक ताकद लक्षणीयरीत्या वाढणार असून विरोधी पक्षांसमोर मोठे आव्हान उभे राहिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

या पक्षप्रवेश सोहळ्यास माजी मंत्री डी. पी. सावंत, महापौर प्रतिनिधी संतोष मुळे, माजी महापौर प्रतिनिधी विजयभाऊ येवनकर, नगरसेवक उमेश चव्हाण, सलाम चावलवाला, अमितभाऊ, माजी नगरसेवक संदीप सोनकांबळे, अमितभाई वाघ यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

पक्षप्रवेश करणाऱ्यांमध्ये हाफिज मास्टर, शम्मू काजी, शेख रियाज, शेख खाजा (पोलीस मित्र), मिर्झा आजम बेग, हमीद खान, शेख अन्वर, हकीम भाई, रऊफ भाई, नदीम भाई, बबलू मोहम्मद टेलर, मोहसीन भाई, जलाल टेलर, मोईनुद्दीन काजी, अझर भाई, शोएब खान, शेख आजम खान, नुसरत खान, अशफाक खान, खलील भाई, खदीर भाई, रज्जाक भाई, पाशा मामू, कलाम भाई, आदिल खान, सोहेल खान, मझर भाई, अहमद, रियाज (बेकरीवाले), सुलतान भाई, उमेर भाई, युसूफ भाई, नजीब भाई, मदस्सीर भाई यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांचा समावेश होता.

यावेळी बोलताना फिरोज भाई म्हणाले, अशोकराव चव्हाण साहेब यांच्या नेतृत्वावर आणि भारतीय जनता पक्षाच्या विकासाभिमुख विचारसरणीवर विश्वास ठेवून मी व माझे सहकारी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी, नागरिकांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी आणि पक्ष संघटना अधिक सक्षम करण्यासाठी आम्ही पूर्ण ताकदीने काम करू.

फिरोज भाई यांच्या या निर्णयामुळे नांदेड महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकांपूर्वी शहरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, त्यांच्या प्रवेशाने भाजपला मोठे राजकीय बळ मिळाल्याची चर्चा सर्वत्र सुरू आहे.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्काराने गोविंद शिनगारे यांचा गौरव

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. ५ जुलै -**

येथून जवळच असलेल्या बिजूर तालुका बिलोली येथील प्रगतशील शेतकरी गोविंद बाबाराव शिनगारे यांना महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागातर्फे सन २०२३ चा प्रतिष्ठेचा वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार प्रदान करण्यात आला. राज्यातील शेती क्षेत्रात नवकल्पना, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, उत्पादनवाढ, शाश्वत शेती आणि इतर शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी कार्य याची दखल घेत हा मानाचा पुरस्कार त्यांना जाहीर करण्यात आला. मुंबई येथील वरळीतील सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम येथे झालेल्या राज्यस्तरीय कृषी पुरस्कार वितरण सोहळ्यात महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या हस्ते शिनगारे यांचा सन्मान करण्यात आला.




यावेळी कृषी क्षेत्रातील अनेक मान्यवर, अधिकारी आणि राज्यभरातील प्रगतशील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. गोविंद शिनगारे यांनी आपल्या मेहनत, सातत्य आणि प्रयोगशील वृत्तीच्या जोरावर शेतीला आधुनिकतेची जोड देत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. पारंपरिक शेतीबरोबरच सुधारित तंत्रज्ञान, पीक व्यवस्थापन, उत्पादनवाढ आणि शेतकरीहिताच्या उपक्रमांमुळे त्यांनी परिसरातील अनेक शेतकऱ्यांना नवी दिशा दिली आहे. त्यांच्या या कार्याचा गौरव राज्य शासनाने पुरस्काराच्या माध्यमातून केल्याने बिजूर गावासह संपूर्ण बिलोली तालुका आणि नांदेड जिल्ह्यासाठी ही अभिमानाची बाब ठरली आहे.

पुरस्कार जाहीर झाल्यानंतर त्यांच्या सौभाग्यवती सरोजा शिनगारे, कन्या अनुजा शिनगारे, सुपुत्र अजय शिनगारे, तसेच शिवाजीराव कु-हाडे यांच्यासह कुटुंबीयांनी आनंद व्यक्त केला. बिजूर ग्रामस्थ, विविध सामाजिक संस्था, कृषी क्षेत्रातील जाणकार, लोकप्रतिनिधी आणि शेतकरी बांधवांकडून गोविंद शिनगारे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा ओघ सुरू आहे. ग्रामीण भागातील कष्टकरी शेतकरीही जिद्द, वैज्ञानिक दृष्टीकोन आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या बळावर राज्यस्तरावर मानाचे स्थान मिळवू शकतो, याचे प्रेरणादायी उदाहरण गोविंद शिनगारे यांनी आपल्या कार्यातून निर्माण केले आहे. त्यांच्या या यशामुळे परिसरातील तरुण शेतकऱ्यांमध्ये नव्या उमेदीने आधुनिक शेतीकडे वाटचाल करण्याची प्रेरणा निर्माण झाली आहे



## तळागाळातील लढवय्या गंगाधर कोत्तेवारची शिवसेनेत दमदार एन्ट्री

**नायगाव** -नायगांव तालुक्यातील होटाळा येथील सामाजिक क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविणारे आणि लहुजी क्रांती सेनेचे जिल्हापाध्यक्ष म्हणून सक्षमपणे जबाबदारी सांभाळणारे गंगाधर दिगांबरराव कोतेवार होटाळकरानी शिवसेनेत जाहीर प्रवेश करून आपल्या सार्वजनिक कार्याला नवे राजकीय व्यासपीठ प्राप्त करून दिले आहे. ठाणे येथे दि.२८ जून रोजी झालेल्या पक्षप्रवेश सोहळ्यात उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदें यांच्या हस्ते त्यांनी शिवबंधन बांधले.दीर्घ काळ सामाजिक संघटनांमधून कार्य करताना कोतेवार यांनी अनेक सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा केला. वंचित, उपेक्षित आणि गरजू घटकांच्या न्याय्य हक्कांसाठी विविध स्तरांवर त्यांनी भूमिका मांडली. त्यांच्या स्पष्टवक्तेपणा, संघटन कौशल्य आणि लोकांशी असलेल्या सातत्यपूर्ण संपर्कामुळे त्यांना परिसरात एक अभ्यासू व धाडसी कार्यकर्ता म्हणून ओळख मिळाली. सामाजिक कार्याचा विस्तार करताना जनतेच्या प्रश्नांना अधिक प्रभावीपणे न्याय मिळवून देण्यासाठी राजकीय व्यासपीठाची आवश्यकता असल्याची भावना त्यांच्या समर्थकांनी अनेकदा व्यक्त केली होती. त्या पार्श्वभूमीवर त्यांनी शिवसेनेची वाट निवडत पक्षात प्रवेश केला. या सोहळ्यास इहरींरहशल थरज्ञलहरींश यांच्यासह पक्षाचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी मुकिंदर कुडके,शेख इस्माईल कुंचेलीकर,राजेंद्र अडागळे, रमेश रोकडे तसेच बाबुराव आंबेगावकर यांनीही शिवसेनेत प्रवेश करून कोतेवार यांना साथ दिली. या पक्षप्रवेशामुळे नायगांव तालुक्यातील राजकीय समीकरणांमध्ये नव्या चर्चांना सुरुवात झाली असून, विविध सामाजिक संघटना, मित्रपरिवार आणि नागरिकांकडून गंगाधर कोतेवार होटाळकर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आगामी काळात त्यांच्या सामाजिक अनुभवाचा आणि जनसंपर्काचा लाभ शिवसेनेच्या संघटनात्मक विस्तारासह जनतेच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## स्वारातीम विद्यापीठात डिजिटलायझेशनच्या दिशेने पाऊल

**नवीन नांदेड** -स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने डिजिटल प्रशासन आणि ई-गव्हर्नन्सच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण झेप घेत 'सेंट्रलाइज पेमेंट गेटवे' (उशपींीरश्रळूशव झरूाशपीं ॠरींशुरू) या अत्याधुनिक ऑनलाइन शुल्क भरणा प्रणालीचा शुभारंभ केला आहे. या अभिनव सुविधेमुळे विद्यार्थ्यांना आणि संबंधित घटकांना विद्यापीठातील विविध प्रकारची शुल्के एकाच डिजिटल व्यासपीठावरून सहज, सुरक्षित आणि पारदर्शक पद्धतीने भरता येणार आहेत. या प्रणालीचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. ए. एम. महाजन, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार तसेच वित्त व लेखा अधिकारी डॉ. राजेश शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, डॉ. पतंगे, डॉ. बाविस्कर, डॉ. खडके, नॅक संचालक डॉ. सुरेंद्र रेड्डी तसेच नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य विभागाचे संचालक डॉ. शैलेष वाढेर यांच्यासह विविध संकुलांचे संचालक, विभागप्रमुख, प्राध्यापक व प्रशासकीय अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवीन केंद्रीय पेमेंट गेटवे प्रणालीमुळे विद्यार्थ्यांना प्रवेश शुल्क, परीक्षा शुल्क, पदवी प्रमाणपत्र शुल्क, विविध अर्ज शुल्क तसेच विद्यापीठाशी संबंधित इतर सर्व आर्थिक व्यवहार एकाच ठिकाणी करता येणार आहेत. यामुळे विविध शुल्कांसाठी स्वतंत्र प्रक्रिया पूर्ण करण्याची आवश्यकता राहणार नाही. विद्यार्थ्यांचा मौल्यवान वेळ वाचणार असून, रांगेत उभे राहण्याची गरज कमी होणार आहे. विशेष म्हणजे, या सुविधेमुळे विद्यार्थ्यांना नगदी रक्कम बाळगण्याची आवश्यकता राहणार नसून डिजिटल माध्यमातून सुरक्षित व्यवहार करता येतील. सर्व व्यवहारांची तत्काळ नोंद उपलब्ध होत असल्याने आर्थिक व्यवहारांमध्ये अधिक पारदर्शकता, अचूकता आणि विश्वासार्हता निर्माण होणार आहे. तसेच व्यवहारांची गती वाढून प्रशासनिक कार्यक्षमतेतही लक्षणीय सुधारणा होणार आहे.

# मतदार यादीतील एकही पात्र नागरिक वंचित राहू नये : उपजिल्हाधिकारी राजकुमार माने

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. ५ जुलै -**

लोकशाहीचा सर्वात महत्त्वाचा आधार असलेल्या मतदार यादीची अचूकता सुनिश्चित करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने हाती घेतलेल्या विशेष संक्षिप्त मतदार यादी पुनरीक्षण (डखठ-२०२६) मोहिमेला नायगाव तालुक्यात वेग आला आहे. या मोहिमेत कोणताही पात्र नागरिक मतदानाच्या घटनात्मक अधिकारापासून वंचित राहू नये, यासाठी प्रत्येक नागरिकाने सक्रिय सहभाग नोंदवून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन उपजिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी राजकुमार माने यांनी केले.



शनिवार (दि. ४ जुलै) रोजी त्यांनी कुंटूर, बरबडा आणि नरसी येथे प्रत्यक्ष भेट देत सुरू असलेल्या पुनरीक्षण मोहिमेचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी बूथ लेव्हल अधिकारी (बीएलओ), मतदार आणि ग्रामस्थांशी संवाद साधून मोहिमेचे महत्त्व, प्रक्रिया आणि नागरिकांची भूमिका याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी तहसीलदार धम्मप्रिया गायकवाड व निवडणूक विभागाचे सुपरवायझर के. एल. नलबलवार यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. विशेष पुनरीक्षण मोहिमेंतर्गत ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत बीएलओ प्रत्येक घराला तीन वेळा भेट देऊन प्रगणन फॉर्मचे वितरण, मतदारांची माहिती संकलन आणि आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करणार आहेत. त्यामुळे नागरिकांनी आवश्यक कागदपत्रे वेळेत उपलब्ध करून देत प्रशासनाला पूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन माने यांनी केले. प्रशासनाच्या वेळापत्रकानुसार ५ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार असून ५ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर या कालावधीत नाव समाविष्ट करणे, वगळणे अथवा दुरुस्तीसाठी दावे व हरकती स्वीकारल्या जाणार आहेत. त्यानंतर सुनावणी पूर्ण करून ३ ऑक्टोबर पर्यंत निर्णय घेण्यात येईल आणि ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे. मतदानाचा अधिकार हा लोकशाहीतील सर्वात मौल्यवान अधिकार आहे.

त्यामुळे प्रत्येक कुटुंबाने आपल्या सर्व सदस्यांची नावे मतदार यादीत अचूक आहेत का, याची खात्री करून आवश्यक दुरुस्त्या वेळेत करून घ्याव्यात. तसेच ही जनजागृती आपल्या परिसरातही पोहोचवून लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन उपजिल्हाधिकारी राजकुमार माने यांनी केले. या भेटीदरम्यान बीएलओ जिलानी बागवान, चिंतले, कवटीकवार, चिखले, आडबलवार, गाजलवाड, नंदकिशोर नरसीकर यांच्यासह संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# नायगांवात एका रात्रीत पाच दुकाने फोडली

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. ५ जुलै -**

नायगांव शहरातील मध्यवर्ती बाजारपेठेत शनिवारी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी अक्षरशः धुमाकूळ घालत एका रात्रीत सलग पाच दुकाने फोडल्याची धक्कादायक

घटना घडली.विशेषतःही सर्व दुकाने पोलीस ठाण्याच्या हाकेच्या अंतरावर असल्याने शहरातील व्यापारी, नागरिक आणि व्यावसायिकांमध्ये तीव्र अस्वस्थता पसरली असून सुरक्षाव्यवस्थेच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, मध्यरात्रीनंतर चोरट्यांनी मुख्य बाजारपेठेतील दुकानांचे शटर उचकटून आत प्रवेश केला. काही दुकानांमधील रोकड, तर काही ठिकाणचे मौल्यवान साहित्य आणि विक्रीसाठी ठेवलेल्या वस्तू लंपास करण्यात आल्या. पहाटे दुकानदार दुकाने उघडण्यासाठी आल्यानंतर तुटलेली शटर, अस्ताव्यस्त पडलेले साहित्य आणि चोरीचे स्पष्ट चिन्ह दिसताच परिसरात एकच खळबळ उडाली. काही वेळातच बाजारपेठेत व्यापारी आणि नागरिकांची मोठी गर्दी झाली.



या घटनेची सर्वाधिक चर्चा पोलीस ठाण्याच्या निकटवर्ती परिसरातच चोरी घडल्यामुळे होत आहे. एका रात्रीत सलग पाच दुकाने फोडली जाणे ही सामान्य बाब नसून शहरातील सुरक्षाव्यवस्थेबाबत गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे. व्यापारी वर्गाने रात्रीच्या गस्तीची प्रभावी अंमलबजावणी, बाजारपेठेतील सुरक्षा व्यवस्था आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत प्रश्न उपस्थित केले आहेत.

गेल्या काही दिवसांपासून शहरात चोरीच्या घटनांची वाढ होत असल्याची भावना व्यापाऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे. त्यामुळे व्यवसायिकांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले असून लाखो रुपयांच्या नुकसानीमुळे अनेक व्यापाऱ्यांना आर्थिक फटका बसल्याचे सांगितले जात आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज जप्त करून त्याची तपासणी सुरू करण्यात आली असून संशयितांच्या हालचालींचा मागोवा घेण्यासाठी तांत्रिक तपासही सुरू करण्यात आला आहे. चोरट्यांचा लवकरात लवकर शोध घेण्यासाठी विविध पथके कार्यरत असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

दरम्यान, व्यापारी संघटनांनी या घटनेचा तीव्र निषेध नोंदवत दोषींना तातडीने अटक करावी, रात्रीची गस्त अधिक प्रभावी करावी, मुख्य बाजारपेठेत कायमस्वरूपी सुरक्षा व्यवस्था उभारावी आणि व्यापाऱ्यांच्या जीवित व मालमत्तेच्या संरक्षणासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे. या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास तीव्र आंदोलना चा इशाराही बाजार पेठेतील व्यापाऱ्यांनी दिला आहे.

**बाजार पेठेतील व्यापाऱ्यांचा पोलीस प्रशासनाला थेट सवाल**

पोलीस ठाण्याच्या हाकेच्या अंतरावर असलेली दुकानेही सुरक्षित नसतील, तर शहरातील सामान्य व्यापाऱ्यांनी आणि नागरिकांनी सुरक्षिततेची अपेक्षा कोणाकडून करायची? असा संतप्त सवाल व्यापारी वर्गातून उपस्थित केला जात आहे. या घटनेमुळे शहरातील कायदा व सुव्यवस्थेच्या अंमलबजावणीबाबत नव्याने चर्चा सुरू झाली आहे

# मोमिनपुरा येथे एस.आय.आर. विशेष नोंदणी शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ५ जुलै -**

विशेष सघन पुनरिक्षण (ड.ख.ठ.) अभियानांतर्गत रविवारी (दि. ५ जुलै) मोमिनपुरा येथील जवाहरुल उलूम उर्दू स्कूल येथे सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत विशेष नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या शिबिराचे आयोजन ॲड. माज बडगुजर, सचिव, वकील संघ, किनवट यांच्या पुढाकाराने करण्यात आले. शिबिरात मुख्याधिकारी मृगाजी काकडे, तसेच संबंधित बीएलओ यांनी उपस्थित राहून मतदार नोंदणी, नाव दुरुस्ती, पत्ता बदल, नवीन मतदार नोंदणी आदी प्रक्रियेबाबत नागरिकांना मार्गदर्शन केले.

शिबिरात परिसरातील बहुसंख्य नागरिकांनी उपस्थित राहून आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून विविध सेवांचा लाभ घेतला. मतदार यादी अधिक अचूक व अद्ययावत करण्याच्या दृष्टीने अशा शिबिरांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

# भोकरमध्ये खूलेआम गूटखा विक्री; संबधिताचे दूर्लक्ष

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. ५ जुलै -**

पानमसाला सूगंधीत जर्दा व गूटखा हे मानवी आरोग्यास घातक ठरत असल्यामूळे राज्यसरकारकडून यावर बंदी आणली शासनाच्या आदेशाला केराची टोपली दाखवत भोकरमध्ये प्रतिबंधित अवैध गूटखा सर्रास विक्रि होताना पहावयास मिळत आहे.

शहरातील गूटखा विक्रेत्यांनी सूपारी स्टोअर्स, गोळी भांडार या नावाने आपली दूकाने थाटली या दूकानातून सर्रास गूटखा व जर्दा विक्रि सूरू असून अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयूक्त तूकाराम मूंढे यांचेकडे सूत्रे आल्यानंतर राज्यातील अनेक गूटखा माफीयांचे व भेसळ करणार्यांचे धाबे दणाणले त्यांना धडाकेबाज कारवायासाठी ओळखले जातात भेसळयूक्त अन्नपदार्थ व बनावट औषधाच्या विरोधात त्यांनी पूकारलेल्या मोहिमेमूळे अनेक अवैध धंदेवाल्याचे धाबे दणाणले आहेत.भोकर शहरात मात्र गूटखा माफीयांनी सर्रास गूटखा विक्रि करित असल्याचे निदर्शनास येत आहे.मोठ्या प्रमाणात गूटखा साठवून भोकर तालूक्यासह इतरत्र वाहतूक करित असल्याची चर्चा आहे.भोकर शहर हे तेलंगणा सिमेवर असल्यामूळे माफीयांनी तेलंगणातून गूटखा आणून किरकोळ व्यापार्यांना चढ्या दराने विक्रि करत आपले उखळ पांढरे करुन घेत आहेत गूटखा माफीयांची गोदामे इतरत्र असल्याची माहिती असून साठवणूक करित असलेल्या गोदामाची चौकशी केल्यास मोठ्या प्रमाणात गूटख्याचा साठा मिळण्याची शक्यता वर्तविण्यात येते अन्न व औषध प्रशासनातील अधिकारी भोकरमधील गूटखा माफीयांना अभय देत असल्याने गूटखा माफीयांचे मनोबल वाढले आहे.वरिष्ठांनी याकडे लक्ष घालून भोकर शहरातील प्रतिबंधित गूटखा विक्रि तात्काळ बंद करण्यात यावी अशी मागणी नागरीक करित आहेत.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



सोयगाव - छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदी निवडून आल्याबद्दल शिवसेना भवन कार्यालय सोयगाव येथे प्रभाकर (आबा) काळे यांचा जाहीर सत्कार करताना सोयगाव नगरपंचायतचे गटनेते अक्षय काळे,शिवसेना शहर प्रमुख तथा नगरसेवक संतोष बोडखे,कदिर शहा,भैरवनाथ पतसंस्थेचे मॅनेजर धनराज औरंगे आदींसह उपस्थित होते.

## महाकर्जमुक्ती योजनेतील लाभार्थी शेतकऱ्यांना दिलासा, लाभ मिळेपर्यंत व्याज आकारू नयेत; शासनाचे स्पष्ट आदेश

राज्य शासनाच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' अंतर्गत पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना आणखी एक मोठा दिलासा देण्यात आला आहे. योजनेचा प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा होईपर्यंत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका तसेच विविध कार्यकारी सहकारी संस्थांनी पात्र थकीत पीककर्जाच्या रकमेवर कोणत्याही प्रकारची व्याज आकारणी करू नये, असे स्पष्ट आदेश सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने जारी केले आहेत. मंत्रिमंडळाने मंजूर केलेल्या कर्जमुक्ती योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. शासन निर्णयानुसार ३० जून २०२५ रोजी थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली पात्र पीककर्जे या योजनेसाठी ग्राह्य धरण्यात आली आहेत. अशा पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार असून, दोन लाख रुपयांपेक्षा अधिक कर्ज असलेल्या शेतकऱ्यांना अतिरिक्त रक्कम भरल्यानंतर एकवेळ समजोता योजनेचा लाभ मिळणार आहे. तसेच नियमित पीककर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभही देण्यात येणार आहे. या योजनेत अल्पमुदतीची पीककर्जे तसेच पुनर्गठित आणि फेरपुनर्गठित पीककर्जांचाही समावेश करण्यात आला आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी मानक कार्यपद्धती (SOP) निश्चित करण्यात आली असून, पात्र कर्जखात्यांची माहिती संगणकीय प्रणालीवर अपलोड करणे, कर्जखात्यांचे पडताळणीकरण, आधार प्रमाणीकरण आणि त्यानंतर कर्जमाफीची रक्कम संबंधित कर्जखात्यात हस्तांतरित करण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. शासनाने नमूद केले आहे की, ही संपूर्ण प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी काही कालावधी लागणार आहे. त्यामुळे कर्जमाफीची रक्कम प्रत्यक्ष खात्यात जमा होण्यापूर्वी शेतकऱ्यांच्या कर्जावर व्याज आकारल्यास त्यांच्यावर अतिरिक्त आर्थिक भार पडू शकतो. ही बाब लक्षात घेऊन पात्र शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी लाभ मिळेपर्यंत थकीत पीककर्जाच्या रकमेवर व्याज आकारणी न करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## 'सिद्धूमुळे विवाहित पुरुषांच्या भावनिक जबाबदाऱ्यांवर प्रकाश' – शिझान खान



**छत्रपती संभाजीनगर :** झी टीव्हीवरील 'गंगा माई की बेटियां' ही मालिका सलग तीन आठवडे टीआरपीमध्ये अव्वल राहिली असून सध्या वैवाहिक आयुष्यातील पुरुषांच्या भावनिक जबाबदाऱ्यांवर आधारित कथानक प्रेक्षकांचे लक्ष वेधत आहे. मालिकेत सिद्धू ही व्यक्तिरेखा आई दुर्गावती आणि पत्नी स्नेहा यांच्यात समतोल राखण्यासाठी संघर्ष करताना दिसते. याबाबत अभिनेता शिझान खान म्हणाला, "लग्नानंतर पुरुषांनाही भावनिक संघर्षांचा सामना करावा लागतो. कुटुंबात शांतता राखण्यासाठी ते अनेकदा स्वतःच्या भावनांना बाजूला ठेवतात. मालिकेत अशा दुर्लक्षित विषयाला वाचा फोडण्यात आली आहे." आगामी भागांमध्ये स्नेहा आणि दुर्गावती यांच्यातील मतभेद कमी करण्यासाठी सिद्धूचे प्रयत्न यशस्वी होतात का, याकडे प्रेक्षकांचे लक्ष लागले आहे.

## गणेश सागरे यांना पीएच.डी. प्रदान



**छत्रपती संभाजीनगर, दि.५ :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च महाविद्यालयाचे ग्रंथपाल गणेश सागरे यांना पीएचडी प्रदान करण्यात आली आहे. त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयात प्रो.डॉ.वैशाली खापर्डे यांच्या मार्गदर्शनात 'ए कम्पेरेटिव्ह स्टडी बिटवीन सोल अँड ओपन सोर्स लायब्ररी ऑटोमेशन सॉफ्टवेअर यूज्ड बाय युनिव्हर्सिटी लायब्ररी इन महाराष्ट्र' या विषयावर आपला शोधप्रबंध सादर केला आहे. या यशाबद्दल गणेश सागरे यांचे एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा. डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.जॉन चेल्लादुराई, संचालक डॉ.रणीत किशोर व सर्व संबंधितांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.



## यशोधाबाई आधार पाटील(शिंदे) यांचे निधन

**सोयगाव,दि. ५ जुलै :** तालुक्यातील माळेगाव(पिंपरी) येथील यशोदाबाई आधार पाटील(शिंदे)वय-८५) यांचे शुक्रवारी (दि.३) रात्री अकरा वाजता वृद्धापकाळाने निधन झाले.शनिवारी (दि.४) त्यांच्या वर सकाळी अकरा वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा,सुन,नातवंडे असा परिवार आहे. माजी उपसरपंच भावराव पाटील शिंदे यांच्या त्या आई होत.



## सय्यद नदीम सलीम यांचे निधन

**सिल्लोड :** प्रतिनिधी .. सिल्लोड शहरातील मोहम्मदया यशवंत नगर शासकीय झोपडपट्टी परिसरातील रहिवाशी असलेले सय्यद नदीम सय्यद सलीम वय ४३ वर्ष यांचे दीर्घ आजाराने दि.०४ शनिवार रोजी सकाळी साडेपाच वाजेच्या दरम्यान एमजीएम हॉस्पिटल औरंगाबाद छत्रपती संभाजीनगर येथे उपचार दरम्यान प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात आई-वडील पत्नी दोन मुले एक मुलगी भाऊ-बहीण असा मोठा परिवार आहे. सय्यद नदीम यांची नमाजे जनाजा जामा मस्जिद मध्ये अदा करण्यात आली असून त्यांचा दफनविधी जुनी भाजी मंडी परिसरातील कब्रस्तांमध्ये करण्यात आला. सय्यद नदीम सय्यद सलीम हे माजी नगरसेवक सय्यद फक्रुद्दीन व माजी नगरसेवक पत्रकार निवृत्त प्रा.मन्सूर कादरी यांचे भाचे तर कम्युनिस्ट पक्षाचे तालुका सचिव कॉम्रेड सय्यद अनिस व पत्रकार सोहेल कादरी यांचे आत्या भाऊ होत.



## संतोष जोशी यांचे निधन

**गंगापूर :**येथील रहिवासी संतोष नंदकुमार जोशी(४९) यांचे आज छत्रपती संभाजी नगर येथे उपचारादरम्यान अल्पशा आजाराने निधन झाले त्यांच्यावर गंगापूर अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आला . त्यांच्या पश्चात पत्नी एक मुलगा एक मुलगी असा परिवार आहे.

# जिल्हा बँक निवडणुकीत आ. संजना जाधव यांचा 98 पैकी 98 मते मिळवत विजय

**तभा वृत्तसेवा**

**कन्नड :-** दि.५ जुलै - सहकार क्षेत्राचे आणि जिल्ह्याचे लक्ष लागून राहिलेल्या छत्रपती संभाजीनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक पदाच्या निवडणुकीत कन्नड तालुक्यातून आमदार संजना जाधव यांनी ऐतिहासिक विजय मिळवला. विविध कार्यकारी सेवा संस्था (सोसायटी) मतदारसंघातून झालेल्या निवडणुकीत त्यांना ९८ पैकी ९८ मते मिळाली. विरोधकांना एकही मत न मिळाल्याने हा निकाल विशेष चर्चेचा विषय ठरला.

या निवडणुकीपूर्वी आमदार जाधव यांच्या उमेदवारीवर आक्षेप घेत विरोधकांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, न्यायालयाने त्यांचे आक्षेप फेटाळून उमेदवारी कायम ठेवल्यानंतर राजकीय समीकरणे बदलली. त्यानंतर अनेक विरोधकांनीही आमदार जाधव यांना पाठिंबा दिल्याचे चित्र पाहायला मिळाले. मतदानात त्यांना सर्वच्या सर्व ९८ मते मिळाल्याने सहकार क्षेत्रात हा निकाल ऐतिहासिक मानला जात आहे.

निकाल जाहीर होताच कन्नड शहरात कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष केला. घोषणाबाजी, गुलालाची उधळण आणि फटाक्यांच्या आतषबाजीत विजयाचा आनंद साजरा करण्यात आला. पिशोर नाका ते कॉलेज गेट येथील आमदार संजना जाधव यांच्या संपर्क कार्यालयापर्यंत विजय मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत आदित्यवर्धन जाधव, सभापती डॉ.मनोज राठोड,उपसभापती जयेश बोरसे, संचालक साईनाथ आल्हाड, ज्ञानेश्वर निकम,शहरप्रमुख राम पवार,बंटी सुरे,आदित्य गर्जे, सिद्धेश्वर झालटे, काकासाहेब कवडे,शिवाजी थेटे, सह मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांचा सहभाग होता.



### DJ च्या गजरात विजय मिरवणूक; परवानगीबाबत चर्चा

विजय मिरवणुकीदरम्यान पिशोर नाका येथे DJ लावण्यात आला होता. तेथून कॉलेज गेट येथील आमदार संजना जाधव यांच्या संपर्क कार्यालयापर्यंत रॅली काढण्यात आली. मोठ्या प्रमाणावर कार्यकर्ते आणि वाहनांचा सहभाग असल्याने काही काळ वाहतूक कोंडी निर्माण झाली आणि नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागला. मिरवणुकीच्या वेळी पोलीस बंदोबस्तही तैनात होता. या पार्श्वभूमीवर DJ वाजविण्यासाठी आवश्यक परवानगी घेण्यात आली होती का? असा प्रश्न काही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. याबाबत संबंधित प्रशासनाकडून अधिकृत स्पष्टीकरण अद्याप समोर आलेले नाही.

## कर्मचारी समाधान शिबिरातील तक्रारी संवेदनशीलतेने हाताळा : अपर आयुक्त खुशालसिंह परदेशी

**छत्रपती संभाजीनगर :** विभागीय कर्मचारी समाधान शिबिरात शासन सेवेत कार्यरत तसेच सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी त्यांच्या प्रलंबित सेवाविषयक अडचणी मांडतात. या तक्रारींवर नियमांनुसार तातडीने आणि संवेदनशीलतेने कार्यवाही करून त्यांचे निराकरण करावे, असे निर्देश अपर आयुक्त खुशालसिंह परदेशी यांनी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित विभागीय कर्मचारी समाधान शिबिरात ते बोलत होते. यावेळी उपायुक्त (विकास/आस्थापना) दादाराव वानखेडे यांच्यासह तक्रारदार सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी तसेच संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

शिबिरात छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आणि जिल्हा परिषद येथील प्रत्येकी एका सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवाकालातील पदोन्नती लाभासंदर्भातील तक्रारींची सुनावणी करण्यात आली. संबंधित विभागांनी या प्रकरणांवर तातडीने नियमानुसार कार्यवाही करावी, असे निर्देश श्री. परदेशी यांनी दिले. तसेच अर्जदारांच्या तक्रारींवर संवेदनशीलतेने काम करून शक्यतो एका महिन्याच्या आत त्या निकाली काढाव्यात, असेही त्यांनी सांगितले.

विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या या विभागीय कर्मचारी समाधान शिबिरात विभागीय स्तरावरील तक्रारींचे निराकरण करण्यात येते. मात्र, जिल्हास्तरावरील प्रकरणे विभागीय स्तरावर येण्याची वेळ येऊ नये, यासाठी संबंधित जिल्ह्यांनी तक्रारींचे प्रभावीपणे स्थानिक स्तरावरच निराकरण करावे. अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक अडचणी वेळेत सोडविण्यासाठी संबंधित विभागांनी पूर्ण क्षमतेने कार्य करावे, असेही श्री. परदेशी यांनी नमूद केले.

मराठवाड्यातील शासन सेवेत कार्यरत तसेच सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित सेवाविषयक अडचणी जलद आणि कार्यक्षमतेने सोडविण्याच्या उद्देशाने विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या संकल्पनेतून संपूर्ण विभागात प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी 'कर्मचारी समाधान शिबिर' आयोजित करण्यात येते.

## विकसित भारत जी-रामजी कायद्याबाबत नादरपुरमध्ये जनजागृती अभियान संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**कन्नड :-**दि. ०३ जुलै - पंचायत समिती कन्नडच्या वतीने ग्रामपंचायत नादरपूर येथे 'विकसित भारत रोजगार व आजीविका हमी मिशन (ग्रामीण) – विकसित भारत जी-रामजी कायदा २०२५' संदर्भात जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. नव्या कायद्याची माहिती ग्रामीण नागरिकांपर्यंत पोहोचविणे आणि रोजगार हमी योजनांबाबत जागरूकता निर्माण करणे, हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.



गटविकास अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमात उपस्थितांना विकसित भारत जी-रामजी कायदा २०२५ मधील महत्त्वाच्या तरतुदी, उद्दिष्टे तसेच पूर्वीच्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा २००५च्या तुलनेत करण्यात आलेल्या बदलांची सविस्तर माहिती देण्यात आली. रोजगार व आजीविका क्षेत्रात नव्या कायद्यामुळे नागरिकांना मिळणाऱ्या संधी आणि अधिकारांबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी रोजगार हमी योजनेअंतर्गत शंभर दिवसांपेक्षा अधिक रोजगार पूर्ण केलेल्या गावातील मजुरांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. त्यानंतर गावातून प्रभात फेरी काढून नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली. हक्क संरक्षणाची सामूहिक प्रतिज्ञा घेण्यात आली असून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी वृक्षारोपणही करण्यात आले.

कार्यक्रमाला सरपंच प्रशासक सविता निकम, सहाय्यक गटविकास अधिकारी विजयकुमार पंडीत, पंचायत समितीचे सहाय्यक संदीप गोंडाळ, तांत्रिक सहाय्यक दिग्विजय सोळुंके, महादेव कटके, पंढरीनाथ जाधव, विनोद अल्हाट, गौरव उगले, आकाश घडसे, भरत शेळके, गणेश चव्हाण, महेश लाटणे, दिनेश घोडके, गीतांजली कीर्तीशाही, ग्रामपंचायत अधिकारी बनकर तसेच ग्रामस्थ, शेतकरी आणि विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### दि.औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,छत्रपती संभाजीनगर संचालक मंडळाच्या निवडणुकीत

## प्रभाकर (आबा)काळे यांच्या विजयानिमित्त सत्कार करून शुभेच्छा

**तभा.वृत्तसेवा**

**सोयगाव,दि.५ जुलै :** दि.औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,छत्रपती संभाजीनगर संचालक मंडळाच्या निवडणुकीत महायुतीच्या शेतकरी विकास पॅनलने घवघवीत यश संपादन करत एकहाती सत्ता मिळविली. तसेच सोयगाव येथील शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर (आबा) काळे यांनी प्रचंड मताधिक्याने विजय मिळवल्याबद्दल सोयगाव येथे तालुका शिवसेनेच्या वतीने उत्साहात विजयोत्सव साजरा करण्यात आला.यावेळी



कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी करून व पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला.विजयी संचालक प्रभाकर (आबा)काळे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील यशस्वी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी शिवसेना शहरप्रमुख तथा नगरसेवक संतोष बोडखे, न. प.तील शिवसेना गटनेते अक्षय काळे,किशोर मापारी, हर्षल काळे,गजानन कुडके,दिपक पगारे,संदीप सुरडकर, लतिफ शहा,मोतीराम पंडीत,कदीर शहा,रमेश गव्हांडे, नारायण घनघाव,जिवन पाटील,फिरोज पठाण,हर्षल देशमुख,अॅड.योगेश पाटील,संदीप चौधरी,सुनिल निकम, रविंद्र काळे,विलास बोर्डे,विजय काळे,भगवान वाघ,अमोल मापारी,रमेश वामने,अमोल निकम,समाधान काळे,सलमान पठाण,साई पाटील,गजानन ढगे,आबा कोळी,निवृत्ती गव्हांडे,रंगनाथ पाटील,कृष्णा जुनघरे,धनराज औरंगे, स्वप्नील काळे,प्रकाश देसाई,विष्णू इंगळे,अरुण सोहनी, दिगंबर वाघ आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहीम यशस्वी; 2 लाखांहून अधिक बालकांना पोलिओ डोस

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिकेच्या वतीने २८ जून रोजी राबविण्यात आलेली राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम शंभर टक्के उद्दिष्ट पूर्ण करत यशस्वीरीत्या पार पडली. मोहिमेअंतर्गत शहरातील एकूण २ लाख १ हजार १९७ शून्य ते पाच वर्षे वयोगटातील बालकांना पोलिओ प्रतिबंधक डोस देण्यात आला.

मोहिमेच्या पहिल्या दिवशी शहरातील ६९२ लसीकरण केंद्रांवर १ लाख ६८ हजार १४९ बालकांना पोलिओचे डोस पाजण्यात आले. त्यानंतर २९ जून ते ३ जुलैदरम्यान राबविण्यात आलेल्या घरभेट (IPPI) मोहिमेत आणखी ३३ हजार ४८ बालकांचे लसीकरण करण्यात आले. त्यामुळे महानगरपालिकेने निश्चित केलेले उद्दिष्ट पूर्ण



झाले. महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. उज्वला भामरे तसेच जागतिक आरोग्य संघटनेचे डॉ. मुजीब सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली मोहीम राबविण्यात आली. नोडल अधिकारी डॉ. मेघा जोगदंड यांनी संपूर्ण नियोजन व अंमलबजावणीची जबाबदारी सांभाळली. मोहिमेसाठी ५८८ घरभेट पथके, १४४ ट्रान्झिट पथके आणि २४ मोबाईल पथके कार्यरत होती. बसस्थानक, रेल्वे स्थानक, विमानतळ, मॉल्स, भाजी मंडई, विटभट्ट्या, तांडे व बांधकामांच्या ठिकाणी विशेष लसीकरण मोहीम राबविण्यात आली. सुमारे २,०५० अधिकारी, कर्मचारी, आशा वर्कर्स, अंगणवाडी सेविका तसेच विविध नर्सिंग व वैद्यकीय महाविद्यालयांतील विद्यार्थी या मोहिमेत सहभागी झाले.

## शेतकरी हिताला प्राधान्य देणारी कर्जमुक्ती

राज्य शासनाने शेतकऱ्यांसाठी आतापर्यंतची सर्वात मोठी कर्जमाफी करणारी घोषणा केली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना 2026 या अंतर्गत निसर्गाची सर्व रुपे झेलत शेतात राबून आपल्यासाठी अन्न धान्य उत्पादन करणाऱ्या बळीराजाला वेगवेगळया संकटांना सामोरे जावे लागते. या बळीराजाला समर्पित अशी ही सर्वात मोठी कर्जमाफी आहे.

आपला देश मौसमी हवामानाच्या प्रदेशात आहे आणि बदलते ऋतूचक्र आणि वेळोवेळी येणारी नैसर्गिक आव्हाने झेलत शेती करणे अतिशय कष्टाचे काम आहेच सोबतच लहरी निसर्गाने अवेळी येणारा पाऊस, अतिवृष्टी तर कधी गारपीट याने पेरलं ते उगवलं तरी त्याला बाजारपेठ मिळणं व योग्य भाव मिळणं यांच संकट त्याच्यासमोर असतं. सतत तणाव सहन करीत शेतकरी मेहनत करीत असताना आणि त्याच्या कष्टाचं मोल जाणून कर्जमुक्तीची योजना शासनाने आणली आहे.

शासनाने याबाबत जे निकष लावले आहेत ते जाणून घेणे महत्वाचे आहे. यात कर्जमुक्तीची व्याप्ती अधिकाधिक शेतकऱ्यांना लाभ मिळावा अशीच ठेवण्यात आली आहे. सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग या विभागांकडे याची अंमलबजावणी सोपविण्यात आली आहे. पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात थेट लाभ हस्तांतर पध्दतीने अर्थात डीबीटी अंतर्गत याचा लाभ मिळणार आहे.

दोन लाख किंवा त्यापेक्षा कमी कर्ज असेल तर त्या शेतकऱ्याला त्याच्या बँक खात्यात कर्जाची थकीत रक्कम थेट लाभ स्वरुपात प्राप्त आहे. यासाठी त्याचे बँक खाते आणि आधार क्रमांक संलग्न असणे आवश्यक आ हे. जे शेतकरी नियमितपणे कर्जाचा हप्ता बँकेत नियमितपणे भरतात त्या सर्वांना प्रोत्साहन देण्याचे धोरण शासनाने निश्चित केले आहे त्यानुसार अशा शेतकरी बांधवांना त्यांच्या बँक खात्यात 50 हजार रुपये प्रोत्साहन स्वरुपात दिले जाणार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री झाल्यानंतर सातत्याने शेतकरी केंद्रस्थानी ठेवत अने महत्वाचे निर्णय घेतले आहेत. आणि त्यासाठी विशेष योजना तयार करुन त्याची व्यवस्थित अंमलबजावणी होवून याचा शेतकऱ्यांना लाभ व्हावा असे प्रयत्न केले आहेत. आजवरच्या धोरणात्मक निर्णयामध्ये हा कर्जमुक्तीचा निर्णय शेतकऱ्यांना संकटातून सावरण्यास मदत तर करणार आहेच सोबतच यातून नवी वाट त्यांना मिळेल याचाही या निर्णयात विचार झाला आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव या योजनेला देण्यात आले आहे. यालाही विशेष महत्व आहे. लोककल्याणकारी शासन, जलसंधारण, सिंचन आणि ग्रामीण विकासाचा विचार करणाऱ्या आणि शेतकरी हितासाठी काम करणाऱ्या अहिल्यादेवी होळकर यांचे त्रिशताब्दी जयंती वर्षात हा निर्णय घेण्यात आला याला विशेष महत्व आहे.

- प्रशांत दैठणकर

9823199466

## फ्लिपकार्ट गोट सेलसाठी आकर्षक ऑफर्स जाहीर

**मुंबई : :** एआई प्लस प्लस 2 हा विश्वासार्ह दैनंदिन स्मार्टफोन अनुभव शोधणाऱ्या ग्राहकांसाठी विकसित करण्यात आला आहे. या स्मार्टफोनमध्ये 6.745-इंच एचडी+ डिस्प्ले, 120 हर्ट्ज़रिफ्रेश रेट, यूनिसोक टी7250 ऑक्टा-कोर प्रोसेसर, 50एमपी एआईरिअर कॅमेरा, 8एमपी फ्रंट कॅमेरा, 6000एमएचए बॅटरी आणि 18डब्ल्यूफास्ट चार्जिंग, तसेच एंड्रॉइड16 आधारित एनएक्सटीक्वांटम ओएस देण्यात आले आहे. हा स्मार्टफोन 6जीबी पर्यंत जीबी रॅम आणि 128 जीबी स्टोरेजसह उपलब्ध असून, स्टोरेज 1टीबी पर्यंत वाढवता येते. यामध्ये आयपी 64 डस्ट आणि वॉटर रेझिस्टन्स तसेच साइड-माउंटेड फिंगरप्रिंट स्कॅनरही देण्यात आला आहे.

## वसंतराव नाईक जयंती साजरी झाली का? अहवाल सादर करण्याची मागणी




**तभा वृत्तसेवा**

**कन्नड :** - दि.०३ जुलै - हरितक्रांतीचे प्रणेते तथा राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त पंचायत समिती कन्नडच्या कार्यक्षेत्रातील विविध शासकीय कार्यालयांमध्ये कार्यक्रम पार पडला का, याबाबतचा अहवाल मागविण्याची मागणी करण्यात आली आहे. या मागणीनुसार ग्रामपंचायती, जिल्हा परिषद शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्रे, अंगणवाड्या तसेच इतर शासकीय कार्यालयांनी जयंती साजरी केली असल्यास त्याची तारीख, वेळ, छायाचित्रे, उपस्थितीची माहिती आणि संक्षिप्त अहवाल सादर करावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. तसेच ज्या ठिकाणी जयंती साजरी करण्यात आली नसेल, तेथील कारणेही स्पष्ट करण्याची मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, कन्नड येथील न्यू हायस्कूलमध्ये १ जुलै रोजी वसंतराव नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली नसल्याचा दावा करण्यात आला आहे. या प्रकरणाची संबंधित स्तरावर चौकशी करून आवश्यक खुलासा मागवावा, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.या निवेदनावर अरविंद राठोड,सुदाम पवार,बिनू राठोड,सत्यम राठोड,प्रथम जाधव,आदींच्या स्वाक्षऱ्या आहे

### जाहीर प्रगटन / सायटेशन नोटीस

**मा. श्री. एम. ए. शेख, सह. दिवाणी न्यायाधिश, (क. स्तर) न्यायालय गंगापूर**

सिव्हील एम.ए. क्रं. 445/2026 — प्रकरणात पुढील तारीख 14/08/2026

अर्जदार 1) कलिम नसिर शेख वय 51 वर्षे, धंदा मजूरी रा.चर्च जवळ, सिरसाठ गल्ली, लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि.औरंगाबाद.2) मोईन नसीर शेख वय 48 वर्षे, धंदा मजूरी रा. चर्च जवळ, सिरसाठ गल्ली लासूरस्टेशन, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद 3) जकिया बी शब्बीर शेख वय 46 वर्षे धंदा घरकाम रा मु पो देवगाव रंगारी ता. कन्नड, जि. औरंगाबाद 4) सुलताना एजाज शेख वय 37 वर्षे, धंदा घरकाम रा. मस्तुमिया मस्जिद जवळ, बाजार तल, गंगापूर ता. गंगापूर, जि. औरंगाबाद 5) जेबुन्निसा सलीम शेख वय 50 वर्षे, धंदा घरकाम रा. चर्च जवळ, सिरसाठ गल्ली, लासूर स्टेशन, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद 6) शाकीर सलीम शेख वय 35 वर्षे, धंदा मजूरी रा. चर्च जवळ, सिरसाठ कॉलोनी, लासूर स्टेशन, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद 7) जाकीर सलीम शेख वय 32 वर्षे, धंदा मजूरी रा. चर्च जवळ, चर्च गल्ली, लासूर स्टेशन, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद 8) आफरीन मुजाहिद शेख वय 31 वर्षे, धंदा घरकाम रा. कनकुरीरोड, पूनमनगर, शिर्डी, ता. राहता जि. अहमदनगर

// विरूध्द //

गैरअर्जदार निरंक

प्रकरण बॉम्बे रेगुलेशन अॅक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते उपरोक्त अर्जदारांनी या न्यायालात अॅड. आसिफ आय. शहा रा. लासूर स्टेशन, ता. गंगापूर यांच्या मार्फत बॉम्बे रेगुलेशन अॅक्ट VIII 1827 अन्वये लिगल वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज सादर केला की, अर्जदार क्रं. 1 ते 8 हे वरील नमुद ठिकाणचे कायमस्वरूपी राहणारे असून अर्जदार क्रं. 1 ते 4 हे आपसात सख्खे भाऊ व विवाहीत बहिणी आहे. तसेच अर्जदार क्रं. 5 ही अर्जदार क्र. 1 ते 4 यांची वहिणी म्हणजेच भावाची पत्नी असून अर्जदार क्रं. 6 ते 8 हे अर्जदार क्र. 5 यांचे मुले व विवाहीत मुलगी आहे. अर्जदार क्रं. 1 ते 4 यांचे वडील व अर्जदार क्रं. 5 हिचे सासरे आणि अर्जदार क्रं. 6 ते 8 यांचे आजोबा नामे नसिर शेख रहीम हे दिनांक 05/01/2021 रोजी मौजे लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मयत झाले आहे. तसेच अर्जदार क्रं. 1 ते 4 यांची आई व अर्जदार क्रं. 5 हिची सासू व अर्जदार क्रं. 6 ते 8 यांची आजी नामे शमा नसिर शेख ह्या दिनांक 19/08/2024 रोजी मौजे सिरसाठ गल्ली, लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मयत झालेली आहे. तसेच अर्जदार क्रं. 1 ते 4 यांचा भाऊ व अर्जदार क्रं. 5 यांचे पती आणि अर्जदार क्रं. 6 ते 8 यांचे वडील नामे सलीम नसिर शेख दिनांक 27/11/2001 रोजी मौजे लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मयत झालेले आहे. त्यामुळे मयत नसिर शेख रहीम यांना अर्जदार क्रं. 1 व 2 मुले असून अर्जदार क्रं. 3 व 4 विवाहीत मुली आहे. तसेच अर्जदार क्रं. 5 ही सुन असून अर्जदार क्रं. 6 व 7 नातु असून अर्जदार क्रं. 8 ही विवाहीत नात या नात्याने कायदेशीर वारसदार असून अर्जदार क्रं. 1 ते 8 यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत नसिर शेख रहीम यांच्या मृत्युमुळे अर्जदारांना शासकिय, निमशासकिय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला असून वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून 30 दिवसांच्या आत या न्यायालात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या उजर, आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र देण्यात येईल करीता जाहीर प्रगटन.

आज दिनांक 4/07/2026 रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

आदेशावरून

लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापूर